# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# कल्याणकारी अर्थशास्त्र

## (Welfare Economics)

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग-२ : सत्र-४**

**अर्थशास्त्र :**

EO-37 (Optional Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ६००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : अर्थशास्त्र ■

अध्यक्ष - **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **प्रा. डॉ. डी. सी. तळुले**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती विद्या कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
  जि. कोल्हापूर
- **डॉ. बाळासो पांडुरंग पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. नेताजी व्ही. पोवार**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. निवास जाधव**
  राजा शिव छत्रपती आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  महागांव, जि. कोल्हापूर
- **डॉ. एस. एम. भोसले**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. विजय भिमाप्पा देसाई**
  राजर्षी शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी
  जि. कोल्हापूर
- **डॉ. विजयकुमार आप्पासाहेब पाटील**
  आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, आटपाटी,
  जि. सांगली
- **प्रा. डॉ. सिद्धाप्पा टिप्पान्ना बागलकोटे**
  डिपार्टमेंट ऑफ स्टडीज इन इकॉनॉमिक्स,
  कर्नाटक विद्यापीठ, धारवाड (कर्नाटक राज्य)
- **डॉ. वाय. एस. गायकवाड**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली.
- **प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**
  अक्षय, बी-६, तारा टेसेसेस, एस.एस.सी. बोर्ड रोड,
  सम्राट नगर, कोल्हापूर
- **डॉ. राहूल शंकरराव म्होपरे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **श्री. सुर्यकांत बाबूराव पाटील-बुद्धिहाळकर**
  सागर, २१०३/७+८, ई वॉर्ड, रुक्मीनीनगर, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहि:स्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने एम. ए. भाग-२ अर्थशास्त्र या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१४-१५ पासून सत्र पद्धती सुरू होत आहे. त्या अनुषंगाने 'कल्याणकारी अर्थशास्त्र' या विषयाचे स्वयं:अध्ययनासाठी हे पुस्तक सत्र ४ साठी लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, कोष्टके, गणितीय सूत्रे, आकृत्या इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं:अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, क्षेत्रीय अभ्यासासाठी विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

कल्याणकारी अर्थशास्त्र या विषयातील कल्याणकारी अर्थशास्त्राची तत्त्वे, पूर्व-पॅरेटो कल्याणकारी अर्थशास्त्र, पॅरेटोचे कल्याणाचे अर्थशास्त्र, अलिकडील कल्याणकारी विचार या घटकांचे सविस्तरपणे विश्लेषण केलेले आहे.

कल्याणकारी अर्थशास्त्र या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. त्याबद्दल घटक लेखकांना मनःपूर्वक धन्यवाद. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. आण्णा काका पाटील**
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज (स्वायत्त),
कराड, जि. सातारा

**डॉ. अनिल कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज (स्वायत्त),
सातारा

दूरशिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



## अभ्यास घटकांचे लेखक



| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. डॉ. अनिल कृष्णराव वावरे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | १, २ |
| **प्रा. डॉ. आण्णा काका पाटील**<br>सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा | ३, ४ |



**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. आण्णा काका पाटील**
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज (स्वायत्त),
कराड, जि. सातारा

**डॉ. अनिल कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज (स्वायत्त),
सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | कल्याणकारी अर्थशास्त्राची तत्त्वे | १ |
| २. | पूर्व-पॅरेटो कल्याणकारी अर्थशास्त्र | २३ |
| ३. | पॅरेटोचे कल्याणाचे अर्थशास्त्र | ५१ |
| ४. | अलिकडील कल्याणकारी विचार | ७९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक–१

# कल्याणकारी अर्थशास्त्राची तत्त्वे

## ( Priniciples of Welfare Economics )

---

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

  १.२.१ कल्याणाची संकल्पना

  १.२.२ राष्ट्रीय उत्पन्न आणि कल्याण

  १.२.३ मूल्यदर्शित्व, तुलनात्मकता आणि कल्याणातील समता

  १.२.४ शासन आणि कल्याण, जागतिकीकरण आणि कल्याण

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला,

१. कल्याणाची सामाजिक व आर्थिक संकल्पना समजावून घेणे.

२. राष्ट्रीय उत्पन्न आणि कल्याण यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

३. मूल्यदर्शित्व, तुलनात्मक आणि कल्याणातील समता यातील संबंध समजावून घेणे.

४. शासनाची कल्याणविषयक भूमिका तपासणे.

५. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कल्याणविषयक दृष्टीकोणात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना

वास्तविक अर्थशास्त्रात (Positive Economics) उत्पादन, विनिमय, दुर्मिळ साधनसंपत्तीचे विवेकपूर्ण व्यवस्थापन याचा अभ्यास केला जातो. मात्र कल्याणकारी अर्थशास्त्र मानवी कल्याणाचा अभ्यास करते. डॉ. आल्फ्रेड मार्शल व त्यांच्या अनुयायांच्या मते, मानवाच्या जीवनात संपत्ती हे साध्य नाही तर त्याऐवजी भौतिक कल्याण हे मुख्य साध्य आहे; आणि संपत्ती हे त्याच्या प्राप्तीचे साधन आहे. म्हणूनच या अर्थशास्त्रज्ञांच्या गटास कल्याणवादी अर्थशास्त्रज्ञ असे म्हणतात. कल्याणकारी अर्थशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय हा सामाजिक हित किंवा कल्याण हा आहे. अलिकडील काळात कल्याणाच्या अर्थशास्त्रास अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत आहे. त्यादृष्टीने प्रस्तुत घटकामध्ये आपण कल्याणाशी संबंधित विविध घटकांवर चर्चा करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

प्रस्तुत घटकात आपण कल्याणाचा अर्थ, कल्याणकारी अर्थशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती, राष्ट्रीय उत्पन्न व कल्याण, संसाधनांचा वापर व कल्याण, कल्याणातील शासनाची भूमिका व जागतिकीकरणाच्या परिस्थितीत कल्याण या घटकांचा अभ्यास करणार आहोत.

### १.२.१ कल्याणाची संकल्पना (Concept of Welfare) :-

कल्याणाच्या आर्थिक कल्याण व सामाजिक कल्याण अशा दोन संकल्पना आहेत. या दोन्ही संकल्पनांचा अभ्यास कल्याणकारी अर्थशास्त्रात केला जातो. कारण कल्याणकारी अर्थशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय सामाजिक कल्याण हा आहे. प्रा. एडविन कॅनन यांनी आपल्या 'संपत्ती' (Wealth) या ग्रंथातील राजनीतिक अर्थशास्त्राच्या व्याख्येत मानवी कल्याणास महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते, ''मानवाचे भौतिक कल्याण निश्चित करणाऱ्या निरनिराळ्या कारणांचे स्पष्टीकरण करणे'' हा राजनितीक अर्थशास्त्राचा मुख्य उद्देश आहे.

**✷ कल्याणकारी अर्थशास्त्राच्या व्याख्या :–**

कल्याणकारी अर्थशास्त्राच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न विविध अर्थशास्त्रज्ञांनी केला आहे. काही प्रमुख व्याख्या आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) प्रा. मेलविन रीडर :–**

''कल्याणकारी अर्थशास्त्र ही आर्थिक विज्ञानाची अशी शाखा आहे की, जी आर्थिक धोरणाला व्यवहार औचित्याचे मापदंड लागू करते.''

("Welfare Economics is that branch of economics science which attempt to establish and apply criteria of properties to economic policies.")

**२) प्रा. सायटोवॉस्की :-**

''कल्याणकारी अर्थशास्त्र हे अर्थशास्त्राच्या सिध्दांताचा असा भाग आहे की, जो मुख्यत्वे आर्थिक धोरणाच्या निश्चिततेशी संबंधित असतो.''

("Welfare Economics is that part of economic theary which is concerned primarily with policy.")

**३) प्रा. बॉबर :-**

''महत्तम सामाजिक संसाधनाच्या मापदंडाच्या आधारावर अर्थव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे विश्लेषण म्हणजेच कल्याणकारी अर्थशास्त्र होय.''

("The analysis of the efficiency of economy with maximum total social satisfaction of a yard stick is known as welfare economics.")

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, आर्थिक कल्याणाचे निकष ठरविणे आणि ते प्राप्त करण्यासाठी आर्थिक धोरण ठरविणे हे कल्याणकारी अर्थशास्त्राचे मुख्य कार्य आहे. कल्याणाच्या अर्थशास्त्रास आदर्शवादी शास्त्र (Normative Science) असेही संबोधले जाते, कारण या अर्थशास्त्रात विशिष्ट आदर्शाच्या आधारावर कल्याणाचे निर्णय घेतले जातात.

विविध अर्थशास्त्रज्ञांनी कल्याणाच्या उद्देश व कार्ये वेगवेगळ्या प्रकारे मांडली आहेत. यातूनच कल्याणाच्या अर्थशास्त्राची तीन शाखा निर्माण झाल्या आहेत.

१) पहिली शाखा ही आर्थिक धोरणाच्या अभ्यासाशी निगडीत आहे. यामध्ये मुक्त अर्थव्यवस्थेच्या संबंधात सरकारच्या धोरणाचा अभ्यास केला आहे. मुक्त किंवा बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेत सरकारने आर्थिक धोरणे कशा पध्दतीने निश्चित करावीत याविषयी विश्लेषण केले आहे. हा दृष्टिकोण मुख्यत्वे डॉ. मार्शल, प्रा. पिगू, स्टॅनले जेव्हॉन्स, हेरी सीजविक, नट विकसेल आणि विलफ्रेड पॅरेटो यांनी मांडला आहे.

२) ॲडम स्मिथ, जे.बी.से, लूडविग व्हॉग माईझे यांनी दुसरा दृष्टिकोन मांडला आहे. त्यांच्या मते, सरकारी हस्तक्षेपाशिवाय महत्तम सामाजिक कल्याण साधता येते. निर्हस्तक्षेपाची निती आणि सामाजिक कल्याण हे कल्याणाच्या अर्थशास्त्राचा अभ्यासविषय आहे. यासंबंधीचे विश्लेषण दुसऱ्या शाखेत करण्यात आले आहे.

३) तिसरी शाखा ही समाजवादी अर्थव्यवस्था आणि आर्थिक कल्याण याच्याशी संबंधित आहे. या दृष्टिकोनानुसार समाजवादी अर्थव्यवस्था महत्तम आर्थिक कल्याण प्राप्त करू शकत नाही. हा दृष्टिकोन प्रो. लुडविन व्हॉन माईझे, मॅक्सवेबर, एफ.ए.व्हान, हायके, लिऑनल रॉबीन्स या अर्थशास्त्रज्ञांनी मांडला.

## ✺ कल्याणाची संकल्पना (Concept of Welfare) :-

कल्याण ही संकल्पना आर्थिक कल्याण व सामाजिक कल्याण या दोन्हीही दृष्टीकोनातून अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. कल्याणाच्या अर्थशास्त्राचा अभ्यासविषय हा आर्थिक कल्याणाच्या संदर्भात आहे. मात्र आर्थिक कल्याण व सामाजिक कल्याण या दोन्हीही संकल्पना परस्परांशी निगडीत आहेत. त्यादृष्टीने आपण आर्थिक व सामाजिक कल्याणाच्या संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत.

## ✺ आर्थिक कल्याण (Economics Welfare) :-

आर्थिक कल्याणाची संकल्पना विविध अर्थशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारे स्पष्ट केली आहे.

### १) प्रा. पिगूची संकल्पना :–

सामान्य कल्याण आणि आर्थिक कल्याण हे दोन प्रकार पिगू यांनी मांडले आहेत. व्यक्ती आणि समाजाचे समाधान हे आर्थिक व आर्थिकेत्तर कारणांनी प्राप्त झालेले असते असे कल्याण म्हणजे सामान्य कल्याण होय. प्रा. पिगूच्या मते, व्यक्तीच्या सामान्य कल्याणामध्ये अनेक बाबी अंतर्भूत असतात. यामध्ये धार्मिक, सामाजिक व राजकीय घटकांचा परिणाम हा महत्त्वाचा असतो. या सर्व बाबींचा सामान्य कल्याणावरील परिणाम अभ्यासणे हे अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीचे असल्याने पिगू यांनी सामान्य कल्याणाकडे दुर्लक्ष केले. त्यांनी आपल्या 'कल्याणाचे अर्थशास्त्र' (Economics Welfare) या ग्रंथात 'आर्थिक कल्याणाचे' विवेचन केले आहे. त्यांच्या मते, ''आर्थिक कल्याण हे सामान्य कल्याणाचा असा भाग आहे की, जो फक्त आर्थिक तत्त्वावर अवलंबून असतो.'' आर्थिक कल्याण हे 'पैसा' या साधनाच्या साहाय्याने मोजता येते. पैशाच्या व्यक्ती आवश्यक त्या वस्तू व सेवांचा उपभोग घेवू शकते त्यातून तिला समाधानाची प्राप्ती होते.

प्रा. पिगू यांनी मांडलेल्या आर्थिक कल्याणाच्या विवेचनावर काही अर्थशास्त्रज्ञांनी टीका केल्या आहेत. उदा. पैशाच्या साहाय्याने आर्थिक कल्याणाचे मापन होऊ शकत नाही, कारण पैशाचे मूल्य हे अस्थिर असते. वस्तूच्या किंमतीत वाढ झाल्यास पैशाचे मूल्य घटते व किंमतीत घट झाल्यास पैशाच्या मूल्यात वाढ होते. त्यामुळे पैशाच्या साहाय्याने उपयोगितेचे मापन करणे कठीण आहे. त्याचबरोबर उपयोगिता ही समाधानाशी व व्यक्तीच्या मानसिकतेशी संबंधित संकल्पना असल्याने पैशाचा मापदंड अयोग्य आहे.

प्रा. पिगू यांनी आर्थिक कारणांमुळे व्यक्तीच्या मनात समाधानाची भावना निर्माण होते आणि त्यातूनच आर्थिक कल्याण साध्य होते असे म्हटले आहे. मात्र मनात निर्माण होणारे समाधान आर्थिक व आर्थिकेत्तर कारणांमुळेच होत असते. त्यातून आर्थिक कारणाने प्राप्त झालेले समाधान वेगळे करणे अशक्य असते.

### २) डॉ. ग्रॉफ यांची संकल्पना :–

प्रा. पिगू यांनी आर्थिक कल्याणाचे मोजमाप हे संख्यात्मक मापन पध्दतीने केले होते. डॉ. ग्राफ यांनी

संख्यात्मक पध्दतीऐवजी क्रमवाचक पध्दतीचा अवलंब करून आर्थिक कल्याणाचे मोजमाप केले आहे. त्यांच्यामते, ''एखाद्या व्यक्तीचे कल्याण हे त्याच्या क्रमवारीता नकाशाबरोबर मानले जाते. क्रमवारितेचा नकाशाद्वारे एखादी व्यक्ती निरनिराळ्या स्थितीस कशाप्रकारे निवड करतो हे दर्शविले जाते. व्यक्तीची वर्तवणूक किंवा निवड क्रमवारिता नकाशा दर्शवितो. उदा. एखाद्या व्यक्तीस 'अ' आणि 'ब' अशा दोन वेगवेगळ्या स्थितीत निवड करावयास लावली असता तो 'अ' या स्थितीत निवड करतो. याचा अर्थ 'ब' या स्थितीपेक्षा व्यक्तीस 'अ' या स्थितीतून अधिक समाधान प्राप्त होते. व्यक्तीच्या समाधानाची किंवा मनाची ती एक विशिष्ट अवस्था असते, ती त्याच्या निवडीतून व्यक्त होत असते.

### ✴ सामाजिक कल्याण (Social Welfare) :-

सामाजिक कल्याणाची संकल्पना आपणास पुढील व्याख्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### १) प्रा. पिगू :-

''समाजातील सर्व व्यक्तींच्या समाधानाची बेरीज म्हणजे सामाजिक कल्याण होय.''

प्रा. पिगू यांनी केलेल्या व्याख्येनुसार कल्याणाचे मापन करणे कठीण आहे. कारण, उपयोगितेचे मापन करणे अशक्य आहे. त्याचबरोबर एका व्यक्तीच्या समाधानाची दुसऱ्या व्यक्तीच्या समाधानाशी तुलना करणे हेही अशक्य आहे. उपयोगिता किंवा समाधान ही मनोनिष्ट संकल्पना आहे.

### २) डॉ. जे. डी. व्ही. श्रॉफ :-

श्रॉफ यांनी सामाजिक कल्याणाच्या तीन संकल्पना मांडल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे :-

### अ) अधिनायक :-

समाजातील अधिनायक समजणारी व्यक्ती स्वत:च्या मनानुसार महत्तम सामाजिक कल्याणाची एक स्थिती निश्चित करतो. या पध्दतीमध्ये समाजातील इतर व्यक्तींच्या मतांना व कल्पनांना वाव असत नाही. हुकूमशाहीप्रमाणे अर्थव्यवस्थेचा कारभार चालतो.

### ब) पॅरेटोची संकल्पना :-

उपयोगितेच्या क्रमवाचक मापनाच्या आधारावर पॅरेटोने कल्याणाची संकल्पना विशद केली आहे. एका व्यक्तीच्या कल्याणाची दुसऱ्या व्यक्तीच्या कल्याणाशी तुलना करणे शक्य नसते असे मानले आहे. मात्र सामाजिक कल्याण हे व्यक्तीच्या कल्याणाचे एक असमाधानी एकत्रीकरण असते. या गृहितावर आधारित पॅरेटोने सामाजिक कल्याणाची संकल्पना मांडली आहे. त्यांच्या मते, ''एका व्यक्तीच्या स्थितीत सुधारणा किंवा बिघाड हा इतर व्यक्तींच्या स्थितीत कोणत्याही प्रकारचा बदल न होता केली जाते, तेंव्हा सामाजिक कल्याणात वाढ किंवा घट झाली असे म्हणता येते.'' वास्तव परिस्थितीत मात्र एखाद्या सामाजिक बदलाचा परिणाम म्हणून समाजातील काही व्यक्तींच्या परिस्थितीत सुधारणा होत असते, तर काहींच्या परिस्थितीत बिघाड होत असतो. अशावेळी पॅरेटोच्या सामाजिक कल्याणाच्या संकल्पनेवर आधारित

सामाजिक विवेचन करणे अशक्य आहे. त्यामुळे व्यावहारिकदृष्ट्या पॅरेटोच्या सामाजिक कल्याणाच्या संकल्पनेवर मर्यादा येतात.

**क) प्रा. हिक्स कॅल्डोर व सायटोवोस्की यांची कल्पना :-**

सामाजिक बदलाचा लाभ हा प्राप्त करणाऱ्यावर कर आकारून मिळविलेल्या निधीतून सामाजिक बदलामुळे ज्यांना हानी पोहोचलेली आहे. त्यांची क्षतिपूर्ती करूनही लाभ करून घेणाऱ्याला अधिक्य राहत असेल तर त्या स्थितीत केलेल्या सामाजिक बदलामुळे कल्याणात वाढ झाली असे म्हणता येलि.

**ड) प्रो. बर्गसन :-**

बर्गसन यांनी कल्याणाच्या स्पष्टीकरणासाठी सामाजिक कल्याण फलनाची संकल्पना मांडली आहे. त्यामुळे नवीन कल्याणकारी अर्थशास्त्राचे अधिक स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रा. हिक्स, कॅल्डोर व सायटोव्हस्की यांच्या विवेचनात नैतिक व निर्णयाच्या अभावामुळे अडचणी निर्माण होतात. प्रा. बर्गसन सॅन्युअलसन यांच्या मते, कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञ प्रामुख्याने आदर्शवादी अध्ययन आहे. त्यामुळे साहजिकच नितीशास्त्राच्या आदर्शाच्या आधारेच कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञ उपयुक्त अशा आर्थिक धोरणाचे निर्धारण करू शकते. प्रा.बर्गसन यांच्या मते, ''साामजिक कल्याण फलन हे एकतर समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाचे फलन होय किंवा ते समाजातील प्रत्येक व्यक्तीने उपभोगलेल्या वस्तूची किंवा पुरवलेल्या सेवांचे फलन होय.''

## १.२.२ राष्ट्रीय उत्पन्न आणि कल्याण (National Income and Welfare) :-

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाला अनन्यसाधारण महत्त्व असते. वस्तू आणि सेवांची निर्मिती आणि त्यांचे समाजातील सर्व स्तरांमध्ये योग्य पध्दतीने वितरण हे आर्थिक प्रयत्नांचे मुख्य उद्दिष्ट असते. राष्ट्रीय उत्पादनातील किंवा उत्पन्नातील चढ-उतार म्हणजे आर्थिक विकास किंवा आर्थिक अधोगतीचे निदर्शक मानले जाते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे एका विशिष्ठ कलावधीतील अर्थव्यवस्थेच्या आर्थिक कामगिरीचे मूल्यमापन केले जाते. राष्ट्रीय उत्पन्नात अत्यंत उच्च दराने वाढ झाल्यास त्याचे वर्णन अर्थव्यवस्थेची अत्यंत नेत्रदिपक कामगिरी असे केले जाते, याउलट राष्ट्रीय उत्पन्न अत्यंत अल्पदराने वाढल्यास त्याचे वर्णन अर्थव्यवस्थेची निराशाजनक कामगिरी असे केले जाते. अर्थशास्त्र हे सुरुवातीपासूनच मानवाच्या भौतिक कल्याणाशी संबंधित आहे. प्रा. पिगू यांच्या मते, ''आर्थिक कल्याण हा सामाजिक कल्याणाचा असा भाग आहे की, ज्यास पैशाच्या मापदंडाने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या मोजले जाऊ शकते.''

राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे देशात एका वर्षाच्या काळात उत्पादीत झालेल्या अंतिम वस्तू व सेवांची बेरीज होय. दुसऱ्या शब्दात, उत्पादन घटकांना विशिष्ट काळात मिळणाऱ्या मोबदल्यांची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. राष्ट्रीय उत्पन्न हे संबंध अर्थव्यवस्थेत चक्राकार प्रवाहाने फिरत असते. प्रत्येक अर्थव्यवस्थेत वस्तू आणि उत्पादन घटकांचा पैशाच्या साहाय्याने विनिमय केला जातो. एक कुटुंब दुसऱ्या कुटुंबाकडून

जेव्हा वस्तू खरेदी करते तेव्हा एका कुटुंबाचा खर्च हा दुसऱ्या कुटुंबाचे उत्पन्न असते. तेच उत्पन्न दुसऱ्याचा खर्च व तिसऱ्या कुटुंबाचे उत्पन्न बनत असते. अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या प्राथमिक अवस्थेत अशा प्रकारचा विनिमय कुटुंबा-कुटुंबामध्ये होत होता. मात्र आधुनिक काळात अर्थव्यवस्थेत उत्पादन संघटित करण्याचे कार्य उद्योग संस्था करीत असतात. प्रत्येक कुटुंब स्वत: वस्तू उत्पादित करून त्याची विक्री करीत नाही तर कुटुंबाच्या उपभोगासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन उद्योग संस्थेकडून उत्पादन घटकांचा मोबदला कुटुंबसंस्थांना खंड, वेतन, व्याज व नफा या स्वरूपात देत असतात.

राष्ट्रीय उत्पन्न आणि आर्थिक कल्याण या दोहोंमध्ये एकत्र दिशेचा संबंध असतो असे गृहीत धरले जाते. स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील वाढ आर्थिक कल्याणात वाढ घडवून आणते. याउलट स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील घट आर्थिक कल्याणात घट घडवून आणते. थोडक्यात दरडोई वास्तव उत्पन्न हा आर्थिक कल्याणाचा आर्थिक विश्वासार्ह मापदंड समजला जातो. दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढीबरोबर लोकांच्या राहणीमानात वाढ होते, परंतु दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ घडून येण्यासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही लोकसंख्येतील वाढीपेक्षा अधिक असली पाहिजे. लोकसंख्येतील वाढीचा दर राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा अधिक असल्यास समाजाच्या आर्थिक कल्याणात वाढ होत नाही. आर्थिक कल्याणावर परिणाम करणारा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे किंमत पातळी होय. सर्वसाधारण किंमत पातळीतील वाढ ही वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात घट घडवून आणते आणि त्याचबरोबर लोकसंख्यावाढ की जी दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणते. वरील दोन समग्रलक्षी आर्थिक चलांचा प्रत्यक्ष परिणाम समाजाच्या आर्थिक कल्याणावर होत असतो. या चलांचा आर्थिक कल्याणावर अनुकूल परिणाम अधिक व्हावा व प्रतिकूल परिणाम कमी व्हावा यासाठी राजकोषीय धोरण व मौद्रीक धोरणाच्या साहाय्याने केंद्र सरकार व मध्यवर्ती बँक प्रयत्नशील असते.

वरील घटकांबरोबरच पुढील काही घटकांचा विचार करणे आवश्यक आहे की, ज्यामुळेच राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबर समाजाच्या राहणीमानात वाढ घडून येईलच असे नाही.

## १) राष्ट्रीय उत्पादनाची रचना :-

राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरच राष्ट्रीय उत्पादनाची रचनाही आर्थिक कल्याणावर परिणाम करणारी असते. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून आली. मात्र त्याचवेळी लोकांच्या सरासरी उपभोगात मात्र घट झाली. याचा अर्थ लोकांचे राहणीमान उंचावण्याऐवजी घसरले असा होतो. काहीवेळा उपभोग्य वस्तूंऐवजी युध्द साहित्याच्या निर्मितीत झालेली वाढ ही उत्पादनात वाढ दर्शविते, मात्र सरासरी उपभोगात घट होते. मादक पदार्थांचे उत्पादन वाढल्यासही सरासरी उपभोगात घट झाल्याचे दिसून येते.

## २) राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप :-

राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप हे आर्थिक कल्याणावर परिणाम करणारे एक महत्वाचे निदर्शक मानले जाते. कारण देशातील लोकांचे राहणीमान हे राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीबरोबरच राष्ट्रीय उत्पन्नाचे देशातील लोकांच्या विविध गटांमध्ये प्रत्यक्ष वाटप कशा पध्दतीने झाले आहे, यावर अवलंबून असते. उदा. एका

आर्थिक वर्षात राष्ट्रीय उत्पन्न १०% नी वाढले, मात्र वाढलेले सर्व उत्पन्न हे श्रीमंत वर्गाकडे गेले तर सर्वसामान्यांच्या राहणीमानात कोणताच फरक पडणार नाही. शिवाय या परिस्थितीत किंमत वाढीचा दर जर उच्चराहिला तर सर्वसामान्यांच्या हालअपेष्ठात वाढच होईल. त्यातून सामाजिक अकल्याण निर्माण होईल. थोडक्यात आर्थिक कल्याणासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण समान पध्दतीने होण्याची आवश्यकता असते.

### ३) आर्थिक विकासातून निर्माण होणाऱ्या बाह्यता :-

समाजाच्या आर्थिक कल्याणाचा विचार करीत असताना आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या बाह्यतांचा परिणामही विचारात घेणे आवश्यक असते. उदा. अर्थव्यवस्थेत विकासाच्या प्रक्रियेतून मोटार गाड्यांचे उत्पादन वाढले. मोठमोठे उद्योग उभा राहिले यातून एका बाजूला एकूण उत्पादनात वाढ होते, एकूण रोजगारात वाढ होते, मात्र दुसऱ्या बाजूला मोटार गाडयांचे वाढते प्रमाण तसेच उद्योगांची वाढती संख्या यातूनच मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण होते, अपघाताचे प्रमाण वाढते, म्हणजेच समाजाच्या अकल्याणात वाढ होते. वाढत्या प्रदूषणामुळे समाजाच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो, औषधांवरील खर्च वाढतो, त्यामुळे वास्तव उत्पन्न घटून आर्थिक अकल्याण निर्माण होते.

### ४) वस्तू व सेवांचा विनिमय :-

ज्या वस्तू व सेवांचा विनिमय होत नसतो. त्यांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. विकसनशील देशात विनिमयाच्या प्रक्रियेत न येणाऱ्या वस्तू व सेवांचे प्राबल्य अधिक असते. उदा. आपण स्वत: आपल्या घराची दुरुस्ती केली किंवा घराला रंग दिला ही बाब विनिमयाच्या प्रक्रियेत येत नाही.

### ५) आर्थिकेत्तर घटक :-

देशातील लोकांना सरासरीने उपलब्ध होणाऱ्या वस्तू व सेवांच्या आधारे राहणीमानाचे मापन करणे योग्य नसते. या संदर्भात आर्थिकेत्तर घटक देखील विचारात घेणे आवश्यक असते. उदा. राजकीय किंवा धार्मिक स्वातंत्र्य, रोगांचा प्रादूर्भाव, सरासरी आर्युमान, बालमृत्यूचे प्रमाण इत्यादी.

स्थूल राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना ही केवळ वस्तू व सेवांच्या उत्पादनावर भर देते. परंतु याचवेळी त्या वस्तू व सेवा लोकांना किती उपयुक्त आहेत याचादेखील विचार करणे गरजेचे असते.

स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या मापनाच्या संदर्भात अनेक अडचणी आहेत. त्यांचाही याठिकाणी उल्लेख करणे महत्त्वाचे आहे. प्रा. रिचर्ड आणि रगल्स यांच्या मते, राष्ट्रीय उत्पन्नाची सांख्यिकी ही बऱ्याचवेळा दिशाभूल करणारी असते. कारण तिच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन योग्य प्रकारे होत नाही. त्यांच्या मते, पर्यावरणाचे प्रदूषण, गुन्ह्यांचे परिणाम यासारख्या बाबी आपण राष्ट्रीय उत्पादनातून वजा करीत नाही. त्याचबरोबर बाजारात विक्रीसाठी न आलेल्या वस्तू, विश्रांतीच्या वेळेतील वाढ, वैद्यकीय ज्ञानातील प्रगती उच्च दर्जाच्या वस्तूचे उत्पादन इत्यादी बाबी आपण राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनात विचारात घेत नाही, त्यामुळे आर्थिक कल्याणात वृध्दी होते की घट होते, याचा अभ्यास करणे कठीण जाते.

नोबेल पारितोषिक विजेते (१९८९) जेम्स होबिन यांनी आर्थिक कल्याणाची अत्यंत व्यापक अशी संकल्पना मांडली आहे. विशिष्ठ कालावधीत देशातील राष्ट्रीय उत्पादनाच्या आर्थिक क्रियांच्या चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही बाजू विचारात घेतल्या आहेत. या अर्थतज्ञाने विशिष्ठ कालावधीत निर्माण केलेल्या (Economic Goods) आणि (Economic Bad's) अशा दोन्ही बाजूंचा विचार केलेला आहे. त्यांनी (Measure of Economic Welfare) ही संकल्पना मांडली आहे. या संकल्पनेच्याद्वारे त्यांनी स्थूल राष्ट्रीय उत्पादनांमध्ये पुढील सुधारणा सुचविल्या आहेत.

१) प्रदूषण, गोंगाट इत्यादीचा अंदाजित खर्च स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातून वजा करावा.

२) पोलीस यंत्रणा, संरक्षण यावरील खर्च अनुत्पादक म्हणून तो स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातून वजा करावा.

३) विनिमय प्रक्रियेत न आलेल्या वस्तू उदा. घरातील व्यक्तींनी केलेले उत्पादक कार्य, विश्रांती इत्यादी स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट करावे.

प्रा. टोबीन आणि नॉरडस यांनी असे अनुमान केले की, १९४५ पासून अमेरिकेच्या दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत दरडोई निव्वळ आर्थिक कल्याणात कमी गतीने वाढ होत आहे. याचा अर्थ स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत कल्याणामध्ये कमी प्रमाणात वाढ झाली.

जोहान बरशॉ (Johan Bearshaw) यांनी आर्थिक कल्याणाच्या संदर्भात वैकल्पित खर्चाची संकल्पना मांडली आहे. त्यांच्या मते, आपणाला जर आर्थिक कल्याणाच्या पातळीचे मूल्यमापन करावयाचे असल्याच आरोग्य आणि आहार हे निर्देशक विचारात घेणे आवश्यक आहे.

स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या आर्थिक कल्याणाचा निर्देशक म्हणून विचार करताना वरीलप्रमाणे आक्षेप घेण्यात आले असले तरी या संकल्पनेचे महत्त्व कमी होत नाही. थोडक्यात स्थूल राष्ट्रीय उत्पादन आणि निव्वळ आर्थिक कल्याण या दोहोंमध्ये अत्यंत जवळचा संबंध आहे.

निव्वळ आर्थिक कल्याण (Net Economic Welfare) आपणांस पुढीलप्रमाणे व्यक्त करता येईल.

NEW = Real GNP – Depreciation + Value of leisure + value of non market activities – Environmental Pollution.

निव्वळ आर्थिक कल्याण = वास्तव स्थूल राष्ट्रीय उत्पादन - घसारा + विश्रांतीचे मूल्य + वैयक्तिक सेवा - पर्यावरणाचे प्रदूषण.

वरील सूत्रात वैयक्तिक सेवा (Non Market Activities) म्हणजेच बाजारात न आलेल्या वस्तू व सेवा आणि स्त्रियांनी केलेले घरकाम, स्वत: घरासाठी दिलेल्या सेवा इत्यादीचा समावेश होतो. विश्रांतीचे मूल्य = विश्रांतीचा संधी खर्च.

राष्ट्रीय उत्पन्न आणि आर्थिक कल्याण यातील संबंध अभ्यासत असताना बाह्यतेचे मापनही करणे आवश्यक असते. उत्पादनाच्या प्रक्रियेतून चांगल्या बाह्यता आणि वाईट बाह्यता निर्माण होत असतात.

उत्पादनाच्या प्रक्रियेच्या वेळी हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण तसेच ध्वनी प्रदूषण होत असते. मात्र राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनात या प्रदूषणाचा खर्च वजा केला जात नाही. पर्यावरणाच्या प्रदूषणाचे मूल्य राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना विचारात घेणे आवश्यक असते. आर्थिक कल्याणाच्या संकल्पनेत जीवनाचा भौतिक गुणवत्ता निर्देशांक वाढला आहे की, कमी झाला आहे हे सुध्दा पाहणे आवश्यक असते. तसेच सन १९९० पासून UNDP ने मानवी विकास निर्देशांकाची संकल्पना मांडली तिचाही अभ्यास आर्थिक कल्याणाचा अभ्यास करताना करावा लागेल. कारण आर्थिक कल्याण साध्य करण्यासाठी दरडोई उत्पन्नातील वाढीबरोबर दारिद्र्यात घट, आरोग्यात सुधारणा, शैक्षणिक पातळीत सुधारणा आणि सरासरी आयुर्मानात वाढ होणे अपेक्षित असते.

### १.२.३ मूल्यदर्शित्व, तुलनात्मकता आणि कल्याणातील समता (Cardinality, Comparability and Equity in Welfare) :-

कल्याणाच्या अर्थशास्त्रात महत्तम सामाजिक कल्याणाच्या अनुषंगाने पर्यायी आर्थिक अवस्थांचे निकष पडताळणे आवश्यक ठरते. सामाजिक कल्याणाचे मोजमाप करत असताना काही तात्त्विक परिमाणे आणि आंतरव्यक्ति तुलना करणे गरजेचे असते. मात्र दोन्हीही बाबी या वस्तूनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ असतात. तसेच सामाजिक कल्याणाच्या महत्तमीकरणाच्या दृष्टीकोणातून विविध व्यक्तिंची वस्तुनिष्ठ तुलना करणे किंवा त्याआधारे काही प्रमाण निश्चित करणे अशक्य असते. त्यादृष्टीने विविध अर्थशास्त्रज्ञांनी सामाजिक कल्याणाच्या महत्तमीकरणासाठी निरनिराळे निकष सुचविले आहेत. त्यापैकी काही प्रमुख निकषांचा आपण अभ्यास करणार आहोत.

✳ **मूल्यदर्शित्व निकष** (Cardinalist Criterion) :-

विविध अर्थशास्त्रज्ञांनी कल्याणाचा निकष म्हणून घटत्या सिमांत उपयोगितेच्या तत्त्वाचा विचार समोर आणला. हा निकष आपणांस पुढील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल. उदा. समाजामध्ये तीन व्यक्ती आहेत. अ, ब आणि क. यापैकी 'अ'चे उत्पन्न १००० रुपये आहे, तर 'ब' आणि 'क'चे उत्पन्न प्रत्येकी ५०० रुपये आहे. त्यामुळे 'अ' उपभोक्ता हा 'ब' आणि 'क' उपभोक्त्यांच्या तुलनेत दुप्पट वस्तू खरेदी करू शकतो, तेंव्हा घटत्या सिमांत उपयोगितेच्या तत्वानुसार 'अ' उपभोक्त्यांची एकूण उपयोगिता ही 'ब' किंवा 'क' उपभोक्त्यांच्या उपयोगितेच्या निम्मी असेल. कारण 'अ' उपभोक्त्याची पैशाची सिमांत उपयोगिता ही 'ब' किंवा 'क' उपभोक्त्याच्या सिमांत उपयोगितेपेक्षा कमी असते. सामाजिक कल्याणात वृध्दी करावयाची असल्यास एकूण उत्पन्न हे तीन उपभोक्त्यांमध्ये पुन:र्वितरण करण्याची आवश्यकता असते. थोडक्यात मूल्यदर्शी दृष्टीकोणानुसार समाजातील सर्व घटकांच्या उत्पन्नात समानता आणल्यास महत्तम सामाजिक कल्याण साधले जाऊ शकते.

मूल्यदर्शी दृष्टीकोणानुसार कल्याण हा महत्त्वपूर्ण प्रवाह आहे. यामध्ये असे गृहीत धरले आहे की, प्रत्येक उपभोक्त्याचे एक वैशिष्ट्यपूर्ण पैशाचे उपयोगिता फलन असते, म्हणून तर सर्वांमध्ये संपत्तीचे वाटप समान पध्दतीने केल्यास पैशाची सीमांत उपयोगिताही समान होईल. हे गृहीतक अत्यंत प्रबळपणे मांडले

आहे. प्रत्येक उपभोक्त्यांचा पैशाच्या बाबतीतील दृष्टीकोण हा भिन्न स्वरूपाचा असतो. श्रीमंत व्यक्तीचे पैशाच्या फलनाची उपयोगिता व गरीब व्यक्तिच्या पैशाच्या फलनाची उपयोगिता यामध्ये खूप मोठे अंतर असते. अशाप्रकारच्या स्थितीमध्ये उत्पन्नाचे पुन:र्वितरण (अधिक समानतेच्या दृष्टीकोणासाठी) काही प्रमाणात एकूण कल्याणात घट सुरू होण्यास कारणीभूत ठरू शकते.

मूल्यदर्शी दृष्टीकोणाच्या विरुध्द दृष्टीकोन असणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांच्या मते, उत्पन्नाच्या समान वाटपाचा कल्याणावरील परिणाम हा स्वतंत्रपणे अभ्यासता येत नाही. त्यासाठी साधनसंपत्तीचे समान वाटप हा घटकसुद्धा महत्त्वाचा ठरतो. उत्पन्नाचे समान वाटप हे काही लोकांच्या काम करण्याची प्रेरणा कमी होण्यासाठीही कारणीभूत ठरू शकते. परिणामी एकूण राष्ट्रीय उत्पन्नावर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्याचवेळी उत्पन्नाच्या समान वाटपाचा परिणाम म्हणून सर्व प्रकारच्या साधनसंपत्तीचेही समान वाटप होऊन सर्व रोजगार करणारे लोकांचा एकूण उत्पादनातील हिस्सा हा कमी असू शकतो. या दोन्ही बाबींमध्ये उत्पन्नातील समानता (पॅरेटो दृष्टीकोण) ही साधनसंपत्तीचा अकार्यक्षम वापर आणि सामाजिक कल्याणातील घट असा परिणाम होऊ शकतो.

पॅरेटोच्या निकषानुसार आर्थिक कार्यक्षमता ही वस्तूनिष्ठपणे मोजता येते. पॅरेटोच्या मते, आर्थिक धोरणामधील कोणताही बदल हा किमान एका व्यक्तिच्या कल्याणात भर टाकताना दुसऱ्या व्यक्तीच्या कल्याणात घट होता कामा नये, तरच सामाजिक कल्याणात वाढ होईल. जर धोरणाचा परिणाम म्हणून एका व्यक्तिच्या कल्याणात वाढ होत असताना दुसऱ्या व्यक्तिच्या कल्याणात घट होत असेल तर एकंदर सामाजिक कल्याणात घट होईल.

## १.२.४ शासन आणि कल्याण (State and Welfare) :-

सरकारच्या अर्थविषयक कार्याचे विविध परिणाम देशाच्या आर्थिक विकासावर होत असतात. सरकारच्या कार्यात गेल्या शतकात सातत्याने वाढ होताना दिसते, त्यामुळे सार्वजनिक आयव्ययाचे महत्त्व वाढत आहे. मानवी समाजाच्या रानटी अवस्थेपासून आधुनिक समूह जीवनपध्दतीच्या अस्तित्वापर्यंत विविध आर्थिक व सामाजिक बदल घडून आलेले आहेत. मानव जसजसा प्रगत होत गेला तसतसा त्यांच्या गरजांमध्ये बदल होऊन वाढ होत गेली. त्यामुळे राज्यांच्या किंवा सरकारच्या जबाबदाऱ्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळेच सरकारची कार्ये वाढलेली दिसतात. सरकार आणि सामाजिक व आर्थिक कल्याण याविषयी विविध दृष्टीकोन मांडले आहेत. त्याचबरोबर विविध प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये सरकारची कल्याणविषयक भूमिका निरनिराळी जाणवते. त्याचा उहापोह आपणांस पुढील प्रमाणे करता येईल.

### १) कल्याणविषयक सनातनवादी दृष्टीकोन :–

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांमध्ये मुख्यत्वे ॲडम स्मिथ व त्या समकालीन अन्य अर्थशास्त्रज्ञांनी भांडवलाशी अर्थव्यवस्थेत स्वयंचलित कार्यपध्दतीमुळे सरकारच्या हस्तक्षेपाची गरज नसते असे मत मांडले. सरकारने फक्त देशाचे संरक्षण, अंतर्गत कायदा व सुव्यवस्था, न्यायदान आणि प्रशासन एवढीच मर्यादित

कार्ये करावीत. त्यांनी समाजाच्या कल्याणाच्या बाबतीत हस्तक्षेप करू नये. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती आपले स्वत:चे हित साधत असताना आपोआपच समाजाचे कल्याण होत असते. व्यक्तीला व्यक्ती स्वातंत्र्य व व्यवसाय स्वातंत्र्य दिल्यामुळेच व्यक्तीगत आर्थिक व्यवहारात व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या अदृश्य स्वरूपाच्या शक्तीमुळे मानवी समाजाचे अधिकाधिक आर्थिक कल्याण साधले जाईल.

कल्याणविषयक अर्थव्यवस्थेतील सरकारची भूमिका स्पष्ट करताना सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी सरकारची काही महत्त्वाची कार्ये सांगितली आहेत, ती आपणांस पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १) राष्ट्राचे संरक्षण :-

भांडवलशाही अर्थव्यवस्था खुल्या व्यापाराची पुरस्कार करणारी असल्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला आर्थिक स्वातंत्र्य असते. अशा समाजाची परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे हे सरकारचे प्रमुख कार्य असते. यासाठी संरक्षण सामग्रीवरील खर्च करणे ही सरकारची जबाबदारी ठरते. सैन्यदलामध्ये देशातील नागरिकांचा सहभाग महत्त्वपूर्ण असतो.

### २) कायदा व सुव्यवस्था :-

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने खाजगी मालकीची असल्यामुळे समाजात गरीब आणि श्रीमंत असे दोन वर्ग स्पष्टपणे दिसून येतात. अशा परिस्थितीत श्रीमंत वर्गाकडून गरीब वर्गावर अन्याय व शोषण होण्याची शक्यता असते, तेव्हा अर्थव्यवस्थेत आदर्श न्यायपद्धती उभारून समाजाला संरक्षण देणे हे सरकारचे प्रमुख कर्तव्य असते. अंतर्गत कलह कमी करणे, लोकांच्या संपत्तीचे संरक्षण करणे यासाठी आदर्श कायदा व न्यायव्यवस्था ठेवण्याचे काम सरकारला करावे लागते.

### ३) पायाभूत सुविधांची उपलब्धता :-

समाजाला शिक्षण, आरोग्य, वाहतुकीच्या सुविधा, धरणे, पिण्याचे पाणी, ऊर्जा यासारख्या सुविधा निर्माण करून त्यांची उपलब्धता समाजाला करून देणे हे सरकारचे कार्य असते. या सुविधा भांडवलशाही अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्रामार्फतही उपलब्ध करून दिल्या जातात. तरीही सरकारमार्फत या सुविधा समाजाला पुरविल्यास समाजाचे महत्तम सामाजिक कल्याण होण्यास मदत होते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सरकारची भूमिका निर्हस्तक्षेपाची असली तरीही मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सरकारने कार्य करण्याची आवश्यकता असते.

### ४) किंमत यंत्रणा मजबूत करणे :-

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र ही दोन्हीही क्षेत्रे कार्यरत असतात. शासनाला सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करीत असताना खाजगी क्षेत्राच्या उपक्रमशिलतेकडे दुर्लक्ष होणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. त्याचबरोबर खाजगी क्षेत्रास प्रोत्साहन देवून उत्पादन व वितरण व्यवस्थेस चालना द्यावी लागते. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशी चलनाचे महत्त्व स्थिर राखण्यासाठी

किंमत यंत्रणा मजबूत करणे आवश्यक असते. कारण किंमत यंत्रणा व महत्तम सामाजिक कल्याण यांचा अत्यंत जवळचा संबंध असतो.

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सरकारने महत्तम सामाजिक कल्याण साध्य करीत असताना काही बाबतीमध्ये सरकारची भूमिका तटस्थ असली पाहिजे. उदा. किंमत यंत्रणेच्या कार्यवाहीत सरकारने तटस्थ असले पाहिजे. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होत असताना सरकारने संरक्षणविषयक धोरणाचा अवलंब करू नये तर खाजगी उद्योगांना प्रोत्साहन देऊन सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी नियंत्रकाची भूमिका पार पाडावी. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेती व उद्योगाच्या विकासासाठी समान धोरण ठेवावे. सरकारने जर स्पर्धेला प्रोत्साहन देवून मक्तेदारीवर नियंत्रण ठेवल्यास खुल्या अर्थव्यवस्थेत खऱ्या अर्थाने महत्तम सामाजिक कल्याण साध्य करता येईल.

### ✷ आधुनिक भांडवलशाहीतील सरकारची कल्याणविषयक भूमिका :-

सरकारच्या कल्याणविषयक भूमिकेबद्दलचा सनातनवादी दृष्टीकोन खुल्या व्यापार धोरणावर आधारलेला होता. ॲडम स्मिथसारख्या अर्थशास्त्रज्ञांनी निसर्ग नियमांवर भर दिल्यामुळे व्यक्तीच्या आर्थिक स्वातंत्र्यप्रणित व्यवहारात तांत्रिक प्रगतीचा विचार केला नव्हता. २०व्या शतकात भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोष स्पष्टपणे दिसू लागले. वर्गभेद, गरीब-श्रीमंत मक्तेदारी गृहे यासारख्या समस्या निर्माण होऊ लागल्या, त्यामुळे सनातनवादी दृष्टीकोनाचा पुर्नविचार करण्याची आवश्यकता भासू लागली. अलीकडील काळात भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सरकारच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल दिसून येत आहेत व विकास प्रक्रियेतील आर्थिक व्यवहार अधिकाधिक समाजाभिमुख होताना दिसत आहे. सामाजिक कल्याण साध्य करीत असताना सरकारने संरक्षण, अंतर्गत कायदा व सुव्यवस्था, न्यायदान व प्रशासन या कार्याबरोबरच जनहिताची कामे केली पाहिजेत, हा विचार पुढे येत आहे. सरकारची भूमिका ही फक्त 'पोलीसी राज्य' अशी न राहता ती 'कल्याणकारी राज्य' झाली पाहिजे. हा दृष्टिकोन मान्य झाला आहे. त्यामुळेच भांडवलशाहीत सार्वजनिक आयव्ययाच्या स्वरूप व व्याप्तीत बदल झाला आहे. समाजाला आवश्यक ते शिक्षण पुरविणे, आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, बेरोजगारी व दारिद्र्य कमी करणे, समाजाच्या राहणीमानात वाढ घडवून आणणे, व्यापार चक्रावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक विषमता कमी करणे यासारखी कार्ये ही सरकारची मुख्य कार्ये समजली जात आहेत. थोडक्यात जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्विकार केला असल्यामुळे सरकारची अर्थव्यवस्थेतील भूमिका बदलत आहेत.

### ✷ समाजवादी अर्थव्यवस्थेतील सरकारचा कल्याणविषयक दृष्टीकोन :-

२०वे शतक हे समाजवादाचे शतक म्हणून ओळखले जाते. १९व्या शतकाच्या शेवटी भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोष समोर येऊ लागले. ज्या शक्तींनी भांडवलशाहीच्या विकासाला हातभार लावला त्याच शक्ती भांडवलशाहीच्या विकसित अवस्थेत विनाशाला कारणीभूत ठरल्या. भांडवलशाही अर्थव्यवस्थेला एक पर्याय म्हणून समाजवादी अर्थव्यवस्थेचा उगम झाला. समाजवादाच्या मूळ कल्पनेने सर्वच स्तरातील व्यक्तींना प्रभावित केले.

समाजवादी समाज हे एक असे आर्थिक संघटन आहे की, ज्याच्या अंतर्गत एक साधारण आर्थिक योजनेनुसार उत्पादनांच्या भौतिक साधनांवर संपूर्ण समाजाची मालकी राहते तसेच समान अधिकारांच्या अधिकारावर समाजाचे सर्व घटक समाजवादी नियोजनाच्याद्वारे करण्यात आलेल्या उत्पादनांचा फायदा मिळवितात. समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी उत्पादनांच्या साधनांवर असलेली विशिष्ट वर्गाची मालकी नष्ट करणे आणि जमीन व भांडवल यावर समाजाची मालकी असणे या दोन गोष्टी आवश्यक आहेत. वर्गहीन समाज आणि जमीन व भांडवलदार समाजाची मालकी असलेली अर्थव्यवस्था म्हणजेच समाजवादी अर्थव्यवस्था होय.

समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादक साधनांचा उपयोग व्यक्तीगत नफा मिळविण्यासाठी न करता समाजाचे व्यापक हित लक्षात घेऊन केला जातो. अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या साधनावर असणारा वर्ग व मालकी नसणारा वर्ग असे दोन वर्ग अस्तित्वात नसतात. समाजातील सर्व व्यक्तींना विकासाची समान संधी प्राप्त होते. सरकारच्या सर्व प्रकारच्या धोरणांचा मुख्य उद्देश महत्तम सामाजिक कल्याण हाच असतो. आर्थिक सामाजिक विषमता नष्ट करून समानता प्रस्थापित करण्यासाठी सरकारी पातळीवर आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातात. या अर्थव्यवस्थेत समाजातील कोणत्याही व्यक्तीची पिळवणूक होत नसते. ज्या व्यक्ती उपजिविकेसाठी शारीरिक कष्ट करण्यास असमर्थ असतात. अशा व्यक्तींची काळजी सरकार स्वत: घेते. केंद्रीय नियोजनांच्या माध्यमातून सामाजिक विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र समाजवादी अर्थव्यवस्थेतसुद्धा काही प्रामणात व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा अभाव, सरकारच्या मक्तेदारीची शक्यता, ग्राहकांच्या सार्वभौमत्वाचा लोप, हुकूमशाहीला प्रोत्साहन आणि अकार्यक्षम सार्वजनिक क्षेत्र अशा प्रकारचे दोष दिसून येतात.

## ✡ मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकारची कल्याणविषयक भूमिका :-

२०व्या शतकातील महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्यात भांडवलशाही अर्थव्यवस्थेला अपयश आले. १९५० नंतर स्वतंत्र झालेल्या बहुतांश आशियायी देशांनी समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांच्या सहअस्तित्व व सहभागामुळे सर्वसामान्य लोकांचे महत्तम कल्याण साधणे हे मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट होते. भारतासारख्या खंडप्राय देशानेसुध्दा १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जलद आर्थिक विकासासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेतील दोष पाहून चांगले गुण विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो. भांडवलशाहीत खाजगी उपक्रमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे सर्वसामान्य जनतेकडे फारसे लक्ष दिले जात नव्हते. परिणामी गरीब आणि श्रीमंत अशी दरी स्पष्टपणे दिसून येत होती. मात्र मिश्र अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासाची मुळे समाजातील सर्वच स्तरातून लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. मिश्र अर्थव्यव्थेत सरकार सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचा विस्तार आणि विकास कशाप्रकारे घडवून आणते यावरच सामाजिक कल्याण अवलंबून असते. त्यादृष्टीने मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकारची कल्याणविषयक भूमिका आपणांस पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

## १) सार्वजनिक क्षेत्राचा विकास :-

देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यामध्ये सार्वजनिक क्षेत्राची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. मूलभूत आर्थिक व सामाजिक सुविधांच्या निर्मितीसाठी खाजगी क्षेत्राकडून अपेक्षित गुंतवणूक होत नसते. कारण या क्षेत्रातील गुंतवणूकीत लाभक्षमता कमी असते. या प्रकल्पातील गुंतवणूक दीर्घकालीन स्वरूपाची असते. तसेच कामे करताना सरकारला मोठ्या प्रमाणात तुटीचा अर्थभरणा करावा लागला. त्यातूनच सार्वजनिक कर्जाची समस्या वाढत गेली. कल्याणात वाढ करण्याच्या प्रक्रियेत सार्वजनिक आयव्यात मात्र असमतोल निर्माण झाल्याचे दिसते.

## २) सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात समन्वय साधणे :-

मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक क्षेत्राला जरी महत्त्वाचे स्थान असले तरी विविध समाजपयोगी प्रक्रियेत, सेवा व सुविधा निर्माण करण्यासाठी खाजगी क्षेत्राची मदत घेणे क्रमप्राप्त ठरते. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत खाजगी क्षेत्राचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. लघु व कुटीरोद्यागांच्या माध्यमातून उपभोक्त्यांना आवश्यक वस्तूंची निर्मिती करून खाजगी क्षेत्र राष्ट्रीय उत्पन्न वृध्दीत महत्त्वाची भूमिका बजावते. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील समन्वय साधल्यामुळे व त्या क्षेत्रामार्फत अर्थव्यवस्थेत गुंतवणूक झाल्यामुळे देशातील समाजाच्या कल्याणात भर पडते.

मिश्र अर्थव्यवस्थेतील समाजाच्या कल्याणासाठी सरकारने आर्थिक विकासाचे विविध कार्यक्रम आणि धोरणे राबविताना आर्थिक नियोजनाचा वापर केला. नियोजित आर्थिक विकासात सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रामार्फत समाजाचे महत्तम कल्याण साधताना काही मर्यादा पडतात. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करताना खाजगी क्षेत्रावर बंधने घालताना विकास प्रक्रिया सर्वकष स्वरूपात राबविणे अशक्य होते. देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग व उत्पन्नातील विषमता यामध्ये अंतर निर्माण होऊन महत्तम सामाजिक कल्याण साध्य करता येत नाही. लोकसंख्यावाढ व बेरोजगारी नियंत्रित करण्यासाठी सरकारला अपयश येते. तसेच सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यास अडचणी निर्माण होतात. मिश्र अर्थव्यवस्थेत सरकारचा देशातील विविध वित्तीय संस्थांवर अंकुश असणे आवश्यक असते. तिचा फलधारणा कालावधीही जास्त असतो. वाहतूक व दळणवळण, बँकिंग पाणीपुरवठा या सामाजिक सुविधांबरोबरच लोखंड, पोलाद, सिमेंट, कापड उद्योग, विमानतळ, अनुशक्ती विकास, रेल्वे, विजनिर्मिती यासारख्या मूलभूत उद्योगामध्ये सार्वजनिक क्षेत्रामार्फत गुंतवणूक करून त्यांचा विकास करण्याची जबाबदारी सरकारची असते. त्याचबरोबर देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरते. थोडक्यात महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राचा विकास करणे ही पूर्व अट ठरते.

## ३) खाजगी क्षेत्राचा विकास :-

मूलभूत व अवजड उद्योगांच्या विकासात सरकारची भूमिका महत्त्वाची असली तरी मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्रासाठी योग्य स्थान देण्याची आवश्यकता असते. अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास घडवून

आणण्याच्या दृष्टीने खाजगी उपक्रमशिलतेला वाव देणे आवश्यक असते. खाजगी क्षेत्राच्या साहाय्याने शहरी व ग्रामीण विकास, रोजगार निर्मिती, उद्योगांच्या विकास व आंतरराष्ट्रीय व्यापारात वृध्दी घडवून आणता येते. यातूनच समाजाच्या उत्पन्न पातळीत वाढ होऊन महत्तम कल्याण साधणे शक्य होते.

### ४) विकास कार्यास निधीची उपलब्धता करणे :-

मिश्र अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. हे भांडवल सरकार कर, सार्वजनिक कर्ज आणि सार्वजनिक उपक्रमातून मिळणाऱ्या नफ्यातून प्राप्त करते. देशात बचत आणि भांडवल निर्मिती करण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागात बँकिंगच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतात. लोकांची बचत अधिकाधिक वाढावी म्हणून आकर्षक योजना आखल्या जातात. आर्थिक विकासाची मानवाला आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती यंत्रणा नियंत्रित ठेवणे सरकारला शक्य न झाल्यामुळे नियोजित अर्थव्यवस्थेत सरकारची भूमिका संकुचित झाली. भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेचे दुष्परिणाम दूर करणे व सामान्य लोकांचे राहणीमान उंचावण्याचे कार्य मिश्र अर्थव्यवस्थेत सरकारने करणे आवश्यक आहे.

## ✡ आर्थिक सुधारणा कालखंड आणि सरकारचा कल्याणविषयक दृष्टीकोन :-

जगातील बहुसंख्य अर्थव्यवस्था आज जागतिकीकरणाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. भारतानेही १९९१ पासून आर्थिक सुधारणांचा अवलंब केला आहे. नव्या आर्थिक धोरणाची उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण ही त्रिसूत्री आहे. या त्रिसूत्रीच्या मार्गाने जात असताना भारतीय अर्थव्यवस्थेतील सरकारचा हस्तक्षेप देखील कमी होत आहे. काही महत्त्वाचे उद्योग सार्वजनिक क्षेत्राच्या ताब्यात ठेवून बाकीचे सर्व उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले केलेले आहेत. दूरसंचार, दळणवळण, ऊर्जा, विमा यासारखी क्षेत्रे भारतातील खाजगी गुंतवणूकदारांबरोबरच विदेशी गुंतवणूकही खुली केली आहेत. या धोरणांच्या साहाय्याने भारतीय अर्थव्यवस्था जगातील इतर राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांशी निगडीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अशा प्रकारच्या आर्थिक सुधारणा होत असल्यातरी समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने सरकारची भूमिका महत्त्वाची ठरते.

ज्या क्षेत्रामध्ये सरकारचा हस्तक्षेप अतिरिक्त आहे, तो कमीकरणे आणि जिथे सरकारी हस्तक्षेप अपुरा आणि निष्प्रभ आहे तेथे तो संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या वाढविणे गरजेचे आहे. उदा. शिक्षण, आरोग्य, भूसुधारणा, सामाजिक सुरक्षितता आणि सामाजिक न्याय या क्षेत्राला सरकारचा हस्तक्षेप असणे आवश्यक आहे.

साक्षरतेच्या प्रसारामुळे आर्थिक वृध्दीचा पाया रुंदावेल, शाश्वत विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान होईल आणि गरीबांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढेल, यासाठी सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. हे करीत असताना राजकीय सुधारणांना बराचसा वाव आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण हे तितकेच महत्त्वाचे आहे, तसेच बाजार यंत्रणा आणि सरकार यांचा सुयोग्य समन्वय साधणे हे सुध्दा अत्यंत महत्त्वाचे आहे.

आर्थिक विकास आणि कल्याणाच्या संदर्भात जागतिक निर्देशांक, मानव विकास निर्देशांक याशिवाय इतरही काही निर्देशांक अलीकडील काळात मांडले गेले आहेत. उदा. क्रयशक्ती समता निर्देशांक, लिंगाधारीत विकास निर्देशांक, स्त्री सबलीकरण निर्देशांक यांचा उल्लेख करावा लागेल.

भारतासारख्या देशात आर्थिक सुधारणा कालखंडात 'सर्वसमावेशक विकास' या संकल्पनेवर अधिक भर दिला जात आहे. सर्वसमावेशक विकासातून महत्तम कल्याण साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सर्वसमावेशक विकास = भौतिक विकास (दरडोई उत्पन्न) + सामाजिक किंवा मानवी विकास (शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, मुलभूत सेवा इ.)

१२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये 'जलद, शाश्वत आणि सर्वसमावेशक वृध्दी' हे प्रमुख उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून समाजाचे जास्तीत जास्त कल्याण साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. शाश्वत आर्थिक कल्याणाच्या निर्देशांकामध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनाबराबेरच गुन्हेगारीचे प्रमाण आणि निर्मूलन, राष्ट्रीय उत्पन्नाचे न्याय वाटप यासारख्या बाबींचा विचार केला जातो. थोडक्यात, आर्थिक सुधारणा कालखंडात कल्याणाच्या दृष्टीकोनात विविधांगी स्वरूपात बदल होताना दिसतो.

## ❑ जागतिकीकरण आणि कल्याण :-

जागतिकीकरण हा शब्द व संकल्पना गेल्या तीन दशकांपासून जगभरात सर्वत्र वापरली जाते. किंबहुना जगभरात प्रगतीचा तो परवलीचा शब्द बनला आहे. जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणीमान, शासन, समाजव्यवस्था व संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रामधून होत राहणारे रूपांतर होय. जागतिकीकरणाच्या प्रकियेत आर्थिक कार्याचा विस्तार हा देशाच्या राजकीय सीमांच्या पलीकडे केला जातो. तसेच भांडवल, सेवा व श्रमिक यांच्यासाठी मुक्त वातावरण निर्माण होते. औद्योगिक वस्तू, शेतमाल, भांडवल गुंतवणूक, श्रम, सेवा, उद्यमशीलता व बौध्दिक संपदा इत्यादीच्या व्यापार जागतिक स्तरावर निर्बंधरहित झाला तर त्यात भरपूर वाढ होईल आणि त्याचा फायदा सर्वच देशांना मिळून त्यांची प्रगती शक्य होईल. या गृहितकावर आधारित सध्या जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू आहे.

जागतिकीकरणाची संकल्पना काही सैदधांतिक आधारावर उभारली आहे. उदा. तौलनिक लाभाचा सिध्दांत, मुक्त स्पर्धा आणि निर्हस्तक्षेपाचे धोरण या बाबी जागतिकीकरणात अभिप्रेत आहेत. जगातील व्यापार करणाऱ्या दोन देशांना तौलनिक लाभ प्राप्त होण्यासाठी साहजिकच व्यापार मुक्त असायला हवा. त्यावर कोणत्याही प्रकारचे निर्बंध असू नयेत. तरच मुक्तपणे वस्तू व सेवांची देवाण-घेवाण होऊन व्यापाराचे लाभ दोन देशांना प्राप्त होतील. तौलनिक लाभ आणि स्पर्धा यांचा एकत्रित अपेक्षित परिणाम म्हणजे मोठ्या प्रमाणात उत्पादन, उच्च दर्जाचे उत्पादन, उत्पादनात विविधता, वाजवी उत्पादन खर्च, नवीन तंत्रज्ञानांचा विकास, उद्योगांना प्रोत्साहन, रोजगार वृध्दी आणि उत्पन्नात वाढ या सर्वांमुळे देशाची आर्थिक प्रगती व समाजाचे महत्तम कल्याण साध्य होते.

अर्थव्यवस्था जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामील झाल्यामुळे देशाला अनेक लाभ प्राप्त होतात व समाजाच्या आर्थिक कल्याणात वाढ घडून येते. हे आपणांस पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### १) स्पर्धात्मकतेत वाढ :-

जागतिकीकरणामुळे उत्पादनाच्या क्षेत्रात स्पर्धात्मकता वाढते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी व्यावसायिक संस्था आपली कार्यक्षमता उंचावण्याचा प्रयत्न करतात. नवनव्या तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनात संख्यात्मक व गुणात्मक वाढ घडवून आणतात. उत्पादन खर्चात घट करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचबरोबर उत्पादनात नवप्रवर्तन आणले जाते. या सर्व बाबींचा फायदा समाजाला होऊन समाजाच्या कल्याणात वाढ होण्यास मदत होते.

### २) तंत्रविषयक लाभ :-

जागतिकीरकणाच्या प्रक्रियेत देशातील उत्पादन क्षेत्राची रचना व व्याप्ती यामध्ये बदल होतो. विविध क्षेत्रात उत्पादनात नवप्रवर्तन आणले जाते. वितरण, माहिती व दळणवळण, पॅकेजिंग, वाहतूक,वित्तीय व्यवहार व व्यवस्थापन यामध्ये नव्या तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. तसेच जागतिक बाजारपेठेची उपलब्धता व त्यानुसार निर्यात करणे शक्य होते. काहीवेळा देशांतर्गत बाजारपेठेत घसरण असताना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा लाभ घेणे शक्य होते.

### ३) करार पध्दतीचा उपयोग :-

जागतिकीकरणामुळे अनेक व्यावसायिक संस्थांना आपल्या उत्पादनासंबंधी ज्या बाबी निर्माण करणे अधिक खर्चिक असते किंवा काही कामे स्वत: करणे अधिक खर्चिक असते अशावेळी ती कामे किंवा वस्तू बाहेरील देशातून करार पध्दतीने करून घेणे शक्य होते. त्यामुळे अशा उद्योगसंस्थांची कार्यक्षमता वाढते. तसेच देशातील उद्योगसंस्थांना ज्या उत्पादनात तुलनात्मक लाभ अधिक आणि अशा उत्पादनात विशेषीकरण करणे शक्य होते. जागतिकीकरणामुळे किंमतीतील आंतरराष्ट्रीय तफावती कमी होतात. परिणामी किंमत स्थैर्य निर्माण होण्यास मदत होते.

### ४) भांडवलनिर्मितीचा वेग वाढतो :-

अर्थव्यवस्था जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत संम्मिलित झाल्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय गुंतवणूक वाढते. देशातील विविध क्षेत्रे विदेशी गुंतवणूकदारांसाठी खुली केल्यास विदेशी थेट गुंतवणूक व विदेशी संख्यात्मक गुंतवणूक या दोन्हीमध्ये वाढ होते. त्यामुळे भांडवल निर्मितीचा दर उंचावतो. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य वाढीस लागते. त्याचबरोबर देशातील उत्पादन क्षमतेचा जास्तीत जास्त वापर होऊन उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होते व समाजाच्या दरडोई उत्पन्न वाढीस मदत होते.

### ५) सामाजिक आर्थिक विषमतेत वाढ :-

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उत्पादन क्षेत्राबरोबरच व्यक्तीसाठी विविध संधी प्राप्त होतात. त्यातून

समाजाच्या उत्पन्नात वाढ होते. उपभोगात वाढ होते व एकंदरीतच समाजाचे राहणीमान उंचावण्यास मदत होते. सामाजिक विकास व आर्थिक विकास हे एकमेकांशी निगडीत असल्याने दोन्हीतही वृध्दी होते. परिणामी जागतिकीरकणाचा परिणाम म्हणून लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होते.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात गेल्या २५ वर्षात राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नात लक्षणीय प्रमाणात वाढ घडून आली आहे. राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर हा आर्थिक सुधारणा कालखंडापूर्वीच्या दरापेक्षा नेहमीच जास्त राहिला आहे. अर्थव्यवस्थेतील बचत, गुंतवणूक व भांडवलनिर्मितीच्या प्रमाणातही वाढ झाली. भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा १% वरून २% पर्यंत वाढला आहे, याचा अर्थ जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेला मिळालेले लाभ समाजाचे कल्याण महत्तम करण्यासाठी उपयुक्त ठरतात.

जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्था व समाजाच्या कल्याणासाठी फायदा होत असला तरी त्यातून काही प्रश्नही निर्माण होताना दिसतात. उदा. चलनवाढ, बेरोजगारी, दारिद्र्य, गरीब व श्रीमंत वर्गातील रुंदावणारी दरी, व्यापारचक्रे, चलनाचे अवमूल्यन, राष्ट्राचे वाढणारे परावलंबन, समाजाचा वाढता चंगळवाद, व्यवहारतोलातील तूट यासारखे प्रश्न जागतिकीकरणातून समोर येतात. या प्रश्नांची तीव्रता कमी करणे, त्यासाठी विविध धोरणे व कार्यक्रमांची आखणी करून त्यांची अंमलबजावणी करणे, अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता व स्पर्धात्मकता वाढविणे गरजेचे ठरते. सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने विशेषत: महिला व बालकल्याण आणि सामाजिक सुरक्षितता भक्कम करणे आवश्यक असते. तरच जागतिकीकरणातून महत्तम सामाजिक कल्याण साध्य करता येते.

## १.३ सारांश

कल्याणकारी अर्थशास्त्र मानवी कल्याणाचा विचार करते. मानवी जीवनात संपत्तीऐवजी भौतिक कल्याण किंवा ऐहिक सुख हे प्रमुख साध्य आहे. मानवाच्या कल्याणाच्या आधारावर मांडणी केलेल्या अर्थशास्त्रास कल्याणकारी अर्थशास्त्र असे म्हणतात. सर्वसाधारण कल्याणामध्ये आर्थिक व सामाजिक कल्याण या दोन्ही संकल्पना समाविष्ट होतात. सर्वसाधारण कल्याणाचा शोध घेणे हे क्लिष्ट काम आहे. त्यामुळे कल्याणकारी अर्थशास्त्रात आर्थिक कल्याणाचाच विचार केला जातो. राष्ट्रीय उत्पन्न आणि कल्याण यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबर त्या उत्पन्नाचे समान वाटप होणे ही बाब आर्थिक कल्याण महत्तम करण्यास कारणीभूत ठरते. जगात विविध राष्ट्रांमध्ये विविध स्वरूपाच्या अर्थव्यवस्था यांचा प्रामुख्याने समावेश होतो. यामध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था, समाजवादी अर्थव्यवस्था, मिश्र अर्थव्यवस्था यांचा प्रामुख्याने समावेश होतो. आर्थिक व सामाजिक कल्याणाच्या बाबतीत या अर्थव्यवस्थांमधील सरकारची भूमिका ही सुध्दा निरनिराळी दिसून येते.

सन १९९१ पासून जगातील अनेक राष्ट्रांनी जागतिकीकरणाचा स्विकार केला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक कल्याणाची परिभाषाही बदलत गेल्याचे दिसून येते.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१) **आर्थिक कल्याण :** सामान्य कल्याणाचा जो भाग फक्त आर्थिक तत्त्वावर अवलंबून असतो.

२) **बाह्यता :** बाह्य चांगले किंवा वाईट परिणाम.

## १.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

### अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) प्रा. एडविन कॅननने ..................... या ग्रंथात अर्थशास्त्राच्या व्याख्येत मानवी कल्याणास महत्त्व दिले आहे.

*अ) कल्याणकारी अर्थशास्त्र* *ब) संपत्ती*

*क) दुर्मिळतेचे अर्थशास्त्र* *ड) मानवी वर्तवणूक.*

२) कल्याणकारी अर्थशास्त्रास ................. असेही संबोधले जाते.

*अ) वस्तूनिष्ठ शास्त्र* *ब) आदर्शवादी शास्त्र*

*क) नैसर्गिक शास्त्र* *ड) व्यक्तिनिष्ठ शास्त्र*

३) प्रा. पिगू यांनी ............... या ग्रंथात आर्थिक कल्याणाचे विवेचन केले आहे.

*अ) संपत्तीचे अर्थशास्त्र* *ब) कल्याणाचे अर्थशास्त्र*

*क) आर्थिक कल्याण* *ड) आदर्शवादी शास्त्र.*

४) राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरण व कल्याण यामध्ये ............... संबंध असतो.

*अ) व्यस्त* *ब) सम* *क) घटता* *ड) यापैकी नाही.*

### ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कल्याणकारी अर्थशास्त्र म्हणजे काय?

२) कल्याणविषयक सनातनवादी दृष्टीकोण काय आहे?

३) कल्याणाच्या दोन संकल्पना सांगा.

४) कल्याणावर परिणाम करणारे आर्थिकेतर घटक सांगा.

५) निव्वळ आर्थिक कल्याण म्हणजे काय?

## १.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)** *१) ब) संपत्ती.*

२) *ब) आदर्शवादी शास्त्र.*

३) *ब) कल्याणाचे अर्थशास्त्र.*

४) *ब) सम.*

**ब)** १) कल्याणकारी अर्थशास्त्र हे अर्थशास्त्राच्या सिध्दांताचा असा भाग आहे की, जो मुख्यत्वे आर्थिक धोरणाच्या निश्चितेशी संबंधित असतो.

२) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्वयंचलित कार्यपद्धतीमुळे सरकारच्या हस्तक्षेपाची गरज नसते. सरकारने देशाचे संरक्षण, अंतर्गत कायदा व सुव्यवस्था, न्यायदान आणि प्रशासन एवढीच मर्यादित कार्ये करावीत.

३) आर्थिक कल्याण व सामाजिक कल्याण.

४) राजकीय किंवा धार्मिक स्वातंत्र्य, रोगांचा प्रादुर्भाव, सरासरी आयुर्मान, बालमृत्यूचे प्रमाण इ.

५) निव्वळ आर्थिक कल्याण = वास्तव स्थूल राष्ट्रीय उत्पादन – घसारा + विश्रांतीचे मूल्य + वैयक्तिक सेवा – पर्यावरणाचे प्रदूषण.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

### अ) टीपा लिहा.

१) कल्याणाची संकल्पना.

२) राष्ट्रीय उत्पन्न व कल्याण.

३) कल्याणविषयक सनातनवादी दृष्टीकोण.

४) मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकारची कल्याणविषयक भूमिका.

५. जागतिकीकरण व कल्याण.

### ब) दीर्घोत्तरी प्रश्न.

१) राष्ट्रीय उत्पन्न आणि कल्याण यातील संबंध स्पष्ट करा.

२) कल्याणविषयक विविध दृष्टीकोण स्पष्ट करा.

३) मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकारची भूमिका विशद करा.

४) मूल्यदर्शित्व, तुलनात्मकता आणि कल्याणाची समानता यावर सविस्तर टिप्पण लिहा.

५) जागतिकीकरणाच्या काळातील सरकारची कल्याणविषयक भूमिका स्पष्ट करा.

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **A. Koutsoyiannis :** *"Modern Microeconomics"*, International Edition, MacMillan Press Ltd.

२. **K. K. Dewett :** *"Modern Economic Theory"*, S. Chand & Company Ltd., 2nd Edition, 2005.

३. **H. L. Ahuja :** *"Advanced Economic Theory"*, S. Chand & Company Ltd., 13th Edition, 2003.

४. **एम. एन. शिंदे :** *'सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र'*, अजित पब्लिकेशन्स, इस्लामपूर, प्रथमावृत्ती, २००३.

५. **कृष्णराव पाटील :** *'उच्चतर आर्थिक सिध्दांत'*, मंगेश प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती, २००७.

❀❀❀

घटक-२

# पूर्व-पॅरेटो कल्याणकारी अर्थशास्त्र

## ( Pre-Paretian Welfare Economics )

---

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

  २.२.१ बेन्थम यांचा समग्र कल्याण दृष्टीकोन

  २.२.२ मार्शल यांचे कल्याणकारी अर्थशास्त्र

  २.२.३ हिक्सच्या उपभोक्ता संतोषाधिक्याच्या चार संकल्पना

  २.२.४ उपभोक्ता संतोषाधिक्य आणि कर उदार विश्लेषण

२.३ सारांश/समारोप

२.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

१. बेन्थम यांचा समग्र कल्याण दृष्टीकोन म्हणजे काय ते समजेल.

२. मार्शल यांचे कल्याणकारी अर्थशास्त्र म्हणजे काय ते समजेल.

३. हिक्सच्या उपभोक्ता संतोषाधिक्याच्या चार संकल्पना समजून येतील.

४. उपभोक्ता संतोषाधिक्य आणि कर उदार विश्लेषण समजून येईल.

## २.१ प्रस्तावना

वास्तविक अर्थशास्त्रामध्ये उत्पादन घटकाच्या साहाय्याने उत्पादन कसे केले जाते याचे विवेचन केले जाते. वस्तूचे उत्पादन, उपभोग व त्याचबरोबर वितरण इ.चा अभ्यासही वास्तविक अर्थशास्त्रात केला जातो. ॲडम स्मिथ यांनी १७७६ मध्ये त्यांच्या प्रकाशित झालेल्या "An Enquiry into the Nature and Causes

of Wealth of Nations" या ग्रंथामध्ये अर्थशास्त्र हे संपत्तीचे शास्त्र आहे असे म्हटले. या शास्त्रामध्ये फक्त संपत्ती निर्माण व विनियोग यांचा विचार केला जातो असेही म्हटले. मात्र कल्याणकारी अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाचा विचार करते. डॉ. मार्शल यांच्या मते, मानवी जीवनात संपत्ती हे अंतिम साध्य नसून ते कल्याण साध्य करण्याचे साधन आहे. भौतिक कल्याण व ऐहिक सुख हे संपत्तीच्या साहाय्याने साध्य करता येते. त्यांच्या मते, मनुष्याच्या कल्याणाच्या आधारावर मांडणी केलेल्या शास्त्रास कल्याणकारी अर्थशास्त्र म्हटले जाते. कल्याणकारी अर्थशास्त्रात समाजाच्या कल्याणाचा विचार केला जातो. महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी योग्य धोरणाचा वापर कशाप्रकारे केला जावा याबद्दल मार्गदर्शन केले जाते. अलिकडील काळात मानवी कल्याणाबाबत मोठ्या प्रमाणात विश्लेषण व विवेचन करण्यावर भर दिला जातो. देशाच्या अर्थव्यवस्थेत धोरणे निश्चित करताना मानवी कल्याणाचा विचार अग्रक्रमाने केला जात आहे. अलिकडील काळातील सर्वच राष्ट्रातील सरकारे स्वत:स कल्याणकारी सरकारे असल्याचेही सांगत आहे. एकूणच शासकीय धोरणे निश्चित करताना मानवी कल्याणाचा विचार अग्रक्रमाने केला जात आहे. मानवी कल्याण वाढविण्यासाठी प्रा. बेन्थम यांनी समाजातील सर्वच लोकांच्या कल्याणाचा विचार मांडला. कल्याणातील विषमता कमी करण्यावर त्यांनी जास्त भर दिलेला आहे. मानवी कल्याणाचा विचार करताना संसाधनांचाही विचार करणे आवश्यक असते. संसाधनांची वाटणी हा अर्थशास्त्रातील महत्त्वाचा निर्णय आहे. संसाधनांची वाटणी धोरणानी निश्चित होते. शासनाचे उद्दिष्ट्य हे संसाधनाची पर्याप्त वाटणी करणे हे असते. व्यक्तीच्या कल्याणातील वाढ ही उपभोक्ता संतोषाधिक्यावरून लक्षात येते. जेवढे उपभोक्ता संतोषाधिक्य जास्त तेवढे कल्याण जास्त. उपभोक्ता संतोषाधिक्य व व्यक्तिगत कल्याण यामध्ये सम संबंध असतो. उपभोक्ता संतोषाधिक्य हे विविध प्रकारचे असते, हे हिक्स यांनी विश्लेषण करून सांगितले आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ बेन्थम यांचा समग्र कल्याण दृष्टीकोन

जेरेमी बेन्थम यांना आधुनिक उपयोगिता वादाचे (Utilitarianism) संस्थापक म्हणून ओळखले जाते. कल्याणकारी विकासाचा मूलभूत विचार बेन्थम यांनी मांडला. त्यांनी त्यांच्या विश्लेषणात व्यक्ती स्वातंत्र्यावर भर दिला. राज्याला चर्चपासून वेगळे करण्याचा विचार मांडला, महिलांना समान अधिकार असावेत याचा पुरस्कार केला, घटस्फोटाच्या अधिकाराची मागणी केली व गुलामगिरीचे उच्चाटन झाले पाहिजेत असे म्हटले. बेन्थम यांनी त्यांच्या "Principles of Morals and Legislation" या पुस्तकांमध्ये उपयोगितावादी विचाराचे विश्लेषण केलेले आहे, त्यांनी त्यांच्या विश्लेषणात वस्तू ही जास्तीत जास्त आनंद देणारा घटक आहे असे म्हटले. अर्थव्यवस्थेत जास्तीत जास्त वस्तूचे उत्पादन झाले पाहिजे.

बेन्थम यांच्या मते, मौद्रीक विस्तारादृवारे पूर्ण रोजगार साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्या मौद्रीक विचारास आधुनिक कल्याणकारी अर्थशास्त्राचा आधार मानला जातो. त्यांच्या मते, मानवी जीवन जगत असताना आनंद आणि दु:ख दोन्ही येत असतात. आनंद आणि दु:खाचे मापन हे त्यांच्या आवाक्यावरून करता येते. आनंद मोजताना त्याचा कालावधी, निश्चितता व तीव्रता विचारात घेतली

पाहिजे. मानवाने जीवन जगताना आनंदाचे महत्तमीकरण व दु:खाचे किमानीकरण केले पाहिजे असे म्हटले.

बेन्थम यांच्या मते सामाजिक कल्याण तेव्हाच वाढते, जेंव्हा जास्तीच्या वस्तू जास्तीच्या लोकासाठी सुरक्षित केल्या जातात. एकूण कल्याण हे समाजातील व्यक्तीगत कल्याणाची बेरीज असते. एकूण कल्याण वाढवावयाचे असेल तर प्रत्येक व्यक्तीचे कल्याण वाढविणे आवश्यक आहे. समजा समाजामध्ये अनुक्रमे A, B, व C अशा तीन व्यक्ती आहेत. बेन्थम यांच्या मते, एकूण सामाजिक कल्याण म्हणजे W = UA + UB = UC होय. बेन्थम यांच्या मते जर $\Delta W > O$ $(\Delta UA + \Delta UB + \Delta UC) > O$ होय. जेव्हा अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक बदल होतो. व 'A' आणि 'B' या दोन्ही व्यक्तीची उपयोगिता वाढते, मात्र C या व्यक्तीची उपयोगिता कमी होते, तेव्हा खालीलप्रमाणे स्थिती निर्माण होते,


$(\Delta UA + \Delta UB) > \Delta UC$.

वरील बाबतीत विचार केला तर 'A' व 'B' व्यक्तीच्या उपयोगितेत होणारी वाढ ही 'C' व्यक्तीच्या उपयोगितेत होणाऱ्या घटीपेक्षा जास्त आहे. यावरून एकूण कल्याणात वाढ झाल्याचे दिसून येते.

बेन्थम यांच्या निकषणाने 'A' व 'B' चे कल्याण वाढल्याचे दिसून येते. बेन्थम यांच्या निकषामध्ये समाजातील व्यक्तीची आंतरव्यक्तीय तुलना केल्याचे दिसून येते.

बेन्थम यांनी विश्लेषण केल्याप्रमाणे जास्तीच्या वस्तू (Greatest goods) जास्तीच्या व्यक्तीसाठी (Greatest number) एकाच वेळी अस्तित्वात असू शकत नाहीत. उदाहरणार्थ, समाजामध्ये 'A' व्यक्तीची उपयोगिता २०० एवढी, B व्यक्तीची उपयोगिता ५० एवढी व C व्यक्तीची उपयोगिता ३० एवढी आहे. UA = 200, UB = 50 व UC = 30 तीन उपभोक्त्याच्या उपयोगितेची बेरीज एकूण 280 एवढी आहे. दुसऱ्या परिस्थितीत UA = 100, UB = 80 व UC = 80 व तीन उपभोक्त्याचया उपयोगितेची बेरीज 260 एवढी येते. पहिल्या स्थितीत एकूण उपयोगिता २८० एवढी आहे, मात्र वस्तूचे उपभोक्त्यामध्ये विभाजन हे असमान आहे. या स्थितीस

आकृती क्र. २.१




(Greatest goods for smaller numbers) असे म्हटले जाते. दुसऱ्या उदाहरणात (Smaller total goods among greatest numbers) असे म्हणता येते.

वरील आकृतीमध्ये PP हा उपयोगिता शक्यता वक्र आहे व ML हा सामाजिक समवृत्ती वक्र आहे. बेन्थम यांनी जास्तीच्या लोकांसाठी जास्तीच्या वस्तू हे विश्लेषण मांडले आहे. त्यांना सनातनी उपयोगितावादी अर्थतज्ञ म्हणून ओळखले जाते. आकृतीमध्ये OX अक्षावर 'R' या उपभोक्त्याची उपयोगिता व OY अक्षावर 'F' या व्यक्तीची उपयोगिती मोजण्यात आली आहे. उपयोगितावादी अर्थतज्ञांच्या मते पर्याप्त वितरण हे सामाजिक समवृत्ती वक्र व उपयोगिता शक्यता वक्र यांच्या स्पर्शबिंदूतून होते. E हा स्पर्शबिंदू असून या ठिकाणी सामाजिक कल्याण महत्तम होते.

### ❀ संसाधनाची पर्याप्त वाटणी व कल्याण महत्तमीकरण (Optimum Resource Allocation and Walfare Maximization)

आर्थिक सिद्धांतामध्ये संसाधन वाटणी प्रश्नास विशेष महत्त्वाचे स्थान आहे. वाढत्या आर्थिक वृद्धीबरोबर संसाधन वाटणीस आणखी महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. सुरूवातीच्या काळामध्ये संसाधन वाटणीस राजकीय महत्त्व कमी होते. अलिकडील काळामध्ये आर्थिक वृद्धी व विकासाबरोबर असमानता वाढत असताना दिसून येते. सरकार हे संसाधन वाटणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. पॅरोटो यांनी गृहीत धरल्याप्रमाणे बाजारामध्ये पूर्ण स्पर्धा अस्तित्वात नसते. बाजार अपयशामुळे वितरणाचा प्रश्न गुंतागुंतीचा बनलेला आहे. ही गुंतागुंत सोडविण्यामध्ये सरकार ही संस्था महत्त्वाची भूमिका बजावते.

आकृती क्र. २.२




वरील आकृतीमध्ये श्रमाचे मापन हे क्षितिजसमांतर अक्षावर केलेले आहे व भांडवलाचे मापन उर्ध्वगामी अक्षावर केलेले आहे. A1, A2, A3 व A4 हे या उत्पादन पेढीचे समउत्पादन वक्र आहेत व त्यांचा आरंभबिंदू O हा आहे. B1, B2, B3 व B4 हे B या उत्पादन पेठांचे समउत्पादन वक्र आहेत व त्याचा आरंभ बिंदू हा O1 हा आहे.

श्रम व भांडवलाचे विविध संयोग निवडून दोन्ही उत्पादन संस्था X व Y या विविध नगाचे उत्पादन करतात. उत्पादन संस्था A व B चे सम उत्पादन वक्र असून ते ऋणात्मक उताराचे आहेत. समउत्पादन वक्र उतार श्रम व भांडवल यातील सीमांत प्रतिस्थापन तांत्रिक दर (MRTS) दर्शवितो. दोन्ही उत्पादन संस्थेचे समउत्पादन वक्र हे R, S, T व N या बिंदूत एकमेकांना स्पर्श करतात. हे सर्व संतुलन बिंदू हे 001 या करार वक्रावर आहेत. या सर्व बिंदूत दोन्ही वस्तूच्या बाबतीत श्रम व भांडवलाचा तांत्रिक सीमांत प्रतिस्थापन दर हा समान आहे. ($MRTS_{LX} = MRTS_{LK}$) या सर्व बिंदूच्या ठिकाणी संसाधनाची वाटणी ही पर्याप्त आहे.

## ❀ कल्याण महत्तमीकरण (Maximization of Walfare)

कल्याण महत्तमीकरण करणे हे सरकारी संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असते. समग्र उपयोगिता शक्यता वक्र व सामाजिक कल्याण फलन यांच्या साहाय्याने कल्याण महत्तमीकरण स्थिती दर्शविता येते. सामाजिक कल्याण फलन हे दोन व्यक्तीच्या कल्याण स्थितीवर अवलंबून असते. सामाजिक कल्याण फलनाची मांडणी करत असताना कल्याण वितरणासंबंधी मूल्य निर्णय विचारात घ्यावा लागतो. सामाजिक कल्याण फलन हे सामाजिक समवृत्ती वक्राच्या आधारे दर्शविले जाते. वरच्या पातळीवरील सामाजिक समवृत्ती वक्र (Social Individual Curve) हा वरच्या पातळीवरील सामाजिक कल्याण दर्शवितो.

आकृती क्र. २.३




वरील आकृतीमध्ये W1, W2, W3 व W4

हे सामाजिक समवृत्ती वक्र आहेत. OX अक्षावर A ची उपयोगिता व OY अक्षावर B ची उपयोगिता मापन केले आहे. VV1 हा समग्र उपयोगिता शक्यता वक्र आहे. Q या बिंदूच्या ठिकाणी W3 हा सामाजिक समवृत्ती वक्र VV1 या समग्र उपयोगिता शक्यता वक्रास स्पर्श करतो. या ठिकाणी महत्तम सामाजिक कल्याण साध्य केले जाते. Q बिंदूच्या ठिकाणी तंत्रज्ञान व पसंतीवक्र हा स्थिर आहे. सामाजिक समवृत्ती वक्र W4 या वक्रावरील कल्याण हे W3 या वक्रापेक्षा वरच्या पातळीवर आहे. मात्र हा समवृत्ती वक्र समग्र उपयोगिता शक्यता वक्राच्या बाहेर आहे. Q हा महत्तम कल्याण बिंदू असून या बिंदूच्या ठिकाणी वस्तू उत्पादन संरचना योग्य आहे व वस्तू बनविण्यासाठी उत्पादन घटण्याचे संयोगही योग्य आहेत.

## ❀ व्यक्तीचे उपयोगिता फलन (Utility Function of Individual)

मागणीच्या परंपरागत सिद्धांतामध्ये उपभोक्त्याच्या वर्तणुकांचे परीक्षण केलेले आहे. बाजारातील मागणी ही सर्व व्यक्तीच्या मागणीची बेरीज आहे. या विश्लेषणामध्ये उपभोक्ता हा विवेकी असतो असे गृहीत धरलेले आहे. त्याचे उत्पन्न दिलेले आहे. बाजारातील किंमतही दिलेली आहे. तो त्याच्या अस्तित्वातील उत्पन्नातून महत्तम समाधान मिळविण्याचा प्रयत्न करतो. उपयोगितेचे मापन दोन पध्दतीने करण्यात आले. एक म्हणजे उपयोगितेचे संख्यावाचक मापन (Cardinal Mesurement) व दुसरे क्रमवाचक मापन (Ordinal Mesurement) निश्चिततेच्या परिस्थितीत उपयोगितेचे मापन शक्य आहे, असे काही अर्थतज्ञांनी सांगितले. उपयोगिता ही पैसा नगात मोजता येते असे म्हटले. क्रमवाचक उपयोगिता विश्लेषण मांडण्याला विचारवंतांनी उपयोगितेचे संख्यावाचक मापन अशक्य असून त्याचा क्रम लावणे शक्य आहे असे म्हटले.

## ❀ संख्यावाचक उपयोगिता सिध्दांताची गृहीते :-

१) विवेकीपणा.

२) उपयोगितेचे संख्यावाचन मापन.

३) पैशाची सिमांत उपयोगिता स्थीर असते.

४) उपयोगिता ही घटती असते.

५) एकूण उपयोगिता ही सेवन केलेल्या अनेक वस्तू नगाच्यावर अवलंबून असते. जर वस्तू गटामध्ये अनंत वस्तू असतील तर उपयोागिता फलन हे खालीलप्रमाणे तयार होते.

उदा. $U = f(X_1, X_2, .................. Xn)$

म्हणून $U = U1\ (X_1) + U2\ (X_2) + ..................\ Un\ (Xn)$

उपयोगिता विश्लेषणामध्ये उपभोक्त्याचा समतोल हा एक वस्तू प्रतिमानामध्ये खालीलप्रमाणे होतो.

$$MUX = Px$$

ज्याठिकाणी वस्तूची सिमांत उपयोगिता किंमतीबरोबर होते. त्या ठिकाणी उपभोक्ता संतुलन होते. जेव्हा X वस्तूची सीमांत उपयोगिता तिच्या किंमतीपेक्षा जास्त असते तेव्हा व्यक्ती त्याचे कल्याण वाढविण्यासाठी त्या वस्तूचे अनेक नग खरेदी करते. जेव्हा व्यक्ती एकापेक्षा अनेक वस्तूचा उपभोग घेते, तेव्हा संतुलनाची अट ही खालीलप्रमाणे असते.

$$\frac{MUX}{PX} = \frac{MUY}{PY} = \text{-------} = \frac{MUn}{Pn}$$

एका वस्तूच्या बाबतीत उपयोगिता फलन खालीलप्रमाणे येते.

$$U = f\,(QX)$$

## ❀ समवृत्ती वक्र सिद्धांताद्वारे उपयोगिता फलन गृहीते :–

१) विवेकीपणा.

२) उपयोगितेचे क्रमवाचक मापन.

३) सीमांत प्रतिस्थापनाचा घटता दर.

४) सातत्य व संक्रमकता.


५) उपभोक्त्याची एकूण उपयोगिता ही सेवन केलेल्या नगावर अवलंबून असते. उदा. U = F (Q1, Q2, .......... Qn)

संक्रमकता व सातत्येनुसार, जर, A > B तर B # A

व

जर A > B अणि B > C पेक्षा मोठा असेल तर A > C.

उपयोगिता फलन = $U = f\,(X1, X2 \text{ - - - - - - - } Xn) = K$



समवृत्ती वक्राचा उतार $= \frac{\Delta Y}{\Delta X} = MRS_{XY}$

यावरून असे स्पष्ट होते की X वस्तूच्या एका नगाची खरेदी वाढविताना किती प्रमाणात Y वस्तूचा त्याग केला जातो हे सीमांत प्रतिस्थापन दरावरून लक्षात येते.

उपयोगिता फलन $= U = f(X, Y)$

यामध्ये दोन वस्तूचा उपभोग घेतला जातो. त्यामुळे उपयोगिता फलन हे X व Y वस्तूचे आहे, असे म्हणता येते.

### ❀ उपयोगितेच्या आंतरव्यक्तीय तुलनेच्या समस्या (Issue of Interpersonal Comparison of Utility) :-

अर्थशास्त्रामध्ये उपयोगितेची आंतरव्यक्तीय तुलना या संकल्पनेस महत्त्वाचे स्थान आहे. यामध्ये प्रत्येक व्यक्तीचे एखाद्या वस्तूच्या सेवनापासून मिळणारे समाधान हे मोजले जाते. सनातनवादी उपयोगिता सिद्धांत पूर्णत: उपयोगितेच्या आंतरव्यक्तीय तुलनेवर आधारीत होते. उपभोक्ता मागणी सिद्धांत हे उपयोगितेच्या संख्यावाचक मोजमापावर आधारीत आहेत, नंतरच्या काळातील हिक्स यांनी समवृत्ती वक्र विश्लेषण मांडताना क्रमवाचक उपयोगिता विश्लेषणाचा आधार घेतला. कल्याणकारी अर्थशास्त्रीय सिद्धांत व सामाजिक निवड सिद्धांतामध्ये नैतिकतेला महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळेच उपयोगितेची आंतरव्यक्तीय तुलना ही संकल्पना महत्त्वाची आहे.

कल्याणाचे अर्थशास्त्र हे एक विस्तृत शास्त्र आहे व अर्थशास्त्राच्या सर्वच शाखांना ते स्पर्श करते. उपयोगितेची आंतरव्यक्तीय तुलना हा आधार कल्याण मोजमाप करताना अनेक अर्थतज्ज्ञांनी घेतला. आधुनिक उपयोगिता सिध्दांतामध्ये वर्णन केल्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आनंद मिळविण्याचे लक्ष देतात व दु:खाचे मोजमापही करतात. काही लोक हे पैशाच्या आकर्षणात असतात. आधुनिक उपयोगिता सिद्धांतामध्ये लोक विभिन्नवेळी वेगवेगळी वर्तणूक का करतात याचा अभ्यास केला जातो. व्यक्तीच्या वर्तणुकीमध्ये सातत्य दिसत नाही. आधुनिक उपयोगिता सिद्धांतामध्ये पसंती हा घटक महत्त्वाचा आहे. एखादा उपभोक्ता A या ऐवजी B संयोग निवडतो, कारण त्यास A पेक्षा B पासून जास्त उपयोगिता मिळते. हे आधुनिक सिद्धांतामध्ये मान्य केले जात नाही.

## २.२.२ मार्शल यांचे कल्याणकारी अर्थशास्त्र (Marshallian Welfare Economics) :-

आर्थिक कल्याणाच्या बाबतीत सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी कोणताही विशिष्ट असा सिद्धांत विकसित केलेला नाही. सनातनवादी कल्याणाच्या अर्थशास्त्रामध्ये ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो व जे. एस. मिल यांनी राष्ट्रांची वाढती संपत्ती म्हणजेच कल्याण असे म्हटले. प्रा. हॉल मिंट यांच्या मते, सनातनवादी विचारवंतांचा कल्याणाचा दृष्टीकोन हा मौद्रीक संपत्तीच्या निर्मितीशी संबंधित होता. ॲडम स्मिथ यांच्या मते, राष्ट्रीय उत्पन्नातील प्रत्यक्ष वाढ व भौतिक उत्पादन हे आर्थिक कल्याणाचे निर्देशांक आहेत. श्रम विभागणीमुळे उत्पादनास प्रेरणा मिळते. त्यांच्या मते, जेवढे जास्त श्रम तेवढे अधिक उत्पादन होते.

त्यांच्यामते, सनातनवादी विचारवंतांचा कल्याणाचा दृष्टीकोन हा मौद्रीक संपत्तीच्या निर्मितीशी संबंधित होता. त्यांच्या मते, कल्याण हे वाढत्या लोकसंख्येचे धनात्मक फलन होय. आर्थिक व्यवस्थेच्या स्वयंपूर्णतेमुळे प्रत्येक व्यक्तीचे कल्याण वाढते असे ॲडम स्मिथ यांनी म्हटले. स्वयंहिताच्या प्रेरणेमुळे मुक्त बाजार व्यवस्थेत आर्थिक कल्याण साधले जाते.

डॉ. मार्शल यांची आर्थिक कल्याण ही संकल्पना त्यांच्या उपभोक्ता संतोषाधिक्य या संकल्पनेवर आधारित आहे. डॉ. मार्शल आपले व्यक्तिगत विश्लेषण हे संतोषाधिक्यापासून सुरू करतात व त्यावर आधारित समग्र उपभोक्ता संतोषाधिक्य मांडतात. समाजाचे समग्र आर्थिक कल्याण विश्लेषण करण्यासाठी कर उदार विश्लेषणाचा (Tax Bounty Analysis) वापर करतात.

सर्वप्रथम डॉ. मार्शल यांनी व्यक्तिगत कल्याणाचे मापन केलेले आहे. त्यांच्या मते, उपभोक्ता देऊ शकत असलेची किंमत व प्रत्यक्ष दिलेली किंमत यामधील अंतर म्हणजे उपभोक्ता संतोषाधिक्य होय. मार्शल यांच्या मते, कल्याणकारी अर्थशास्त्रात मानवी कल्याणाचा विचार केला जातो. मानवी जीवनात संपत्ती हे अंतिम साध्य नाही तर त्याऐवजी भौतिक कल्याण हे खरे साध्य आहे. कल्याणाच्या अर्थशास्त्रात व्यक्तिगत कल्याणाबरोबरच सामाजिक कल्याणाचाही विचार केला जातो. महत्तम कल्याण साध्य करण्यासाठी उपभोक्ता संतोषाधिक्यात वाढ झाली पाहिजे. उपभोक्ता संतोषाधिक्य वाढत असेल तरच सामाजिक कल्याणात वाढ होते.

अल्फ्रेड मार्शल यांचा जन्म २६ जुलै १८४२ रोजी इंग्लंडमध्ये झाला. १८८५ या वर्षी केंब्रिज विद्यापीठामध्ये ते प्राध्यापक म्हणून रुजू झाले. ते राजकीय अर्थशास्त्र (Political Economy) या विषयाचे प्राध्यापक होते. त्यांनी १८९० मध्ये अर्थशास्त्राची मूलतत्त्वे (Principles of Economics) हा ग्रंथ लिहिला. मार्शल यांनी सिमांत उपयोगिता विश्लेषणाचा (Marginal Utility Analysis) विकास केला. त्यांना नवसनातनवादी (Neo-classical School) अर्थशाळेचे संस्थापक म्हणून ओळखले जाते. मार्शल यांच्या मते, आर्थिक कल्याण हे उत्पादक संतोषाधिक्य (Producer Surplus) आणि उपभोक्ता संतोषाधिक्य (Consumer Surplus) यामध्ये विभागले जाते. प्रस्तुत घटकात उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पनेचे विस्ताराने विश्लेषण केलेले आहे.

## ❀ उपभोक्ता संतोषाधिक्य (Consumer Surplus)

सार्वजनिक वस्तूचे सामाजिक लाभ मोजण्यासाठी उपभोक्ता संतोषाधिक्य ही संकल्पना प्रथम ड्यूपिट यांनी १८४४ मध्ये मांडली. सन १८९२ मध्ये डॉ. अल्फ्रेड मार्शल यांनी त्यांच्या अर्थशास्त्राची मूलतत्त्वे (Principles of Economics) या ग्रंथामध्ये या संकल्पनेस लोकप्रिय बनविले. जुन्या कल्याणकारी अर्थशास्त्रावर आधारित ही संकल्पना उपयोगितेचे संख्यावाचक मापन (Cardinal measurability of utility) व उपयोगितेची आंतरव्यक्तीय तुलना (Interpersonal Comparision of Utility) या दोन संकल्पनेवर आधारित आहे. त्यांच्या मते, उपभोक्ता संतोषाधिक्यात होणारी प्रत्येक वाढ ही सामाजिक कल्याणातील वाढ दर्शविते. त्यांच्या मते, "Consumer surplus is simply the difference between the price that one is willing to pay and the price one actually pays, for a particluar product." आर्थिक

सिद्धांतातील उपभोक्ता संतोषाधिक्य ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची समजली जाते. ही फक्त आर्थिक सिद्धांतामध्येच महत्त्वाची नसून त्याआधारे सरकारी धोरणे ठरविली जातात. तेवढ्याच उत्पन्नामध्ये उपभोक्ता जेव्हा जास्तीचे समाधान मिळवितो, तेव्हा त्यास उपभोक्ता संतोषाधिक्य असे म्हणतात.

### ❀ मार्शल यांची उपभोक्ता संतोषाधिक्याची व्याख्या :-

"Excess of the price which a consumer would be willing to pay rather than go without a thing over that which he actually does pay is the economic measure of this surplus satisfaction it may be called consumer surplus."

एखाद्या विशिष्ट वस्तूस उपभोक्ता विशिष्ट किंमत देऊ इच्छितो त्याच प्रमाणात त्यास त्या वस्तूपासून उपयोगिता मिळत असते. तो जास्त किंमत देण्यास तयार असेल तर त्या वस्तूपासून त्यास जास्त उपयोगिता मिळणार असते.

उपभोक्ता संतोषाधिक्य ही संकल्पना घटत्या उपयोगितेच्या नियमातून तयार केलेली आहे. जेव्हा एखाद्या वस्तूचे आपण जास्त जास्त नग सेवन करत जाऊ तशी तशी उपयोगिता कमी कमी होत जाते. तो एखाद्या वस्तूचे जसे जसे जास्त नग खरेदी करत जातो तसतसे त्यापासून मिळणारी उपयोगिता कमी कमी होत जाते. ज्या ठिकाणी सिमांत उपयोगिता किंमती बरोबर होते त्याठिकाणी उपभोक्त्याचे संतुलन होते.

### ❀ उपभोक्ता संतोषाधिक्याचे मापन (Measurement of Consumer Surplus)

उपभोक्ता संतोषाधिक्याद्वारे एखाद्या विशिष्ट वस्तूच्या सेवनापासून उपभोक्त्यास मिळणारे अतिरिक्त समाधान मोजले जाते. डॉ. मार्शल यांनी उपभोक्ता संतोषाधिक्य हे मौद्रीक एककात मोजलेले आहे. उपभोक्ता संतोषाधिक्याच्या मौद्रीक मापन निश्चिती महत्त्वाची आहे. एखाद्या विशिष्ट वस्तूगटाच्या उपभोगापासून उपभोक्त्यास मिळणाऱ्या एकूण उपयोगितेचे पैशामधील मोजमाप हे मार्शल यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

**तक्ता क्र. २.१ : सिमांत मूल्य व उपभोक्ता संतोषाधिक्य**


| नगसंख्या | सिमांत मूल्य | किंमत | निव्वळ सिमांत लाभ |
|---|---|---|---|
| १ | २० रु. | १२ रु. | ८ रु. |
| २ | १८ रु. | १२ रु. | ६ रु. |
| ३. | १६ रु. | १२ रु. | ४ रु. |
| ४. | १४ रु. | १२ रु. | २ रु. |
| ५. | १२ रु. | १२ रु. | ० रु. |
| ६. | १० रु. | १२ रु. | –२ रु. |
| | एकूण उपभोक्ता संतोषाधिक्य | | २० |

वरील तक्ता क्र. २.१ मध्ये उपभोक्ता संतोषाधिक्याचे मापन केलेले आहे. जेव्हा वस्तूची किंमत प्रति नग २० रु. असते, तेंव्हा उपभोक्ता त्या वस्तूचा एकच नग खरेदी करू इच्छितो. याचाच अर्थ असा की

[illegible]

[illegible]

[illegible]




Y
D
P
S
DI
UM
O
M
X


[illegible]

[illegible]

मागणी करतो. या ठिकाणी सिमांत उपयोगिता ही दिलेल्या किंमतीबरोबर असते. जेव्हा तो OM एवढे नग खरेदी करतो, त्या ठिकाणी त्यास कोणतेही संतोषाधिक्य प्राप्त होत नाही. कारण या ठिकाणी दिलेली किंमत व सिमांत उपयोगिता ही समान असते. मात्र OM या नगसंख्येच्या पूर्वी मिळालेली उपयोगिता जास्त असून दिलेली किंमत ही कमी असल्याचे दिसते. OM एवढ्या नगापासून मिळणारी एकूण उपयोगिता ही ODSM एवढी आहे. याचाच अर्थ असा की OM एवढे नग खरेदी करण्यासाठी उपभोक्ता ODSM एवढे रु. देऊ इच्छित आहे. मात्र बाजार किंमत OP एवढीच असल्यामुळे OM एवढ्या वस्तूसाठी उपभोक्ता रु. OPSM एवढीच रक्कम प्रत्यक्षात देतो. ODSM या रकमेतून OPSM एवढी रक्कम वजा केली असता DSP एवढा भाग शिल्लक असतो. जो उपभोक्ता संतोषाधिक्य दर्शवितो. जर बाजार किंमत OP या किंमतीपेक्षा जास्त झाली तर उपभोक्ता OM एवढ्या नगरसंख्येपेक्षा कमी नग घेवू इच्छितो व यातून उपभोक्ता संतोषाधिक्यामध्ये घट येते. याउलट किंमत वाढली असता उपभोक्ता संतोषाधिक्य कमी होते व किंमत कमी झाली असता उपभोक्ता संतोषाधिक्य वाढते.



आकृती २.६

आकृती २.६ मध्ये किंमत कमी झाल्यामुळे कल्याणामध्ये वाढ कशी होते याचे विश्लेषण केले आहे. आकृतीमध्ये OX अक्षावर नगसंख्या व OY अक्षावर किंमत दर्शवली आहे. OP एवढी किंमत असताना उपभोक्ता OQ एवढी नगसंख्येची मागणी करतो. E या बिंदूच्या ठिकाणी किंमत व सिमांत उपयोगिता समान असल्यामुळे उपभोक्ता संतोषाधिक्य हे शून्य असल्याचे दिसते. जर वस्तूची किंमत कमी होऊन ती

OP1 एवढी झाली तर OQ1 एवढी नगसंख्या खरेदी केली जाते. OQ1 ही नगसंख्या OQ या नगसंख्येपेक्षा जास्त असल्याचे दिसते व किंमत कमी झाल्यामुळे $PP_1TE$ एवढे उपभोक्ता संतोषाधिक्य वाढले आहे. किंमत कमी झाली असता उपभोक्ता संतोषाधिक्य वाढते.

Consumer Surplus = Total Utility - Total Amount spent

## ☼ संतोषाधिक्य मोजमापातील अडचणी :-

उपभोक्ता संतोषाधिक्य मोजणे सोपे वाटत असले तरी संतोषाधिक्य मोजणे तितके सोपे नाही. संतोषाधिक्य मोजण्यामध्ये अनेक अडचणी आहेत, त्या खालीलप्रमाणे विचारात घेता येतील.

१. मागणी किंमतीची पूर्ण यादी उपलब्ध नसते.

२. जीवनातील आवश्यक गरजा व परंपरागत गरजा या संबंधित उपभोक्ता संतोषाधिक्य हे अनिश्चित असते व ते मोजता येण्यासारखे नसते.

३. उपभोक्त्याचे उत्पन्न विभिन्न असते. काही उपभोक्ते श्रीमंत असतात. तर काही उपभोक्ते गरीब असतात. मात्र सर्वच उपभोक्ते एकच किंमत देतात. गरीब उपभोक्त्यास वस्तू मिळविण्यासाठी जास्त त्याग करावा लागतो. उपभोक्त्याच्या परिस्थितीतील भिन्नतेमुळे उपभोक्ता संतोषाधिक्य मोजणे अडचणीचे होते.

४. उपभोक्ते त्याच्या पसंतीनुसार भिन्न भिन्न असतात. प्रत्येक उपभोक्त्याच्या आवडीनिवडी व पसंती भिन्न असतात. एकाच वस्तूच्या भिन्न भिन्न मात्राची ते मागणी करतात.

५. पैशाची सीमांत उपयोगिता स्थिर नसते. जसे जसे आपण वस्तूची नगसंख्या मागणी वाढवितो तसातसा आपल्याकडील पैशाचा साठा कमी कमी होत जातो. त्यामुळे नगसंख्येची मागणी वाढवित गेल्यास पैशाची प्रत्येक एककासोबतची सिमांत उपयोगिता ही वाढत जाते.

६. प्रारंभी उपभोगलेल्या नगाची उपयोगिता कमी कमी होत जाते, मात्र ही घट विचारात घेतली गेली नाही.

७. एखाद्या वस्तूस जर पर्यायी वस्तू उपलब्ध नसेल तर त्या वस्तूची उपयोगिता जास्त राहते.

वरील अडचणीवरून आपणास असे लक्षात येते की, उपभोक्ता संतोषाधिक्याचे तंतोतंत मोजमाप करणे खूप अवघड आहे. मात्र यावरून आपणांस असे म्हणता येणार नाही की, उपभोक्ता संतोषाधिक्य मोजणे अशक्य आहे, व्यवहारामध्ये उपभोक्ता संतोषाधिक्य या संकल्पनेस अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## ☼ सिद्धांतावरील टीका :-

उपभोक्ता संतोषाधिक्य या संकल्पनेवर तज्ञ टिकाकारांनी पुढीलप्रमाणे टिका केलेल्या आहेत.

**१) उपभोक्ता संतोषाधिक्य ही संकल्पना कल्पनातीत व भ्रामक आहे.**

उपभोक्ता आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त रक्कम वस्तू खरेदी करण्यासाठी देऊ शकत नाही. उपभोक्त्याच्या अनेक गरजा असतात, मात्र उत्पन्न मर्यादित असते. प्रा. ए. के. दासगुप्ता यांच्या मते, उपभोक्ता संतोषाधिक्य म्हणजे संभावित किंमत व प्रत्यक्षातील किंमत यामधील फरक होय.

**२) उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पना अवास्तव गृहीतांवर आधारीत आहे.**

उपभोक्त्यास एकाच वस्तूचे विभिन्न नग विभिन्न समाधान देतात हे चुकीचे आहे. मार्शल यांच्या मते, उपभोक्ता वस्तूची खरेदी करीत असतो. सिमांत उपयोगिता व वस्तूंची किंमत यातील समानता निवडतो. मात्र टिकाकारांच्या मते उपभोक्ता जस जसे नगाचे सेवन वाढवितो तस तशी सिमांत उपयोगिता कमी कमी होत जाते. मात्र पूर्वी उपभोगलेल्या नगाची उपयोगिताही कमी होत जाते. यामुळे त्यास कोणतेही उपभोक्ता संतोषाधिक्य प्राप्त होत नाही. वस्तूचे सर्वच नग एकसारखे असल्यामुळे सिमांत उपयोगिताही एकसारखीच राहते.

**३) उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पनेमध्ये वस्तूंच्या परस्परावलंबनाकडे दुर्लक्ष केलेले आहे.**

यामध्ये पर्यायी वस्तू व पूरक वस्तू याकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. जेव्हा वस्तूस इतर पर्यायी वस्तू उपलब्ध नसते. उदा. चहा ही एकच वस्तू आहे व त्यास कॉफी, दूध किंवा इतर अन्य पेय उपलब्ध नसतात, तेव्हा उपभोक्ता चहास जास्तीत जास्त किंमत देण्यास तयार असतो. जर पर्याय उपलब्ध असतील तर देऊ इच्छित असलेली किंमत ही कमी राहते व उपभोक्ता संतोषाधिक्य जास्त असू शकते. यावरून असे म्हणता येऊ शकते की, उपभोक्ता संतोषाधिक्य हे निश्चित असते व ही तंतोतंत किंवा नि:संदिग्ध संकल्पना नाही. हे पर्यायी वस्तूच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. प्रत्येक उपभोक्त्यासाठी वस्तूमधील पर्यायता ही विभिन्न असते. त्यामुळे उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पना ही संदिग्ध बनते. प्रा. निकोलसन यांच्या मते उपभोक्ता हा बाजारातील किंमत स्विकारणारा असतो, त्यामुळे त्यास संतोषाधिक्य प्राप्त होत नाही.

**४) उपभोक्ता संतोषाधिक्य ही संकल्पना उपयोगितेचे संख्यावाचक मोजमाप व पैशाची सिमांत उपयोगिता स्थिर असते या गृहीतावर आधारीत आहे.**

टीकाकारांच्या मते, उपभोक्ता संतोषाधिक्य ही संकल्पना उपयोगिता स्थिर असते या गृहीतावर आधारित आहे. तसेच उपयोगिता ही मानसशास्त्रीय संकल्पना आहे व तिचे मोजमाप शक्य नाही. मार्शल यांच्या विश्लेषणात किंमतीतील बदलाच्या उत्पन्न परिणामाकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. बहुसंख्य वस्तूच्या बाबतीत किंमत बदलाचा उत्पन्न परिणाम हा नाममात्र असतो. मात्र अन्नधान्याच्या बाबतीत किंमत बदलाचा उत्पन्न परिणाम हा मोठा असतो. मार्शल यांचे मागणी वक्राच्या आतील भागातील उपभोक्ता संतोषाधिक्य हे उत्पन्न परिणामाकडे दुर्लक्ष करते. मार्शल यांनी पैशाच्या सहाय्याने संतोषाधिक्याचे मापन ही नवीन संकल्पना मांडली.

## ☼ समारोप :

वरीलप्रमाणे काही टिका केल्या असल्यातरी उपभोक्ता संतोषाधिक्य या संकल्पनेचे व्यवहारातील महत्त्व कमी होत नाही. उपभोक्ता संतोषाधिक्य ही संकल्पना फक्त सैध्दांतिकच नसून सरकारला धोरणे ठरविताना याचा उपयोग होता. वस्तूचे उपयोग मूल्य व विनिमय मूल्य असे दोन मूल्ये ॲडम स्मिथ या तत्त्ववेत्याने मांडली व उपयोग मूल्यास जास्त महत्त्व दिले. उपयोग मूल्यातून समाधान दर्शविले जाते व विनिमय मूल्यातून किंमत दर्शविली जाते. वस्तूच्या किंमतीपेक्षा समाधानास जास्त महत्त्व आहे. दैनंदिन जीवनात अशा अनेक वस्तू आहेत, ज्याचे विनिमय मूल्य कमी आहे व उपयोगमूल्य जास्त आहे. उदा. मीठ, काडीपेटी, वर्तमानपत्र इ. याबराबेरच उपभोक्ता संतोषाधिक्य या संकल्पनेच्या आधारे सरकारला अप्रत्यक्ष कराचा जनतेवरील अतिरिक्त भार मोजता येतो. विविध प्रकल्पाचे खर्च लाभ विश्लेषण करता येते. म्हणून उपभोक्ता संतोषाधिक्य या संकल्पनेचा व्यवहारातील उपयोग निर्विवाद आहे.

## ❑ क्षतिपूरक फरकाचे तत्त्व (Compensation Principle)

पॅरेटो यांनी आधुनिक कल्याणकारी अर्थशास्त्राचा पाया घातला. त्यांनी सामाजिक पर्याप्तता संकल्पना (Concept of Social Optimum) मांडली की जी क्रमवाचक उपयोगिता मापनावर आधारीत आहे व उपयोगितेच्या आंतरव्यक्तीय तुलनेपासून मुक्त आहे. त्यांनी संभावित आर्थिक व धोरणात्मक बदलाने सामाजिक कल्याण वाढणार किंवा नाही याचे मापन केले. पॅरेटो यांच्या मते, आर्थिक बदलामुळे कोणाचेही अकल्याण न होता एखाद्या व्यक्तीच्या कल्याणात वाढ होत असेल तर सामाजिक कल्याण वाढले असे म्हणता येते. मात्र याद्वारे तंतोतंतपणे कल्याणातील वाढ दर्शविता येत नाही, त्यामुळे कॅल्डार व हिक्स या अर्थतज्ञांनी एखाद्या आर्थिक बदलामुळे कोणाचे तरी अहित होते व कोणाचा तरी फायदा होतो हे स्पष्ट केले. त्यांनी क्षतिपूरक तत्त्व (Compensation Principle) मांडले.

## ☼ क्षतिपूरक तत्त्वाची गृहीते :–

१. एखाद्या व्यक्तीचे समाधान हे इतर व्यक्तीपासून स्वतंत्र असते व त्याच्या कल्याण मापनाचा तोच खरा मापक आहे.

२. उत्पादन व उपभोग यांच्या मित्तव्ययता अस्तित्वात नाहीत.


३. उपभोक्त्याची आवड, चव स्थिर आहे.

४. उत्पादन व विनिमय समस्या ही वितरण समस्येतून वेगळी करता येवू शकते.

५. उपयोागितेचे क्रमवाचक मापन करता येते व उपयोगितेची आंतरव्यक्तीय तुलना शक्य नाही.

क्षतिपूरक रकमेवर आधारित कल्याण निकष मांडणारे निकोल्सन कॅल्डोर हे पहिले अर्थतज्ञ आहेत. कॅल्डोर यांच्या कल्याण निकषानुसार आर्थिक धोरणातील बदलामुळे काही लोकांचे कल्याण होते तर काही लोकांचे अकल्याण होते. मात्र या बदलातून सामाजिक कल्याण वाढते, जेव्हा लाभ झालेल्यांनी नुकसान


झालेल्यांना नुकसान भरपाई देतात व तरीसुद्धा त्यांचे कल्याण जास्तच राहते. त्यांच्या मते, (Gainers must Compensate Loosers) जे. आर. हिक्स यांनी कॅल्डार यांच्या या तत्त्वास पाठिंबा दिला. त्यांच्या मते, आर्थिक बदलामुळे काही लोकांचा लाभ होतो व काही लोकांचे नुकसान होते. मात्र नुकसान भरपाईनंतर सामाजिक कल्याण वाढते. प्रा. हिक्स यांचा निकष हा नुकसान झालेल्यांच्या बाजूचा असून प्रा. कॅल्डोर यांचा निकष हा लाभ झालेल्याच्या बाजूचा आहे. दोघांच्याही निकषामध्ये सामाजिक कल्याणवाढीचा विचार केलेला आहे. त्यामुळे यास कॅल्डार-हिक्स विश्लेषण असे म्हटले जाते.



आकृती २.७


कॅल्डार-हिक्स यांचा कल्याण निकष हा आकृती २.७ द्वारे स्पष्ट केलेला आहे. आकृतीमध्ये A व B या दोन उपभोक्त्यांच्या क्रमवाचक उपयोगितेचे मापन केलेले आहे. आकृतीमध्ये OX अक्षावर A ची उपयोगिता व OY अक्षावर B उपभोक्त्याच्या उपयोगितेचे मापन केलेले आहे. DE हा उपयोगिता शक्यता वक्र आहे. या वक्राद्वारे A व B या उपभोक्त्यास उपलब्ध असलेले विविध संयोग दर्शविलेले आहेत. जेव्हा आपण DE या वक्रावर खालच्या बाजूकडे येतो. तेव्हा A ची उपयोगिता वाढते व B ची उपयोगिता कमी होते व जेव्हा आपण या वक्रावर उजवीकडून डावीकडे जातो तेव्हा B ची उपयोगिता वाढते व A ची उपयोागिता घटते. A आणि B च्या उत्पन्नाचे विभाजन केले किंवा प्रदानाचे वाटप केले असता ते आरंभ बिंदू Q या ठिकाणी संतुलित होतात. या बदलामुळे B या उपभोक्त्याची उपयोगिता वाढते व A या उपभोक्त्याची उपयोगिता कमी होते. पॅरेटो यांच्या निकषाप्रमाणे फक्त B चे कल्याण वाढले. मात्र A चे

कल्याण कमी झाले. DE या उपयोगिता वक्रावर हिक्स यांच्या मते B च्या कल्याणात वाढ होवून त्यास लाभ झालेला आहे व A चे कल्याणात घट होवून त्यास नुकसान झालेले आहे. या ठिकाणी B हा उपभोक्ता त्यास झालेल्या लाभातून A चे नुकसान भरून काढू शकतो, उपयोगिता शक्यता वक्र हा बिंदू R, G व S यामधून जातो. तर उपभोक्ता B ने A या उपभोक्तयास झालेले नुकसान भरून काढले तर R या बिंदूत येतील. R या बिंदूच्या ठिकाणी उपभोक्ता A हा पूर्वीच्या कल्याण पातळीवर पोहचतो. मात्र उपभोक्ता B चे कल्याण हे पूर्वीपेक्षा जास्त असल्याचे दिसते. A या उपभोक्त्यास नुकसानभरपाई दिल्यानंतरही B चे कल्याण हे पूर्वीपेक्षा जास्त असल्याचे दिसते. कॅल्डार हिक्स यांच्या मते, Q पासून T पर्यंतच्या बदलामुळे सामाजिक कल्याणात वाढ होते. तेव्हाच सामाजिक कल्याण वाढते. जेव्हा संतुलन हे T पासून G कडे जाते, तेव्हा मात्र दोन्ही उपभोक्त्यांच्या कल्याणामध्ये वाढ झालेली आढळून येते. उत्पन्न विभाजनाचे G हे संतुलन गाठता येते. कॅल्डार हिक्स यांच्या मते, जेव्हा दोन्ही उपभोक्ते वरच्या बाजूच्या उपयोगिता शक्यता वक्रावर स्थलांतरित होतात, तेव्हा दोघांच्याही कल्याणात वाढ होते व एकूण सामाजिक कल्याण वाढते.




आकृती २.८

हिक्स यांचे चार उपभोक्ता संतोषाधिक्य ही संकल्पना समवृत्ती वक्राच्या साहाय्याने स्पष्ट केली आहे.




आकृती क्र. २.९

आकृती २.९ मध्ये OX अक्षावर X वस्तूचे नग दर्शविले आहेत व OY अक्षावर उत्पन्न रक्कम दर्शविली आहे. उपभोक्त्याची पसंतीही दिलेली आहे व ती स्थिर आहे. X या वस्तूवर खर्च करण्यासाठी उपभोक्त्याकडे OP एवढे उत्पन्न आहे. $IC_1$ या समवृत्ती वक्रावरील सर्व बिंदू समान समाधान दर्शवितात. $IC_1$ या समवृत्ती वक्रावरील R हा संयोग X या वस्तूंचे OA एवढे नग दर्शवितो व त्यासाठी PS एवढे उत्पन्न खर्च केले जाते. OP एवढे उत्पन्न खर्च करून जेवढे समाधान मिळत होते, तितकेच समाधान PS एवढे उत्पन्न खर्च करून मिळत आहे. कारण P व R हे दोन्ही संयोग $IC_1$ याच समवृत्ती वक्रावर आहेत. याठिकाणी उपभोक्ता OA एवढे नग खरेदी करण्यासाठी PS एवढे उत्पन्न खर्च करण्यास तयार आहे. समजा बाजारातील X वस्तूच्या किंमतीवरून PL ही किंमतरेषा मिळते. उपभोक्त्याचे संतुलन हे समवृत्ती वक्र व किंमत रेषा यांच्या स्पर्शबिंदूच्या ठिकाणी होते. PL ही किंमत रेषा IC2 या समवृत्ती वक्राशी H या बिंदूत स्पर्श करते. या बिंदूच्या ठिकाणी उपभोक्ता हा OA एवढ्या नगांचे सेवन करतो. OT एवढे उत्पन्न खर्च करतो. बाजारात दिलेल्या किंमतीस उपभोक्ता OA/TH हा एवढ्या नगासाठी PS एवढे उत्पन्न खर्च करावयास तयार होतो. आता मात्र तो TS एवढी कमी रक्कम देतो व OA एवढे नग खरेदी करतो. TS किंवा HR या रक्कमेस किंवा अंतरास उपभोक्ता संतोषाधिक्य असे म्हटले जाते.

अशा प्रकारे हिक्स यांनी समवृत्ती वक्राच्या साहाय्याने संतोषाधिक्याचे मापन केलेले आहे. त्यांच्या विश्लेषणात उपयोगितेचे संख्यावाचक मापनही टाळलेले आहे. हिक्स यांची उपभोक्ता संतोषाधिक्य मापनाची संकल्पना डॉ. मार्शल यांच्या संकल्पनेपेक्षा सरस मानली जाते.

## ✳ हिक्स यांचे चार उपभोक्ता संतोषाधिक्य (Hicks Four Consumer Surpluses) :–


हिक्स यांनी त्यांच्या 'मूल्य व भांडवल' (Value and Capital) या विश्लेषणामध्ये डॉ. मार्शल यांची उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पना भिन्न असल्याचे म्हटले. मार्शल यांच्या उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पनेत खरेदी केलेली नगसंख्या ही हिक्सच्या संकल्पनेसारखीच आहे व उपभोक्त्याच्या पसंतीप्रमाणे ती बदलते. मार्शल यांच्या विश्लेषणात वस्तूची मर्यादा आहे. मात्र हिक्स यांच्या विश्लेषणात वस्तूची मर्यादा नाही. हिक्स यांनी भरपाई फरक/अंतर या संकल्पनेचा विस्तार केलेला आहे. त्यांनी चार संकल्पना मांडल्या आहेत.

१) किंमत भरपाई अंतर (Price Compensating Variation), २) किंमत समानता अंतर (Price Equivalent Variation), ३) वस्तू नग भरपाई अंतर (Quantity Compensating Variation), ४) वस्तू नग समानता अंतर (Quantity Equivalent Variation)

हिक्स यांच्या मते, भरपाई अंतर म्हणजे उपभोक्त्यास त्याच्या पूर्वीच्या समाधान पातळीत ठेवण्यासाठी दिलेली रक्कम होय. समानता अंतर म्हणजे उपभोक्त्यांनी पूर्वीच्या समाधान पातळीत राहण्यासाठी वस्तूवर खर्च केलेली रक्कम होय.

### १. किंमत भरपाई अंतर (Price Compensating Variation) :-

आरंभिक कल्याण पातळी गाठण्यासाठी उपभोक्ता खालच्या किंमतपातळीवर देऊ इच्छित असलेली महत्तम रक्कम म्हणजे किंमत भरपाई अंतर होय. यामध्ये तो किंमत पातळी कमी होण्याअगोदर आरंभिक कल्याण पातळी गाठण्याचा प्रयत्न करतो.




आकृती क्र. २.१०


आकृती २.१० मध्ये OX अक्षावर X वस्तूची नगसंख्या मापन केलेली आहे व OY अक्षावर पैसा उत्पन्न मापन केलेले आहे. बाजारातील X ची किंमत दिलेली असताना आरंभिक किंमत रेषा PL1 ही आहे. या ठिकाणी संतुलन बिंदू Q हा आहे व तो IC1 या समवृत्ती वक्रावर आहे. समजा X वस्तूच्या किंमतीत घट झाली यामुळे किंमत रेषा उजवीकडे सरकून ती PL2 अशी झाली. उपभोक्त्यांचे संतुलन R या बिंदूत झाले व हा बिंदू IC2 या समवृत्ती वक्रावर आहे. या ठिकाणी उपभोक्त्याचे कल्याण वाढल्याचे दिसून येते. कमी झालेल्या किंमतीमुळे उपभोक्ता किती प्रमाणात X चे नग वाढवू इच्छितो की, ज्यामुळे तो आरंभीक IC1 या समवृत्ती वक्रावर आरंभीक समाधान पातळीत येईल. याचे मापन करण्यासाठी आपणांस PL2 या किंमतरेषेस समांतर किंमत रेषा काढावी लागेल. नवीन समांतर किंमत रेषा GH अशी आहे. या ठिकाणी काही उत्पन्न उपभोक्त्याकडून काढून घेतले जाते. नवीन संतुलन हे S असून या ठिकाणी उपभोक्ता हा IC1 या समवृत्ती वक्रावर आहे. बिंदू Q हा बिंदू S हे या समवृत्ती वक्रावर आहेत, व दोन्ही बिंदू समाधानाची समान पातळी दर्शवितात. या ठिकाणी उपभोक्ता हा S हा संयोग कमी किंमतीमध्ये व कमी उत्पन्नामध्ये खरेदी करतो. त्यास PG हे किंमत भरपाई अंतर मिळते.

## २. **किंमत समानता अंतर (Price Equivalent Variation) :-**

हिक्स यांच्या चार संकल्पनांपैकी किंमत समानता अंतर ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची समजली जाते.

"Price equivalent variation is defined by Hicks as minimum sum of money the consumer will accept to receive (that is, will have to be paid) for forgoing the opportunity of buying at lower price so that he obtain the subsequent level of welfare (or satisfaction which he reaches with the lower price."

आकृती क्र.२.११




विशिष्ट वस्तू खरेदी करण्यासाठी उपभोक्ता देवू इच्छित असलेली किमान रक्कम कमीत कमी किंमतीस घेऊन समाधान पातळी गाठण्याचा प्रयत्न करतो.

आकृती क्र. २.११ मध्ये OX अक्षावर X वस्तूची नगसंख्या व OY अक्षावर पैसा उत्पन्न दर्शविले आहे. $PL_1$ ही आरंभिक किंमत रेषा आहे. ही किंमत रेषा IC1 या समवृत्ती वक्राशी Q बिंदूत स्पर्श करते. समजा X या वस्तूची किंमत कमी झाली तर आपणास PL2 ही नवीन किंमत रेषा मिळते. वस्तूची किंमत कमी झाल्यामुळे नवीन संतुलन मिळते व तो बिंदू R हा आहे. IC2 समवृत्ती वक्र PL2 या किंमत रेषेस R बिंदूच्या ठिकाणी स्पर्श करतो, या ठिकाणी तो खालच्या समवृत्ती वक्रावरून वरील समवृत्ती वक्रावर स्थलांतरित होतो. उपभोक्त्यांचे समाधान वाढले. त्याचे पैसारूपी उत्पन्न हे PE या अंतराइतके वाढते. मूळ समाधान पातळीत येण्यासाठी नवीन किंमत रेषा मिळते व ती EF अशी आहे. जी PL1 या किंमत रेषेला समांतर आहे. नवीन संतुलन बिंदू S हा आहे. या ठिकाणी तो कल्याणाच्या वरच्या पातळीवर जातो. PE या अंतरास किंमत समानता अंतर म्हटले जाते.

### ३. वस्तू नग भरपाई अंतर (Quantity Compensating Variation) :-


"Quantity compensating variation is defined by Hicks as a maximum amount of money consumer will be willing to pay for the previllege of buying a good at a lower price, if along with this previlege he is constained to buy the Quantity of the good which he would buy at the lower price, in the absence of any compensating payment."



आकृती २.१२ मध्ये OX अक्षावर X वस्तूचे मापन केलेले आहे व OY अक्षावर पैसा उत्पन्न मापन केलेले आहे. Q हा बिंदू आरंभिक समतोल दर्शवितो, ज्या ठिकाणी किंमत रेषा $PL_1$ व IC समवृत्ती वक्र एकमेकास स्पर्श करतात. समजा X वस्तूची किंमत कमी झाली असता उपभोक्ता हा R या नवीन संतुलन बिंदूत जातो या ठिकाणी IC2 हा समवृत्ती वक्र PL2 या किंमत रेषेला स्पर्श करतो. या ठिकाणी उपभोक्ता OB एवढ्या X वस्तू खरेदी करतो. उपभोक्ता आपल्या आरंभिक संतुलनात जाण्यासाठी आपल्या वाढलेल्या उत्पन्नातील काही रक्कम बाजूस काढली पाहिजे. RQ एवढी रक्कम आपण उपभोक्त्यापासून काढून घेतली असता तो मूळ समवृत्ती वक्रावर येऊन मूळ समाधान पातळी गाठतो. तो IC1 या समवृत्ती वक्रावर K या बिंदूच्या ठिकाणी येतो. RQ हे नग संख्या भरपाई अंतर आहे.

**४. वस्तू नग समानता अंतर (Quantity Equivalent Variation) :-**

"The Quantity equivalent variation is the maximum sum which a consumer would be willing to accept as compensation for being preventing from reaching an upper indifference curve as a result of full in the price."




आकृती २.१३ मध्ये OX अक्षावर X वस्तूची नगसंख्या व OY अक्षावर पैसा उत्पन्न मापन केलेले आहे. Q हा बिंदू आरंभिक समतोल असून IC1 हा समवृत्ती वक्र PL1 या किंमत रेषेस स्पर्श करतो या ठिकाणी उपभोक्ता OA एवढे X वस्तूचे नग खरेदी करतो. समजा X वस्तूची किंमत कमी झाली तर किंमत रेषा ही उजवीकडे सरकते व ती PL2 अशी होते, यातून R हे नवीन संतुलन मिळते. उपभोक्त्याचे समाधान


व कल्याण वाढते, मात्र R या बिंदूत तो X वस्तूचे OA पेक्षा जास्त नग खरेदी करतो. पूर्वीच्या समाधान पातळीत राहण्यासाठी तो X वस्तूचे OA एवढे नग खरेदी करतो आता तो QT एवढी रक्कम सोडण्यास तयार होतो. QT यास नगसंख्या समानता अंतर असे म्हणतात.

वरील प्रमाणे हिक्स यांनी उपभोक्ता संतोषाधिक्याच्या चार संकल्पनांच्या आधारे उपभोक्ता संतोषाधिक्य पैशाच्या स्वरूपामध्ये दर्शविले आहे. वस्तूच्या किंमतीमध्ये फरक पडला असता कल्याणामध्येही फरक पडतो हे यावरून स्पष्ट होते.

## ❀ कर उदार विश्लेषण (Tax Bounty Analysis) :-

डॉ. मार्शल यांनी उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पना मांडताना समग्र कल्याणाचा विचार केलेला आहे. कर उदार दृष्टीकोनाद्वारे त्यांनी बाजारव्यवस्थेत करांचा उपयोग करून कल्याणात वाढ कशी होते हे दर्शविले, मार्शल यांनी समग्र आर्थिक कल्याणाचे मापन करण्यासाठी कर उदार विश्लेषणाचा उपयोग केला आहे. त्यांच्या मते, समग्र आर्थिक कल्याणात वाढ करण्यासाठी करांचा अवलंब करता येतो. घटत्या फलांच्या उद्योगावर कर लावून वाढत्या फलाच्या उद्योगास अनुदान दिले असता समग्र आर्थिक कल्याणामध्ये वाढ होते. त्यांनी खालील प्रमाणे कर लावणे व अनुदान देणे या संकल्पनेचे विश्लेषण केलेले आहे.

### १. स्थिर फलाचा उद्योग (Constant Return Industry) :-




आकृती क्र. २.१४

आकृती २.१४ मध्ये OX अक्षावर नगसंख्या व OY अक्षावर किंमत मापन केलेले आहे. DD हा

मागणी वक्र आहे, SS व $S_1S_1$ हे दोन्ही पुरवठा वक्र आहेत. सरकारचा हस्तक्षेप नसताना SS हा वक्र DD मागणी वक्रास $P_1$ या बिंदूच्या ठिकाणी छेदतो व संतुलन तयार होते. या ठिकाणी उपभोक्ता OM एवढे नग खरेदी करतो व $OS/MP_1$ एवढी किंमत देतो या ठिकाणी महत्तम कल्याण साध्य केले जाते. समजा जर सरकारने या उद्योगावर कर लादले तर वस्तूचा पुरवठा वक्र हा वरच्या बाजूस सरकतो व तो S1S1 असा होतो. कर लावल्यामुळे किंमतीत वाढ होऊन ती $OS_1/NP_2$ अशी होते. यावेळी उपभोक्त्याच्या कल्याणात घट होते, ती म्हणजे $SP_1 P_2 S_1$ व उपयोगासाठी वस्तूची मागणी पूर्वीच्या OM पातळीवरून कमीहोऊन ती ON अशी होते. या ठिकाणी सरकारकडून जमा झालेली कर रक्कम ही $SHP_2 S_1$ एवढी आहे.

$SP_1 P_2 S_1 - SHP_2 S_1 = HP_1 P_2 HP_1 P_2$ एवढी उपभोक्त्याच्या कल्याणात घट होते. त्यामुळे स्थिर फलाच्या उद्योगावर कर लादणे फायद्याचे ठरत नाही.

**२. वाढत्या खर्चाचा किंवा घटत्या फलाचा उद्योग (Increasing Cost Industry) :-**


आकृती क्र. २.१५

आकृती क्र. २.१५ मध्ये OX अक्षावर नगसंख्या व OY अक्षावर किंमत मापन केलेले आहे. P1 हा आरंभिक समतोल असून याठिकाणी DD हा मागणी वक्र व SS हा पुरवठा वक्र एकमेकांना छेदतात. उपभोक्ता या ठिकाणी OM एवढे वस्तूचे नग खरेदी करतो. जेव्हा सरकार कर आकारतो तेव्हा पुरवठा वक्र हा वरच्या बाजूस स्थलांतरित होतो व किंमतीत वाढ होऊन P2 हा संयोग तयार होतो. या ठिकाणी किंमतवाढ होऊन ती NP2 होते. किंमत वाढल्यामुळे उपभोक ता OM नगसंख्या ऐवजी ON एवढी

नगसंख्या खरेदी करतो. किंमत वाढीमुळे $KP_1P_2T$ एवढी उपभोक्ता संतोषाधिक्यामध्ये घट होते. करामुळे जमा होणारी रक कम ही $GHP_2T$ एवढी आहे. $GHP_2T - KP_1P_2T = GHP_1K$ या ठिकाणी कल्याणात होणारी घट ही कर रक्कमेपेक्षा कमी असल्यामुळे वाढत्या खर्चाच्या उद्योगावर कर आकारणी फायदेशीर ठरते.

## ३. घटत्या खर्चाचा उद्योग (Decreasing Cost Industry) :-

डॉ. मार्शल यांच्या मते, घटत्या खर्चाच्या उद्योगावर कर लावणे हे कल्याणाच्या दृष्टीने उपयोगी ठरत नाही. हे खालील आकृतीद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.




आकृती क्र. २.१६

आकृती २.१६ मध्ये DD हा मागणी वक्र असून SS व $S_1S_1$ पुरवठा वक्र आहे. OX अक्षावर नगसंख्या व OY अक्षावर किंमत दर्शवली आहे. $P_1$ हे आरंभीक समतोल असून या ठिकाणी उपभोक्ता समतोल असून या ठिकाणी उपभोक्ता OM एवढी वस्तूचे नग खरेदी करतो. समजा, सरकारने कर लावले असता पुरवठा वक्र हा $S_1S_1$ असा होतो व $P_2$ हे नवीन संतुलन तयार होते व या ठिकाणी किंमतीमध्ये वाढ होऊन ती $MP_1$ हून $NP_2$ एवढी होते. किंमत वाढल्यामुळे वस्तूचे सेवन कमी होऊन ON एवढ्याच वस्तू खरेदी केल्या जातात. किंमत वाढल्यामुळे वस्तूचे सेवन कमी होऊन ON एवढ्याच वस्तू खरेदी केल्या

जातात. किंमत वाढल्यामुळे उपभोक्त्याचे नुकसान हे $P_1KTP_2$ एवढे होते. कर लावल्यामुळे सरकारला करादवारे $FEP_2T$ एवढी रक्कम जमा होते. $P_1KTP_2 - F_1 P_2T = FEKP_1$ म्हणजेच करादवारे जमा होणाऱ्या रकमेपेक्षा कल्याणातील घट मोठी आहे. त्यामुळे मार्शल असे म्हणतात की, घटत्या खर्चाच्या उद्योगावर कर लावले असतात नुकसान जास्त होते.

मार्शल यांच्या विश्लेषणातून असे लक्षात येते की, घटत्या खर्चाच्या व स्थिर खर्चाच्या उद्योगांवर कर न लावता त्यांना अनुदान दिले असता सामाजिक कल्याणात वाढ होते व वाढत्या खर्चाच्या उद्याोगावर कर लावले असता सामाजिक कल्याणात वाढ होते.

## २.३ सारांश/समारोप

पॅरेटो पूर्व कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये कल्याणाबद्दलच्या अनेक मुलभूत सामाजिक कल्याण संकल्पना मांडल्या आहेत. बेन्थम या उपयोगितावादी विचारवंताने कल्याणवाढीसाठी समाजामध्ये वस्तूचे उत्पादन वाढले पाहिजे हा महत्त्वाचा विचार मांडला. व्यक्तीला वस्तू उपभोगापासून आनंद मिळत असेल तर कल्याणामध्ये वाढ होते असे त्यांनी म्हटले आहे. कल्याण संकल्पनेमध्ये कल्याणाचे मोजमाप करताना उपयोगितेची आंतरव्यक्तीय तुलना महत्त्वाची ठरते, असेही त्यांनी मांडले. अल्फ्रेड मार्शल यांनी त्यांच्या कल्याणाबद्दलच्या विचारामध्ये उपभोक्ता संतोषाधिक्यास महत्त्वाचे स्थान दिले. समाजामध्ये व्यक्तीच्या उपभोक्ता संतोषाधिक्यामध्ये वाढ होत असेल तरच आर्थिक कल्याणामध्ये वाढ होते. उपभोक्ता संतोषाधिक्यातील वाढ किंवा घट ही वस्तूच्या किंमतीतील बदलांवर अवलंबून असते. वस्तूच्या किंमती वाढल्या तर उपभोक्ता संतोषाधिक्यामध्ये घट होते व वस्तूच्या किंमतीमध्ये घट झाली तर उपभोक्ता संतोषाधिक्यामध्ये वाढ होते. त्यांनी उपयोगिता वक्राच्या आधारे उपभोक्ता संतोषाधिक्याचे मापन केले आहे. आर्थिक बदलामुळे एखाद्या व्यक्तीच्या कल्याणामध्ये वाढ होत असेल व दुसऱ्या व्यक्तीच्या कल्याणामध्ये घट होत असेल तर घट झालेल्या व्यक्तीस कल्याणात वाढ झालेल्या व्यक्तीने नुकसान भरपाई दिली असता एकूण आर्थिक कल्याण वाढते, असे कॅल्डार-हिक्स या विचारवंतांनी म्हटले. प्रा. हिक्स यांनी त्यांच्या वक्राच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे. यामध्ये त्यांनी उत्पन्न परिणाम विचारात घेतलेला आहे. कोणत्या उद्योगावर कर आकारणी करावी व कोणत्या प्रकारच्या उद्योगांना अनुदान द्यावे हेही स्पष्ट केले आहे. आर्थिक विकास वाढत असताना कल्याणामध्ये होणारी वाढ ही समानतेच्या तत्वाने व्हावी व एकूण सामाजिक कल्याण वाढले याबद्दलचे विश्लेषण या घटकामध्ये करण्यात आले आहे.

## २.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

✷ **योग्य पर्याय निवडा.**

१. ''जास्तीच्या वस्तू जास्तीच्या लोकांसाठी'' हे विधान ............... यांच्याशी संबंधित आहे.
*अ) ॲडम स्मिथ  ब) डेव्हिड रिकार्डो  क) जेरेमी बॅन्थम  ड) उर्सुला हिक्स.*

२. एक वस्तू उपयोगिता फलन ही संकल्पना ............. यांनी मांडली.

*अ) अल्फ्रेड मार्शल* *ब) डेव्हीड रिकार्डो*

*क) उर्सुला हिक्स* *ड) केनेथ ॲरो.*

३. उपभोक्ता संतोषाधिक्य म्हणजे .............. होय.

*अ) व्यक्ती देऊ इच्छित असलेली किंमत व प्रत्यक्ष दिलेली किंमत यातील अंतर.*

*ब) व्यक्ती खरेदी करू इच्छित असलेली नग संख्या व प्रत्यक्ष खरेदी केलेली नग संख्या यामधील अंतर.*

*क) व्यक्ति देऊ इच्छित असलेली किंमत व खरेदी केलेली नग संख्या यामधील अंतर.*

*ड) वरीलपैकी एकही नाही.*

४. हिक्स यांच्या मते, ............... .

*अ) वाढत्या खर्चाच्या उद्योगावर कर आकारला पाहिजे.*

*ब) घटत्या खर्चाच्या उदयोगावर कर आकारला पाहिजे.*

*क) स्थिर खर्चाच्या उद्योगावर कर आकारला पाहिजे.*

*ड) वरीलपैकी सर्व.*

५. .................. ला अनुदान दिले पाहिजे.

*अ) घटत्या खर्चाच्या उद्योगास* *ब) स्थिर खर्चाच्या उद्योगास*

*क) दोन्ही 'अ' आणि 'ब'* *ड) वरीलपैकी एकही नाही.*

६. उपयोगिता फलन मापनामध्ये .................. चे मोजमाप केले जाते.

*अ) किंमत* *ब) वस्तू नगसंख्या* *क) व्याज* *ड) वेतन.*

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. *ब) डेव्हिड रिकार्डो.*

२. *अ) अल्फ्रेड मार्शल.*

३. *अ) व्यक्ती देऊ इच्छित असलेली किंमत व प्रत्यक्ष दिलेली किंमत यातील अंतर.*

४. *ब) घटत्या खर्चाच्या उदयोगावर कर आकारला पाहिजे.*

५. *क) दोन्ही 'अ' आणि 'ब'.*

६. *अ) किंमत.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### २.६.१ टिपा लिहा.

१. संसाधनाची पर्याप्त वाटणी.

२. उपयोगितेची आंतरव्यक्तीय तुलना.

३. उत्पन्न विभाजनाचा प्रश्न.

४. क्षतिपूरक फरकाचे तत्व.

५. महत्तम कल्याणाची स्थिती.

### २.६.२ दीर्घोत्तरी प्रश्न.

१. प्रा. बेन्थम यांचा समग्र कल्याण दृष्टीकोन स्पष्ट करा.

२. डॉ. मार्शल यांची उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पना आकृतीसह स्पष्ट करा.

३. डॉ. मार्शल यांच्या उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पनेचे टीकात्मक परीक्षण.

४. प्रा. हिक्स यांच्या चार उपभोक्ता संतोषाधिक्य संकल्पना स्पष्ट करा.

## २.७ संदर्भ ग्रंथ


१. **Koutsoyiannis A.** (1991) : *"Moder Micro Economics",* Second Edition, MacMillan Press Ltd., London.

२. **Ahuja H. L.** : *"Advanced Economic Theory",* 11th Edition, S. Chand and Company Ltd., New Delhi.

३. **Dwivedi D. N.** (2002) : *"Micro Economics : Theory and Applications",* Durling Kindersley (India) Pvt. Ltd.

४. **Mukherji Sampat** : *"Analytical Micro Economics",* New Central Book Agency Pvt. Ltd. Delhi.

५. **Varma K. N.** : *"Micro Economic Theory",* Vishal Publishing Co. Delhi.


❀❀❀

घटक–३

# पॅरेटोचे कल्याणाचे अर्थशास्त्र

## ( Paretian Welfare Economics )

---

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ पॅरेटो पर्याप्तता, पर्याप्त उत्पादन, उपभोग व विनिमय, करार वक्र संकल्पना, उच्च पातळी पर्याप्तता, अतुलनीय पर्याप्ततेची अनंत संख्या विरुध्द अद्वितीय सामाजिक पर्याप्तता

३.२.२ बॅरोन, कॅल्डोर व हिक्सचे योगदान

३.२.३ सिटोव्हस्कीचा दुहेरी निकष, सामाजिक समवृत्ती नकाशाची संकल्पना

३.२.४ 'सॅम्युअलसन'चा उपयोगिता संभाव्यता वक्र, मूल्य जोड आणि कल्याणकारी अर्थशास्त्र बर्गसनचे सामाजिक कल्याण फलन, ॲरोचे अशक्यता प्रमेय

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भसूची


## ३.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील बाबीचे आकलन होईल.

१. पॅरेटो पर्याप्ततेसह पर्याप्त उत्पादन, उपभोग व विनिमय समजून घेता येईल.

२. करार वक्र संकल्पना, उच्च पातळी पर्याप्तता तसेच अतुलनीय पर्यायाची पर्याप्ततेची अनंत संख्या विरुध्द अद्वितीय सामाजिक पर्याप्तता स्पष्ट करता येईल.

३. कल्याणकारी अर्थशास्त्रातील बॅरोन, कॅल्डोर व हिक्सचे योगदान समजावून घेता येईल.

४. सिटोव्हस्कीचा दुहेरी निकष, सामाजिक समवृत्ती नकाशाची संकल्पना समजून घेता येईल.

### ३.२.१ पॅरेटो पर्याप्तता (Pareto Optimality)


इटालियन अभियंता व अर्थशास्त्रज्ञ विल्फ्रेड पॅरेटो यांनी आर्थिक कार्यक्षमता आणि उत्पन्न वितरणामध्ये पर्याप्तता किंवा कार्यक्षमता ही संकल्पना वापरली. पॅरेटोच्या मतानुसार सामाजिक कल्याणात वाढ होण्यास केवळ संसाधनाचे वितरण योग्य असून चालत नाही. म्हणजे केवळ चांगल्या पध्दतीने वाटप झाले म्हणजे कल्याणात वाढ झाली असे म्हणता येणार नाही तर संसाधने वाटपामुळे कोणत्याही एका घटकाच्या उपयोगितेत घट न होता एखाद्याच्या उपयोगितेत वाढ झाली पाहिजे तेव्हा कल्याणात वाढ झाली असे म्हणता येईल.

सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्यासाठी उपलब्ध साधनसामग्री आणि उत्पादनाचे असे पुनर्वाटप करणे आवश्यक आहे की, ज्यामुळे एखाद्याच्या उपयोगितेत घट न होता इतर कोणाच्यातरी उपयोगितेत वाढ घडून आलेली असावी. अनेक वेळा संसाधनाचे किंवा उत्पादनाचे पुनर्वितरण केल्यामुळे एखाद्याची उपयोगिता कमी होवून दुसऱ्याच्या उपयोगितेत वाढ होत असते. यास सामाजिक कल्याणातील वाढ असे म्हणता येत नाही, तर कोणाच्याही उपयोगितेत घट न होता इतरांच्या उपयोगितेत वाढ घडून येणे अपेक्षित असते यालाच पॅरेटोची पर्याप्तता/कार्यक्षमता असे म्हणतात.

अर्थशास्त्राव्यतिरिक्त, पॅरेटो कार्यक्षमतेची संकल्पना अभियांत्रिकी आणि जीवशास्त्र या पर्यायांच्या निवडीसाठी लागू केली गेली आहे. प्रत्येक पर्यायाचे प्रथम मूल्यांकन केले जाते. एकाधिक निकषांखाली आणि नंतर पर्यायांचे उपसंच मालमत्तेसह स्पष्टपणे ओळखले जाते की, कोणत्याही पर्याय निर्दिष्ठ पर्यायापेक्षा स्पष्टपणे निष्पादित करू शकत नाही. पॅरेटो यांची कार्यक्षमतेची संकल्पना वितरणाबाबत ज्याप्रमाणे लागू पडते. त्याचबरोबर पॅरोटोची कार्यक्षमतेची संकल्पना उत्पादन क्षमतेच्या संदर्भात निर्माण होते. वस्तूंच्या उत्पादनाचा एक संच म्हणजे उत्पादनक्षम आदानांची संभाव्य पुनर्वितरण शक्य नसल्यास पॅरेटो कार्यक्षम आहे. एकाचे उत्पादन वाढते तर इतर सर्व वस्तूंचे उत्पादन वाढते किंवा पूर्वी एवढे राहते.

#### ❀ पॅरेटोचे कार्यक्षमता निकष :-

वास्तविक पाहता सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्यासाठी उपभोक्त्याच्या पसंतीनुसार संसाधने, उत्पादन प्राप्त होणे किंवा त्याचे वाटप घडून येणे आवश्यक आहे. अन्यथा संसाधने, उत्पादनाचे वाटप घडून देखील सामाजिक कल्याणात भर पडत नाही. सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्यासाठी पसंती व आवडीनिवडीचा विचार करण्याची गरज असते. कारण या बाबींचा विचार न करता केलेले वाटप नेहमीच कल्याणात वाढ घडवून आणेल यांची खात्री देता येत नाही. उदा. समजा सरकारकडे अ आणि ब या दोन वस्तू उपलब्ध आहेत; परंतु देशात 'अ' वस्तूला प्राधान्य देणारे काही लोक आहेत. तर 'ब' वस्तूला प्राधान्य देणारे काही लोक आहेत. अशा परिस्थितीत सरकारने संसाधनाचे किंवा उत्पादनाचे वाटप करताना 'अ' वस्तूला प्राधान्य देणाऱ्या लोकांना 'ब' वस्तूचे वाटप केले आणि 'ब' वस्तूला प्राधान्य देणाऱ्या लोकांना 'अ' वस्तूचे वाटप केले तर सामाजिक कल्याणात वाढ होत नाही. या पध्दतीचे वितरण कार्यक्षम




आकृती क्र. ३.१

मात्र उत्पादन E या बिंदूतून PP या उत्पादन शक्यता वक्रावर कोठेही दर्शविल्यास कार्यक्षम उत्पादन दर्शविले जाते. अधिक कार्यक्षम उत्पादनासाठी उत्पादन PP या उत्पादन शक्यता वक्रावर असणे आवश्यक आहे.

### (ब) पर्याप्त विनिमय (Optimum Exchange) :-


विनिमयविषयक कार्यक्षमता किंवा पर्याप्तता म्हणजे दिलेल्या साधनांचा किंवा आदानांचा असा विनिमय कि ज्यामुळे कोणाचेही नुकसान न होता इतर कोणाचातरी फायदा होणे अपेक्षित आहे. सामान्यत: पूर्ण स्पर्धेच्या बाजारात अशा प्रकारची विनिमय कार्यक्षमता दिसून येते की, जेथे आपण दिलेल्या वस्तूच्या मोबदल्यात किती वस्तू प्राप्त झाल्या याचा विचार करण्यापेक्षा किमान उपयोगितेत कितीने बदल झाला याचा सारासार विचार करून आदलाबदल केली जात असते की, ज्यामधून सामाजिक कल्याणात वाढ होते.

कोणत्याही दोन उत्पादनामध्ये प्रतिस्थापनाचा तांत्रिक दर दोन्ही उपभोक्त्यांसाठी समान असणे आवश्यक आहे. याचाच अर्थ असा कि दोन ग्राहकोपयोगी वस्तूंच्या दरम्यान सीमांत पर्यायता दर हा वस्तूच्या किंमतीशी समान असावा. पूर्ण स्पर्धेत प्रत्येक ग्राहकाचे ध्येय उपयोगिता महत्तम करणे असते, यासाठी तो दोन्ही वस्तू X व Y च्या किंमतीशी सीमांत पर्यायता दराची (MRS) समरूपता करेल.

करता येते. देशातील उपभोक्त्यांना ज्या वस्तू अधिक प्रमाणात हव्या आहेत, त्या अधिक प्रमाणात व ज्या वस्तू कमी प्रमाणात हव्या आहेत त्या वस्तूचा पुरवठा आवश्यकतेनुसार कमी करून उत्पादन पुरवठ्यामध्ये योग्य तो संयोग साधता येतो.


## ❀ करार वक्र (Contract Curve) :-

सूक्ष्म अर्थशास्त्रानुसार, करार वक्र दोन लोकांच्या दरम्यान दोन वस्तूंच्या अंतिम वाटपाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या बिंदूचे संच आहेत, जे त्या वस्तूंच्या प्रारंभिक वाटपामुळे परस्पर फायदेशीर व्यापार झाल्यामुळे होवू शकते. या वक्रावरील सर्व बिंदू पॅरेटो कार्यक्षमता वाटपानुसार आहेत. या वक्रावरील कोणत्याही संचात/बिंदूत पुनर्वाटप होणार नाही, कोणत्याही व्यक्तीचे समाधान वाढवू शकणार नाही, कारण एकाचे समाधान वाढवल्यास दुसऱ्या व्यक्तीचे समाधान कमी होईल. करार वक्र हा पॅरेटोच्या कार्यक्षमता बिंदूचा उपसंच आहे. कोणताही वॉलरसीयन समतोल हा करार वक्रावर असतो. पॅरेटोच्या कार्यक्षमता असलेल्या सर्व बिंदूप्रमाणे, करार वक्रावरील प्रत्येक बिंदू हा एका व्यक्तीचा समवृत्ती वक्र आणि दुसऱ्या व्यक्तीचा समवृत्ती वक्र एकमेकांना स्पर्श करणारे असतात. अशा प्रकारे करार वक्रावर दोन्ही लोकांसाठी सीमांत प्रतिस्थापन दर समान असतो.




आकृती क्र. ३.३

आकृती ३.३ मध्ये X व Y या दोन वस्तू A व B या दोन व्यक्तीद्वारे उपभोगल्या जात आहेत असे गृहित धरलेले आहे. $O_A$ आणि $O_B$ हे आरंभ बिंदू आहेत. $I_1$, $I_2$ व $I_3$ हे A व्यक्तीचे समवृत्ती वक्र




## ✺ क्षतिपूरक/नुकसान भरपाई तत्त्व किंवा निकष (Compensation Criteria) :

कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये भरपाई सिद्धांत/तत्त्व हे योग्य सामाजिक स्थितीच्या जोड्यांपैकी कोणती जोडी निवडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निर्णयांशी संबंधित आहे. एक अवस्था ही काल्पनिक बिंदूची अवस्था आहे. नुकसान भरपाई तत्वानुसार एखाद्या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे अपेक्षित लाभधारकाने अपेक्षित नुकसान होणाऱ्यांना नुकसान भरपाई दिली आणि कोणाचेही नुकसान होणार नसेल तर पर्यायी धोरण स्विकारले जाते. भरपाई किंवा क्षतिपूरक तत्त्वाचे उदाहरण म्हणजे पॅरेटो निकष होत. या अवस्थेत नुकसान भरपाई फक्त व्यवहार्य नाही तर आवश्यक आहे. याची दोन रुपे/प्रकार आहेत.

(i) पॅरेटो तत्त्व, ज्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल आवश्यक आहेत.

(ii) मजबूत पॅरेटो निकष, ज्यामध्ये किमान एकाचा तरी फायदा झाला पाहिजे आणि कोणाचेही नुकसान होणार नाही पाहीजे अशी कोणत्याही बदलाची आवश्यकता असते.

गैर काल्पनिक संदर्भामध्ये नुकसान भरपाई निर्माण होते. नुकसान भरपाई तत्त्व उघड करणे ही प्रभावी बदल करण्यासाठी अनावश्यक आहे. परंतु याचाच उपयोग काही गमावणाऱ्यांना (Loosers) अधिक वादग्रस्त व गुंतागुंतीचा आहे (जेथे पूर्ण नुकसान भरपाई देणे शक्य आहे पण दिली गेलेली नाही) आणि जेथे

अर्थतज्ञ बरोन याचे वर्णन 'समाजवादी अर्थव्यवस्थेच्या शुध्द सिध्दातांचा संस्थापक' म्हणून केले गेले आहे. सन १९०८ मध्ये त्यांनी समाजवादी अर्थव्यवस्थेसाठी गणितीय प्रतिमान सादर केले ज्याअंतर्गत काही संबंध नंतर सावली किंमती (Showdo Prices), महत्तम सामूहिक कल्याणासाठी समाधानी राहिले पाहिजे, याच्याशी राहिले. नंतर पूर्ण स्पर्धेतील पॅरेटो कार्यक्षमतेच्या किमान खर्च किंमत उत्पादनापर्यंत पोहचले. बरोन यांनी यावर भर दिला की, असे परिणाम प्रारंभी येवू शकत नाहीत परंतु केवळ आकडेवारी संकलनावर मोठ्या मागण्यांसह मोठ्या प्रमाणावर प्रयोग करून, अपरिवर्तनीय उत्पादनक्षम परिस्थितीचाही विचार करावा. यामध्ये त्यांनी असे सुचविले की, समाजवादी अर्थव्यवस्थेतील आर्थिक कार्यक्षमतेकडे हालचाल अकल्पनिय नाही. दोन प्रकारची समाजवादाची रूपरेषा सांगितली. एक केंद्रिकृत आणि दुसरी विकेंद्रित प्रतिमान. सरकारच्या उत्पादन मंत्रालयाने उत्पादित केलेल्या उत्पन्नात आणि उत्पन्नासाठी असलेले कोणतेही वितरण नियम, समान आर्थिक वर्गवारी किंमती, वेतन, व्याज, भाडे, नफा इत्यादीसाठी कदाचित पुन्हा दिसून येतील. १९३० च्या दशकात बरोनचे विश्लेषण आणि ऑस्ट्रियन अर्थतज्ञांच्या प्रतिक्रियांवर आर्थिक मोजणी, समस्या आणि बाजारातील समाजवादाची चर्चा झाली. तीन दशकानंतर अब्राहम बर्गसन यांचे सामाजिक कल्याणकारी कार्याचे प्राथमिक स्वरूप बेरोनच्या पध्दतीवर तयार झाले.

## ✷ कॅल्डोर व हिक्स यांचे योगदान (क्षतिपुरक तत्व) :

केंब्रिज विद्यापीठातील केन्सोत्तर अर्थतज्ञ निकोलस कॅल्डोर यांचा जन्म १२ मे, १९०८ रोजी हंगेरी (बुडापेस्ट) येथे झाला. मृत्यू ३० सप्टेंबर १९८६ रोजी इंग्लंडमध्ये झाला. त्यांनी 'क्षतिपूरक तत्त्व' विकसीत केले यालाच 'कल्याणकारी तुलनेसाठी कॅल्डोर-हिक्स कार्यक्षमता' असे म्हणतात. कॅल्डोर यांनी १९३९ मध्ये 'Welfare Propositions of Economics and Interpersonal Comparision of Utility' या शोधनिबंधात आणि जे. आर. हिक्स यांनी १९३९ मध्ये 'The Foundations of Welfare Economics' या शोधनिबंधात कल्याणकारी अर्थशास्त्राविषयी जे विश्लेषण केले आहे, त्यास कॅल्डोर-हिक्स क्षतिपूरक तत्व किंवा निकष असे म्हणतात.

कॅल्डोर-हिक्स यांच्या मतानुसार एखाद्या आर्थिक धोरणामुळे उत्पन्न वाटपात अथवा उपयोगितेत जो बदल होतो, त्यामुळे सामाजिक कल्याणात वाढ झाली की घट झाली याचे मोजमाप करण्यासाठी पॅरेटोचे कल्याणविषयक निकष पुरेसे नाहीत. यामध्ये नुकसान भरपाई किंवा क्षतीपुरक तत्वाचा योग्य तो विचार केलेला नाही. कॅल्डोर-हिक्स यांच्या मतानुसार एखाद्या आर्थिक धोरणातील बदलामुळे एखाद्या व्यक्तीच्या लाभात वाढ होत असते तर दुसऱ्या व्यक्तीचे नुकसान होते. परंतु ज्या व्यक्तीस लाभ झालेला आहे त्याच्या उत्पन्नातील किंवा लाभातील काही हिस्सा नुकसान झालेल्या व्यक्तिस हस्तांतरीत केल्यास सामाजिक कल्याणात वाढ करता येणे शक्य आहे की, ज्यामुळे उपयोगिता महत्तम होवून एकूण सामाजिक कल्याण वाढते.

कॅल्डोर-हिक्सच्या मते, सामाजिक कल्याणाचा प्रश्न शास्त्रशुध्दपणे हाताळण्यासाठी उत्पादनातील बदल आणि उत्पन्न वाटपातील बदल या दोन बाबींचा फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. नवीन धोरणामुळे

प्रारंभी Q या उपयोगितेच्या स्थितीत A व B ला मिळणारी उपयोगिता दर्शविली आहे. आर्थिक धोरणातील बदलामुळे A व B हे Q बिंदूवरून जर T या बिंदूत उपयोगिता शक्यता वक्रावर गेल्यास याठिकाणी A ची उपयोगिता घटते आणि B ची उपयोगिता वाढते. याठिकाणी A चे नुकसान होते तर B ला लाभ होतो. Q पासून T पर्यंतची हालचाल पॅरेटो निकषाने मूल्यांकित केली जात नाही. पॅरेटो निकषानुसार SGR किंवा उपयोगिता शक्यता वक्रावरील R व S दरम्यानचे कोणतेही बिंदूस पसंती दिली जाते (Q पेक्षा). तथापि कॅल्डोर हिक्सच्या तत्वाने Q पासून T पर्यंत गेल्यामुळे सामाजिक कल्याणात वाढ झाली आहे का नाही हे सिध्द केले आहे.

✷ **टीकात्मक परीक्षण :**

कॅल्डोर-हिक्स क्षतिपूरक तत्व हे टीकेपासून बाजूला नाही.

१) नुकसान भरपाई दिल्याशिवाय फक्त संसाधनाच्या पुनर्वाटपाने आर्थिक कल्याण होवू शकत नाही. वास्तव कल्याणाविषयी केवळ फायद्याच्या परिणामाबद्दल निवेदन केले जाण्यापूर्वी उत्पन्न पुनर्वितरण प्रभावाची वांछिततेबद्दल एक स्पष्ट निर्णय आवश्यक आहे.

२) फायद्याचे आणि नुकसानीचे पुनर्वितरण विनामूल्य नाही. म्हणूनच लाभार्थी आणि खर्चाची माहिती मिळविणारा याविषयीच्या खर्चासंबंधी प्रश्न निर्माण होवू शकतो.


३) कॅल्डोरच्या निकष एकटाच प्रतिसममीत (Antisymmetric) नाही हे सिटोव्हस्की यांनी दाखवून दिले आहे.

४) कॅल्डोरचा निकष कदाचित विसंगत असू शकतो कारण A ला मिळणारे लाभ B पेक्षा अधिक असू शकतात किंवा B ला मिळणारे लाभ A पेक्षा अधिक असू शकतात. कॅल्डोर हिक्स यांच्या एकत्रित निकषात ही समस्या नाही ते निष्क्रीय असू शकते. म्हणजे A हे B पेक्षा चांगले B हे C पेक्षा चांगले असू शकते आणि A हे C पेक्षा चांगले नसू शकेल.

## ३.२.३ सिटोव्हस्कीचा दुहेरी निकष (Scitovsky Double Criteria) :

अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ टिबोर सिटोव्हस्की यांचा जन्म नोव्हेंबर ३, १९१० मध्ये हंगेरी या देशात झाला. १ जून २००२ ला त्यांचा मृत्यू झाला. उपभोगाच्या संबंधात लोकांच्या आनंदाच्या स्वरूपाविषयी लिखाणासाठी ते परिचीत आहेत. सन १९४६ ते १९५८ पर्यंत स्टॅनफोर्ड विद्यापीठात प्राध्यापक होते.


सन १९४१ मध्ये सिटोव्हस्की यांनी 'The Review of Economic Studies' या जर्नलमध्ये 'A Note on Welfare Proposition in Economics' या लेखात कॅल्डोर-हिक्स यांनी मांडलेल्या क्षतिपूरक तत्वातील विरोधाभासाचे स्पष्टीकरण दिले असून त्यास सिटोव्हस्की विरोधाभास असे म्हटले जाते. सिटोव्हस्कीच्या मतानुसार कॅल्डोर-हिक्स यांचे क्षतिपूरक तत्व विरोधाभास निर्माण करणारे असून त्यापासून प्राप्त होणारे निष्कर्ष नियमीत मिळत नसून त्यामध्ये प्रचंड विरोधाभास दिसून येतो. कारण जेव्हा उपयोगिता संभाव्यता




अशा हालचालीत कॅल्डोर-हिक्सच्या निकषामध्ये सुधारणा आहे कारण G हा EF या उपयोगिता संभाव्यता वक्रावर R बिंदूतून जातो. G या स्थितीपासून R या स्थितीपर्यंत जाण्यासाठी दोन व्यक्तींमधील उत्पन्नाचे पुनर्वितरण केले जाते. R ही स्थिती Q पेक्षा चांगली आहे, कारण R या बिंदूत दोघांची उपयोगिता अधिक आहे. अशाप्रकारे कॅल्डोर-हिक्स निकष समाधानी आहे, म्हणूनच Q पासून G पर्यंतचा बदल सामाजिक कल्याण वाढवेल.

## ❑ समुदाय/समाज समवृत्ती नकाशाची संकल्पना (Concept of Community Indifference Map)


समुदाय समवृत्ती वक्र हा विविध वस्तूच्या संख्येचा एक संयोग आहे कि तो संपूर्ण समाजाची उपयोगिता पातळी समान पातळीवर आणतो. या प्रतिमानाचा वापर कोणत्याही समुदायाचे जसे की शहर किंवा संपूर्ण राष्ट्राचे वर्णन करण्यासाठी केला जावू शकतो. समुदाय समवृत्ती वक्रामध्ये सर्व व्यक्तीगतांचे समवृत्ती वक्र एकूण/एकत्रित आणि उपयोगितेच्या समान आणि स्थिर पातळीवर ठेवले जातात. या संकल्पनेचा शोध १९४१ मध्ये सिटोव्हस्की यांनी लावला. समुदाय समवृत्ती वक्र उपयोगितेचे वितरण साध्य करण्यासाठी सर्व एकूणाचे देणग्या संच प्रदान करतो. समुदाय समवृत्ती वक्र हा वैयक्तिक समवृत्ती वक्राची बेरीज किंवा एकूण असते.




आकृती ३.९

आकृती ३.९ मध्ये OX अक्षावर X वस्तू आणि OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. $IC_1$, $IC_2$ आणि $IC_3$ हे A संयोग, B संयोग आणि C संयोग भिन्न समाधान पातळी दर्शवित आहे. A संयोगापेक्षा B संयोगामध्ये समाजाला अधिक समाधान मिळते, कारण A संयोगापेक्षा B संयोगामध्ये दोन्ही वस्तूच्या नगरसंख्येत वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे संयोगामध्ये B पेक्षा दोन्ही वस्तूचे नग वाढले आहेत, त्यामुळे समाधान पातळी वाढते. $IC_1$, $IC_2$ व $IC_3$ जसजसे वरच्या पातळीवर जातात तसतसे समाधान वाटते. उच्च पातळीवरील समवृत्तीवक्र अधिक समाधान दर्शवितात. $IC_1$, $IC_2$ व $IC_3$ यालाच समवृत्ती वक्र नकाशा म्हणतात.

समवृत्ती वक्राचा उतार हा X आणि Y वस्तूच्या सीमांत पर्यायता दराद्वारे मोजला जातो ($MRS_{XY}$). Y वस्तूच्या बदल्यात X वस्तूची किती नगसंख्या कमी किंवा जास्त केली जाते हे मोजले जाते. X वस्तूच्या नगसंख्येच्या बदल्यात Y वस्तूची किती नगसंख्या बदलते याचे प्रमाण मोजले जाते. समाजाने X वस्तूच्या जादा मात्राचे सेवन केल्यास Y वस्तूच्या मात्रा जादा कमी केल्या जातात. त्यामुळे $MRS_{XY}$ हा घटत जातो त्यामुळे सामाजिक समवृत्ती वक्र ऋणात्मक उताराचा तयार होतो आणि तो आरंभ बिंदूशी बहिर्गोल असतो.




वरील आकृती ३.१० मध्ये UT हा उपयोगिता संभाव्यता वक्र असून $W_1$, $W_2$, $W_3$ व $W_4$ हे सामाजिक समवृत्ती वक्र आहेत. यापैकी $W_1$ या वक्रावरील R बिंदू हा UT या संभाव्यता वक्रावर असला तरी येथे A चे नुकसान व B चा अधिक फायदा आहे. तथापि, S या बिंदूत R पेक्षा उच्च उपयोगिता असली तरी UT वक्रावरील महत्तम संभाव्य उपयोगिता वाढविणे शक्य असल्यामुळे जरी S बिंदूत A व B चा फायदा समान असला तरी सामाजिक कल्याण महत्तम होत नाही. येथे कल्याणात आणखी वाढीच्या शक्यता आहेत. मात्र Q बिंदूत A व B हे दोघेही $W_3$ या उच्च पातळीवरील समवृत्ती वक्रावर जात असल्याने तेथे दोघांचीही उपयोगिता महत्तम होवून सामाजिक कल्याणही महत्तम होत असल्याचे दिसून येते. Q या ठिकाणी उपयोगिता संभाव्यता वक्राच्या सरहद्दीवर (शेवटच्या टोकावर) सामाजिक समवृत्ती वक्र स्पर्श करतो तेथे महत्तम सामाजिक कल्याण होते. अद्वितीय समतोल Q ला मर्यादित आनंद (Constrain Bliss) म्हटले जाते, कारण ते उत्पादन, विनिमय आणि वितरणाचे अद्वितीय संघटन दर्शविते. त्याद्वारे महत्तम सामाजिक कल्याण प्राप्त होते. अर्थात समाज $W_4$ या वक्रावर अधिक समाधानी होईल. परंतु उच्च वक्राची स्थिती प्राप्य नाही. संसाधनातील मर्यादीतपणा आणि तंत्रज्ञानातील अडथळ्यांमुळे समाज UT या उपयोगिता संभाव्यतावरच महत्तम प्राप्त सामाजिक समाधान मिळते. $W_4$ साठी उपयोगिता शक्यता वक्रास मर्यादा आहेत. तेव्हा Q या बिंदूच्या ठिकाणी उपयोगिता शक्यता सरहद्दीस $W_3$ समवृत्ती वक्र स्पर्श करतो. त्या ठिकाणी महत्तम सामाजिक कल्याण मिळते.

प्रा. रॉबिन्सच्या मताशी सहमत असलेल्या अर्थशास्त्रज्ञांनी उपयोगितेची आंतरवैयक्तिक तुलना टाळण्यासाठी पॅरेटोच्या क्रमवाचक पध्दतीचा आधार घेतला. कॅल्डोर-हिक्स, सिटोव्हस्की यांनी नुकसान भरपाई तत्वाची निर्मिती केली की जे मूल्य निर्णयापासून मुक्त आहे.

त्यानुसार अर्थशास्त्रज्ञ कार्यक्षमतेच्या विचाराच्या आधारे धोरण शिफारशी करू शकतात. आर्थिक कार्यक्षमतेची उद्देश चाचणी अशी आहे की, बदलामुळे लाभधारकांना नुकसान होणारापेक्षा अधिक फायदा होवू शकतो. परंतु वाढीव कार्यक्षमतेची ही चाचणी म्हणजे मूल्य निर्णय होय. कारण बदलामुळे लाभ होणारे लोक नुकसान होणाऱ्यांना भरपाई देतात. भरपाईच्या कल्पनेत मूल्यवाचकतेचा/वहीवाटीचा समावेश आहे आणि म्हणून नवकल्याणकारी अर्थशास्त्राचे निर्मातेही मूल्याशिवाय (Value Free) कल्याणकारी अर्थशास्त्राची बांधणी यशस्वी करू शकले नाहीत.

प्रा. बर्गसन हे रॉबिन्स यांच्या विचाराशी सहमत आहेत की, आंतरवैयक्तिक तुलनेत मूल्य निर्णयाचा समावेश आहे. परंतु प्रा. सॅम्युअलसन आणि ॲरो यांच्या बरोबरीने त्यानी असे म्हटले आहे की, कल्याणकारी अर्थशास्त्रात मूल्य निर्णय घेतल्याशिवाय कोणतेही अर्थपूर्ण प्रस्तावना (Propositions) तयार केली जावू शकत नाही. कल्याणकारी अर्थशास्त्र अशा प्रकारे एक नमुनात्मक (Normative Study) अभ्यास बनते जे अर्थशास्त्रज्ञांना वैज्ञानिक अभ्यास करण्यापासून रोखत नाही किंवा परावर्तीत करीत नाही. अगदी पॅरेटोचा सामान्य पर्याप्तता सिध्दांत देखील मूल्य मुक्त नाही, असे म्हटले आहे की, पर्याप्तता स्थिती म्हणजे ज्यामुळे प्रत्येकास लाभ देणे व कमीतकमी एका व्यक्तीस तोटा देणे हे संसाधनाचे पुनर्वितरण करूनही साध्य होणार नाही. या कल्याण प्रस्तावामध्ये काही मूल्य निर्णय आहेत. पॅरेटो पर्याप्तता ही वैयक्तिक कल्याणाशी संबंधीत आहे. पर्याप्तता स्थिती प्राप्त करण्यासाठी प्रत्येकजण आपल्या कल्याणाचा सर्वोत्तम न्यायाधिश म्हणून कार्य करतो. जर कोणत्याही संसाधनाच्या पुनर्वितरणामुळे इतरांचे नुकसान न होता किमान एका व्यक्तीचा जरी फायदा झाला तर समाजाच्या कल्याणात वाढ झाली असे सांगितले जाते. हे सर्व मूल्य निर्णय आहेत. पॅरेटो यांना टाळता आले नाहीत तरीही त्यांनी उपयोगितेच्या क्रमवाचक मापनाची पध्दती वापरली.

## ❑ बर्गसनचे सामाजिक कल्याण फलन (Bergson's Social Welfare Function) :-

अब्राम बर्गसन (Abram Bergson) यांचा जन्म २१ एप्रिल, १९१४ मध्ये न्यूयॉर्क शहरात झाला. तर मृत्यू २३ एप्रिल २००३ रोजी झाला. बर्गसन हे अमेरिकन गणितीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांनी सन १९३८ मध्ये 'A Reformulation of Certain Aspects of Welfare Economics' या लेखात सामाजिक कल्याण फलनाची संकल्पना मांडून महत्तम सामाजिक कल्याणाची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. वैयक्तिक उपयोगिता फलनाऐवजी सामाजिक कल्याण फलन ही नवीन संकल्पना मांडून आपले विश्लेषण केले आहे. यामध्ये समाजातील व्यक्तींचे वैयक्तिक तुलनात्मक पसंतीक्रम विचारात घेतले आहेत. डॉ. मार्शल, पिगू, पॅरेटो, बरोन आणि लर्नर यांच्यासह पूर्वी अर्थशास्त्रज्ञांद्वारे मांडण्यात आलेल्या 'महत्तम आर्थिक कल्याणाच्या शर्तीच्या व्युत्पन्नासाठी (Derivation) आवश्यक असलेल्या मूलभूत मूल्य निर्णय

४. सामाजिक कल्याणातील बदलाचे मापन करण्यासाठी मूल्य तत्वाचा किंवा न्याय तत्वाचा उपयोग होतो. समाजातील तत्वे व मूल्यानुसार त्या समाजातील कल्याणामध्ये तफावत असते. एका विशिष्ठ समाजातील मूल्य संचाचा प्रभाव सामाजिक कल्याणावर असतो.

५. समाजातील सेवा सुविधांचे वैयक्तिक व्यक्तींसाठी झालेले वाटप कसे आहे यावर त्या एकूण सामाजिक कल्याणाची पातळी अवलंबून असते.

६. सामाजिक उपयोगिता आणि व्यक्तीगत उपयोगिता या भिन्न बाबी असतात. तसेच एखाद्या वस्तूची उपयोगिता प्रत्येकास वेगवेगळी असते, या तत्वाचा आधार होवून सामाजिक कल्याणाचे मापन करण्यात आलेले आहे.

## ❑ ॲरोचे अशक्यता प्रमेय (Arrow's Impossibility Theorem) :-

अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ केनेथ जोसेफ ॲरो हे कल्याणकारी अर्थशास्त्रातील योगदान व सामान्य आर्थिक समतोल सिध्दांत यासाठी प्रसिध्द आहेत. यांचा जन्म २३ ऑगस्ट १९२१ न्यूयॉर्क शहरात, अमेरिकेत झाला. मृत्यू २१ फेब्रुवारी २०१७ ला झाला. त्यांना १९७२ साली नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

सामाजिक निवड सिध्दांतात ॲरोचे अशक्यता प्रमेय, सामान्य शक्यता प्रमेय, किंवा ॲरोचा विरोधाभास हे अशक्यता प्रमेय आहेत जेव्हा मतदारांकडे तीन किंवा त्याहून अधिक पर्याय आहेत तेव्हा कोणतीही स्थान मतदान निवडणूक प्रणाली व्यक्तीच्या स्थान प्राधान्यास समुदायामध्ये बदलू शकत नाही. मतदानाच्या सिध्दातांच्या चर्चामध्ये प्रमेयाचा उल्लेख आहे त्याचे पुढे गिब्बर्ड-सॅटर्थवेईट प्रमेय झाले. अर्थशास्त्रज्ञ आणि नोबेल पुरस्कार विजेते केनेथ ॲरो यांनी या प्रमेयाचे नामकरण केले. त्यांनी त्यांच्या Ph.D. प्रबंधामध्ये मांडणी करून १९५१ मध्ये 'सामाजिक निवड आणि वैयक्तिक मूल्ये' या ग्रंथात प्रसिध्द केले. मूळ शोधनिबंधाचे नाव 'सामाजिक कल्याणाच्या संकल्पनेतील एक अडचण' हे होते.

थोडक्यात, प्रमेयानुसार कोणतीही क्रमवारी निवडणूक प्रणाली तयार केली जावू शकत नाही, जी नेहमीच या तीन वाजवीपणा निकषाची पूर्तता करते. जर प्रत्येक मतदार Y सोडून X पर्यायाची निवड करीत असेल तर समूहही X चीच निवड/पसंती करतो. जर X आणि Y मधील प्रत्येक मतदाराची निवड बदलली नाही, तर X आणि Y मधील समूहाची निवडही बदलणार नाही. (जरी X व Z, Y व Z आणि Z व W यासारख्या जोड्यांमधील मतदारांची प्राधान्ये/पसंती बदलली असली तरी) येथे हुकूमशाही नाही, कोणत्याही मतदारांकडे नेहमीच समूहाच्या प्राधान्याचे निर्धारण करण्याचे सामर्थ्य नाही.

ॲरोच्या विचारानुसार वैयक्तिक पसंती व्यक्त करण्याकरिता किमान पाच अटींची गरज आहे, त्या अटी पुढीलप्रमाणे आहेत.

१. **सामुदायिक विवेकशीलता :** सर्वच संभवनीय विकल्प हे सामाजिक निवडीतून निर्माण व्हावयास हवेत ते विवेकशीलतेवर आधारित असावयास हवेत.

३. प्रा. बाऊमोल यांनी या प्रमेयावर टिका केली आहे, त्यांच्यामते, असंगत किंवा अप्रजातंत्रात्मक निवड हा एकमेव विकल्प नाही.

४. हे प्रमेय ज्या मतदान पध्दतीवर आधारित आहे, ती अवास्तविक आहे, मतांच्या खरेदी-विक्रीलाही संमती दर्शविणारी आहे.

अशाप्रकारे टीका होत असलीतरी अमर्त्य सेन यांच्या मते, हे प्रमेय पूर्ण रूपाने सर्वमान्य आहे ह्यातच याचे वैशिष्ट्ये दिसून येते. पसंतीच्या संयोजनाची कोणतीही पध्दती निवडण्याचे स्वातंत्र्य या प्रमेयाने दिले आहे.

बर्गसनच्या मते, लोकशाहीमध्ये बहुसंख्य लोकांना जे चांगले वाटते ते कल्याण वाढविणारे आहे, असे समजावे. राजकीयदृष्ट्या बहुसंख्य लोकांना जे चांगले वाटते, ते कल्याणवर्धक आहे, असे समजावे व सामाजिक कल्याणाचा फलनसंबंध मांडावा.

## ३.३ सारांश (Summary)

सामाजिक कल्याणाबाबत पॅरेटोपूर्वी अनेक अर्थशास्त्रज्ञांनी ज्या संकल्पना मांडल्या त्याचा मुख्य आधार हा अंकवाचक उपयोगिता होता, त्यानुसार समाजातील विविध घटकांची उपयोगिता महत्तम झाल्यास सामाजिक कल्याणात वाढ झाली असे समजले जाते. पॅरोटो यांनी अंकदर्शी उपयोगिता तत्वाचा विकास अपुरा मानून तुलनात्मक तत्वाचा आधार घेतला. उपयोगितेची आंतरव्यक्ती तुलना महत्त्वाची मानली. त्याआधारे सामाजिक कल्याणाचे तत्त्व मांडले.

पॅरोटोच्या मते, सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्यासाठी उपलब्ध साधनसामग्री आणि उत्पादनाचे असे पुनर्वाटप करणे आवश्यक आहे की, ज्यामुळे एखाद्याच्या उपयोगितेत वाढ घडून आलेली असावी. वास्तविक पाहता सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्यासाठी उपभोक्त्यांच्या पसंतीनुसार संसाधने, उत्पादन प्राप्त होणे किंवा त्याचे वाटप घडून येणे आवश्यक आहे. पॅरेटोने तीन प्रकारच्या कार्यक्षमता सांगितल्याआहेत. (१) पर्याप्त उत्पादन (२) पर्याप्त विनिमय आणि (३) उत्पादन संयोगाची कार्यक्षमता.

कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये क्षतिपूरक तत्व हे योग्य सामाजिक स्थितीच्या जोड्यांपैकी कोणती जोडी निवडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निर्णयाशी संबंधित आहे. पॅरेटोच्या विचारात सुधारणा करून कॅल्डोर हिक्स यांनी क्षतिपूरक तत्वाची मांडणी केली. कॅल्डोर हिक्सच्या मते, सामाजिक कल्याणाचा प्रश्न शास्त्रशुध्दपणे हाताळण्यासाठी उत्पादनातील बदल आणि उत्पन्न वाटपातील बदल या दोन बाबींचा फरक लक्षात घेणे आवश्यक आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ (Glossory)

- **उत्पादन शक्यता वक्र :** स्विकारलेल्या उत्पादन पध्दतीने मर्यादित साधनांच्या साहाय्याने जास्तीत जास्त उत्पादन दाखविणाऱ्या वक्रास उत्पादन शक्यता वक्र म्हणतात.

## ❀ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) *(क) करार वक्र.*

२) *(ब) उच्च पातळी पर्याप्तता.*

३) *(क) दोन्ही.*

४) *(ब) सिटोव्हस्की.*

५) *(ड) सिटोव्हस्की.*

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१) पॅरेटोचे कल्याणविषयक पर्याप्तता स्पष्ट करा.

२) सामाजिक कल्याणाबाबतचे कॅल्डोर-हिक्स क्षतिपूरक तत्व स्पष्ट करा.

३) बर्गसनचे सामाजिक कल्याण फलन स्पष्ट करा.

४) ॲरोचे अशक्यता प्रमेय स्पष्ट करा.

५) सिटोव्हस्कीचा सामाजिक कल्याणाचा दुहेरी निकष स्पष्ट करा.

### (ब) टिपा लिहा.

१) करार वक्र.

२) सामुदायिक/सामाजिक समवृत्ती वक्र.

३) मूल्य निर्णय आणि कल्याणकारी अर्थशास्त्र.

४) उच्चपातळी पर्याप्तता.

५) सॅम्यूअलसनचा उपयोगिता संभाव्यता वक्र.

## ३.७ संदर्भसूची


१. **Ahuja, H. L.** (2013) : *"Advanced Micro-economics",* S. Chand Publications, New Delhi.

२. **Dwivedi, K. N.** (2012) : *"Micro Economics",* Pearson Education India.

घटक–४

# अलिकडील कल्याणकारी विचार

## ( Recent Welfare Thoughts )

---


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ सामाजिक व खाजगी असमानतेची कल्पना, बिगर बाजार परस्परावलंबनाच्या समस्या, उत्पादनातील बहिर्गतता आणि उपभोग, बाह्य बचती व बेबचती, सार्वजनिक वस्तूची समस्या

४.२.२ पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र, दुहेरी पर्याप्तता, सीमांत खर्च किंमत

४.२.३ खर्च लाभ विश्लेषण, परस्परावलंबी उपयोगिता, गतिमान कल्याणकारी विश्लेषण

४.२.४ मालमत्ता हक्क आणि विकास धोरणे, वाजवीपणा सिध्दांत आणि विभाजनासंबंधीचा न्याय, सार्वजनिक निवडीचा सिध्दांत आणि धोरण उपयोजन, कल्याणकारी अर्थशास्त्रातील अमर्त्य सेनचे योगदान

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


### ४.० उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींची कल्पना येईल.

१. सामाजिक व खाजगी असमानतेची कल्पना समजून घेता येईल.

२. बिगर बाजार परस्परावलंबनाच्या समस्या समजून घेता येईल.

३. उत्पादनातील बहिर्गतता आणि उपभोग समजून घेता येईल.

४. बाह्य बचती व बेबचती समजून घेता येईल.

५. सार्वजनिक वस्तूची समस्या स्पष्ट करता येईल.

६. पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र समजून घेता येईल.

७. दुहेरी पर्याप्तता समजून घेता येईल.

८. सीमांत खर्च किंमत स्पष्ट करता येईल.

९. खर्च लाभ विश्लेषण समजून घेता येईल.

१०. परस्परावलंबी उपयोगिता स्पष्ट करता येईल.

११. गतिमान कल्याणकारी विश्लेषण स्पष्ट करता येईल.

१२. मालमत्ता हक्क आणि विकास धोरणे, वाजवीपणा सिध्दांत व विभाजनासंबंधीचा न्याय स्पष्ट करता येईल.

१३. सार्वजनिक निवडीचा सिध्दांत आणि धोरण उपयोजन समजून घेता येईल.

१४. कल्याणकारी अर्थशास्त्रातील अमर्त्य सेन यांचे योगदान समजून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना (Introduction)

ज्या सार्वजनिक वस्तूंचे बाजार परिणाम असतात अशा सार्वजनिक वस्तू व्यापारी क्षेत्रामध्ये उत्पादन व वितरणासाठी दिल्या तरी चालतात, कारण त्या वस्तू बाजार यंत्रणेद्वारे त्या वस्तूंची किंमत ठरवू शकतात. तसेच सरकार अशा वस्तू स्वत:कडे ही उत्पादन व वितरणासाठी ठेवू शकतात, परंतु ज्या शुध्द खाजगी वस्तूंच्या बाबतीत बाजार यंत्रणा नसते. अशा वस्तूंच्या बाबतीत त्यांच्या पुरवठ्यामध्ये खर्च व सामाजिक सीमांत खर्च यामध्ये फरक करता येत नाही. जरी अशा वस्तू खाजगी क्षेत्राकडे उत्पादनासाठी व वितरणासाठी दिल्या तरी त्या वस्तूची बाजार यंत्रणा किंमत हीच त्या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी बिगर बाजार यंत्रणा निर्माण होते.

## ४.३ विषय विवेचन (Subject Matter)

### ४.२.१ सामाजिक व खाजगी असमानतेची कल्पना (Divergence between private and Social cost) :-

कल्याण महत्तम करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न महत्तम केले पाहिजे असे सांगितले आहे. राष्ट्रीय उत्पन्न महत्तम तेव्हाच असते की जेव्हा राष्ट्रातील उत्पादक घटक वाटप युक्त असताना प्राप्त होणारी उत्पत्ती महत्तम असते. त्याचप्रमाणे उत्पादित वस्तूचा उपयोग योग्य होत असेल तरच सामाजिक कल्पना महत्तम होते.

## ❀ खाजगी खर्च (Private Cost) :

खाजगी वस्तूंचे उत्पादन करण्यामध्ये भाग घेत असलेल्या सर्व उत्पादक घटकांना त्याच्या कमाल कार्यक्षम क्षेत्रातील सीमांत उत्पादनाच्या बाजार किंमती इतकी किंमत मिळत असते. खाजगी खर्चाची कल्पना ही महत्त्वाची आहे. उत्पादक उत्पादनाच्या प्रक्रियेत पैशाच्या रूपाने जो खर्च करतो त्यास खाजगी खर्च असे म्हणतात. खाजगी खर्चाची व्याख्या पुढीलप्रमाणे, वस्तू उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींबर उद्योग संस्थेने पैशाच्या रूपात केलेला खर्च म्हणजे खाजगी खर्च होय. उदा. उद्योग संस्थेला वस्तूचे उत्पादन करण्यासाठी कामगाराचे वेतन, पगार, कच्चामाल, वीज खर्च, विमा खर्च, वाहतुकीवरील केलेला खर्च, जाहिरातबाजी, व्याज, घसारा, कर वगैरे बाबींवर खाजगी खर्च करावा लागतो.

## ❀ सामाजिक खर्च (Social Cost) :

एखादी वस्तू उत्पादित करण्यासाठी वैयक्तिक उत्पादकाला जो खर्च येतो त्यास खाजगी खर्च असे म्हणतात. तसेच एखादी वस्तू उत्पादित करण्यासाठी समाजात जो खर्च समाजातील साधन सामग्रीच्या रूपाने येत असतो. उत्पादनासाठी सामाजिक मालकीची दुर्मिळ साधनसामग्री नष्ट होत असते. नैसर्गिक साधनसंपत्तीवर सर्व समाजाची मालकी असते. उदा. जमीन, पाणी, खनिजे, कच्चा माल वगैरे ही नैसर्गिक साधन संपत्ती अनेक गरजामध्ये वापरता येते. त्यापैकी जास्तीत जास्त चांगली गरज पूर्ण करण्यासाठी तिचा वापर केला जातो. या साधनसंपत्तीच्या साहाय्याने समाजाला आवश्यक असणाऱ्या पाण्याचा वापर करून शेतीमध्ये ज्वारी, गहू, तांदूळ, ऊस वगैरे पिके घेतली जातात व समाजाची अन्नधान्याची गरज पूर्ण केली जाते ही पिके घेण्यासाठी सामाजिक मालकीची जी साधन संपत्ती खर्च झालेली असते त्यास सामाजिक खर्च असे म्हणतात.

## ❀ बिगर बाजार परस्परावलंबनाच्या समस्या (Problems of non-market inter-dependence) :-

ज्यावेळी बहिर्गत परिणाम हे बाजारामध्ये वस्तूच्या मागणी व पुरवठ्यामुळे ठरणाऱ्या किंमतीद्वारे योजता येत नाहीत त्यावेळी त्यांना बिगर बाजार परस्परावलंबन असे म्हणतात. म्हणजेच बाजार यंत्रणेमध्ये वैयक्तिक आर्थिक तोट्यापासून संरक्षित होत नाहीत तसेच फायद्यापासून वगळलेही जात नाहीत असे सार्वजनिक वस्तूच्या बाबतीत दिसून येते. उदा. शिक्षण, नवे रस्ते यापासून मिळणाऱ्या आर्थिक फायद्याचे मापन करणे फार कठीण असते. याठिकाणी अशा वस्तूचे उत्पादन व वितरण सार्वजनिक सत्तेच्या हातात असावे लागते. त्यामुळे अशा वस्तू व सेवा कार्यक्षमतेने उपलब्ध करून दिल्या जाऊ शकतात.

ज्या सार्वजनिक वस्तूंचे बाजार परिणाम असतात अशा सार्वजनिक वस्तू व्यापारी क्षेत्रामध्ये उत्पादन व वितरणासाठी दिल्या तरी चालतात. कारण त्या वस्तू बाजार यंत्रणेद्वारे त्या वस्तूंची किंमत ठरवू शकतात. तसेच सरकार अशा वस्तू स्वत:कडे ही उत्पादन व वितरणासाठी ठेवू शकतात. परंतु ज्या शुध्द खाजगी वस्तूंच्या बाबतीत बाजार यंत्रणा नसते. अशा वस्तूंच्या बाबतीत त्याच्या पुरवठ्यामध्ये खर्च व सामाजिक

सीमांत खर्च यामध्ये फरक करता येत नाही. जरी अशा वस्तू खाजगी क्षेत्राकडे उत्पादनासाठी व वितरणासाठी दिल्या तरी त्या वस्तूची बाजार यंत्रणा किंमत हीच त्या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी बिगर बाजार यंत्रणा निर्माण होते.

### ❀ उत्पादनातील बहिर्गतता आणि उपभोग (Externalities of production and consumption) :-

खाजगी वस्तूच्या उत्पादनाचा अथवा उपभोगाचा परिणाम म्हणून ती वस्तू न वापरणाऱ्यांना जेव्हा तिचा लाभ किंवा नुकसान होते तेव्हा बहिर्गतता निर्माण होतात. या बहिर्गततेमुळे बाजार यंत्रणा काम करू शकत नाही किंवा तिच्यावर मर्यादा पडतात.

जेव्हा एखाद्या कारखान्यात उत्पादन होते, तेव्हा त्या कारखान्याचा धूर हवेत सोडला जातो व प्रदूषण होते. त्या कारखान्याच्या वस्तू उत्पादनाशी संबंधित नसणाऱ्याला त्याचा त्रास होतो. हा धुराचा त्रास ही उत्पादनातील बहिर्गतता आहे, याचा उत्पादन खर्चात समावेश नसल्याने त्याचे आवश्यकतेपेक्षा अधिक उत्पादन होते.

जर साथीच्या आजाराची लस एखाद्याने टोचून घेतली तर त्या व्यक्तीचा फायदा होतो, पण त्याचबरोबर इतरांनाही तो रोग न झाल्याने इतरांचाही फायदा होतो. शासन उत्पादनातील या बहिर्गतता नियंत्रित करण्यासाठी हस्तक्षेप करणे आवश्यक ठरते.

### ❀ उपभोग :–

समाजाची एकूण साधनसामग्री खाजगी आणि सार्वजनिक वस्तूंच्या उपलब्धतेसाठी कोणत्या प्रकारे वापरावी यासाठी त्यांनी करारसंबंधात वापरलेल्या तत्वाचाच वापर केला आहे. उपयोगिता दृष्टिकोणानुसार प्रत्येक व्यक्तीला सार्वजनिक वस्तूच्या वापरातून उपयोगिता मिळते. तसेच या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी कर आकारणी केल्याने उपभोक्त्यांना त्याग करावा लागतो. हा त्याग म्हणजे सार्वजनिक वस्तूंच्या उपलब्धतेसाठी दिलेली कराची रक्कम होय. या करातून जेवढ्या खाजगी वस्तू सोडून द्यावा लागल्या हा त्याग होय, ही सार्वजनिक वस्तूची किंमत होय. एकूण सर्व व्यक्तीचा सीमांत लाभ व सीमांत त्याग बरोबर झाल्यास साधनसामग्रीचे पर्याप्त वाटप झाले असे म्हटले जाते.

१) ही संकल्पना उपयोगितेच्या संख्यात्मक मापनावर आधारीत आहे.

२) प्रत्येक व्यक्ती आपले अंदाजपत्रक खाजगी व सार्वजनिक वस्तूमध्ये पर्याप्तपणे वापरते असे गृहीत आहे, पण हे साध्य करणारी व्यवस्था त्यांनी स्पष्ट केलेली नाही.

३) सर्व व्यक्तीचा खाजगी व सार्वजनिक वस्तूसाठी असणारा समतोल झाला तरच एकूण सामाजिक समतोल साध्य होईल.

## ❀ मोठ्या उत्पादनाच्या बाह्य बचती व बेबचती (External Economics and Diseconomics) :-

प्रकल्पाच्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाचे मोजमाप करणे, प्रकल्प उभारणी सुरू असताना प्रकल्पाची कार्यवाही सुरू झाली असताना, गुंतवणूक पूर्ण झाल्यानंतर व नवी उत्पादन क्षमता सुरू झाल्यानंतर हे परिणाम अभ्यासले जातात. प्रकल्पाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणामांचे मूल्यमापन करणे. प्रत्यक्ष परिणाम त्या प्रकल्पामुळे वस्तूच्या उत्पादनात झालेली वाढ दर्शवितात, तर अप्रत्यक्ष परिणाम त्या क्षेत्रातील इतर घटकांवर होणारे परिणाम असतात. उदा. पूरक उद्योग अथवा प्रकल्पावरील परिणाम विचारात घेतले जातात.

## ❀ बाह्य लाभ (बचती) (External Economics) :-

''उद्योगसंस्था विस्तार झाल्यामुळे किंवा त्यांची संख्या वाढल्यामुळे जे फायदे होतात त्यास बाह्य लाभ किंवा बचती असे म्हणतात.'' उद्योगधंद्याचा विस्तार व वाढ झाल्यामुळे नवीन व स्वस्त कच्चा माल यंत्रे व मशिनरी व इतर उत्पादन साधने उपलब्ध होतात. तसेच तंत्रज्ञान विकसित होऊन उत्पादन व्यवस्थापन व विक्रीच्या नवनवीन पध्दती शोधून काढल्या जातात व त्याचे लाभ उत्पादन संस्थांना मिळतात. उद्योगधंद्याचा विस्तार झाला की, अनेक नवनवीन उद्योगधंद्याला आवश्यक असणाऱ्या पूरक वस्तूंचे उत्पादन सुरू करतात व त्याचा लाभ सर्व उद्योगधंद्यांना मिळतो.

एखाद्या विशिष्ठ ठिकाणी उद्योगधंद्याचे स्थानिकीकरण झाले तर त्या ठिकाणी अनेक उद्योगसंस्था वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या निर्माण होतात, विशिष्ठ ठिकाणी उद्योगधंद्याची वाढ झाल्यामुळे वीज, पाणी, रस्ते, वाहतूक, टेलिफोन, संशोधन संस्था यासारख्या सोई व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होतात त्याचे फायदे सामुदायिकरित्या सर्व उद्योगसंस्थाना मिळतात. त्यांना बहिर्गत बचती किंवा बाह्य लाभ असे म्हणतात. हे लाभ उद्योगसंस्थेच्या आकारमानामुळे मिळत नसतात तर एकाच ठिकाणी अनेक उद्योगसंस्था केंद्रित झाल्यामुळे होत असतात हे बाह्य लाभ पुढीलप्रमाणे आहेत.

### १. केंद्रीकरणाचे लाभ :-

या प्रकारचे लाभ उद्योगधंद्याचे विशिष्ट ठिकाणी स्थानिकीकरण झाल्यामुळे होत असतात. जेव्हा उद्योगधंद्याची विशिष्ठ ठिकाणी वाढ होते, तेव्हा अनेक उद्योगसंस्था एकाच ठिकाणी केंद्रीत झालेल्या.असतात. त्याठिकाणी वीज, पाणी, रस्ते, वाहतूक, दळणवळण, बँका, वित्तीय संस्था, विमा कंपन्या स्थापन केल्या जातात व त्यांच्या पासूनचे विविध लाभ सर्व उत्पादन संस्थांना मिळतात. तसेच अशा ठिकाणी एकेमकांना पूरक कार्ये करणाऱ्या उद्योगसंस्था निर्माण केल्या जातात. त्यामुळे सर्व उद्योगसंस्थांना त्याचे लाभ मिळतात. उदा. मुंबई व सोलापूर येथे कापड उद्योगाचे केंद्रीकरण व स्थानिकीकरण घडून आले आहे. त्यामुळे या शहरात बँका, विमा, कंपन्या रस्ते दळणवळण वगैरे संस्थाचे जाळे दिसून येते या संस्था आपल्या सेवा सर्व उद्योग संस्थाना उपलब्ध करून देतात. तसेच कापड उद्योगाला पूरक असणाऱ्या अनेक उद्योगसंस्था या शहरात केंद्रीत झाल्याचे दिसून येते. धागा विणणाऱ्या, रंगकाम करणाऱ्या, रंगाचे उत्पादन करणाऱ्या, सूत

तयार करणाऱ्या अशा एकमेकांना पूरक उद्योगसंस्थांचा विकास होऊन त्याचे फायदे सर्व उद्योगसंस्थांना मिळतात.

## २. माहितीविषयक लाभ :–

या प्रकारचे लाभ एकाच ठिकाणी उद्योगसंस्थाचे केंद्रीकरण झाल्यामुळे मिळतात. सर्व उद्योगसंस्था एकत्रित येऊन उद्योगधंदे व बाजारविषयक माहिती देणारी मासिके, वृत्तपत्रे, पाक्षिके, माहिती पत्रिका चालवितात व प्रसिध्द करीत असतात. त्यांना कच्च्या मालाची उपलब्धता, विविध बाजारपेठांची माहिती, नव्या बाजारपेठा, वस्तूच्या किंमती, विविध उद्योगसंस्थांच्या उत्पादन पध्दती, भांडवल वगैरे संबंधीची माहिती सर्व उद्योगसंस्थांना मिळते व त्याचे फायदे त्यांना मिळतात.

## ३. संशोधन संस्थाचा विकास :–

उद्योगसंस्थांच्या केंद्रीकरणामुळे अनेक उद्योगसंस्था एकत्रित येऊन संशोधन संस्था स्थापन करतात. ही संशोधन संस्था उत्पादनविषयक, कच्चामालविषयक, उत्पादन व व्यवस्थापन पध्दतीबाबत, विक्री व बाजारपेठ विषयकाचे संशोधन हाती घेऊन त्याची माहिती उद्योगसंस्थांना देत असतात. त्याचे लाभ सर्वांना होतात.

## ४. प्रशिक्षण संस्थाची स्थापना :–

उदयोगधंद्याच्या केंद्रीकरणामुळे अनेक उद्योगसंस्था एकत्रित येऊन कामगार व अधिकारी वर्गास तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करतात. या संस्थांमधून कामगार व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविली जाते, त्यामुळे उत्पादन वाढते. हे फायदे सर्व उद्योगसंस्थांना मिळतात.

## ५. विशेषीकरणाचे लाभ :–

जेव्हा एखाद्या उद्योगाची वाढ विशिष्ठ ठिकाणी होते तेव्हा त्या उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेची विभागणी करून उत्पादनातील वेगवेगळी कामे त्या कामात तज्ञ असलेल्या व्यक्तीकडे सोपविली जातात. त्यामुळे जलद उत्पादन होऊन वस्तूंचा दर्जा व गुणवत्ता सुधारते, परिणामी वस्तूची मागणी वाढून नफा वाढतो. अशारितीने उद्योगधंद्याच्या केंद्रीकरणामुळे सर्व उद्योगसंस्थांना विशेषीकरणाचे लाभ मिळतात.

अशारितीने एका उद्योगसंस्थेच्या वाढीमुळे अंतर्गत लाभ मिळतात तर उद्योगधंदयाच्या वाढीमुळे बाह्य लाभ मिळतात. अंतर्गत लाभ व बाह्य लाभातील फरक पुसट आहे, कारण एखाद्या उद्योगसंस्थेला बाह्य लाभ दुसऱ्या उदयोगसंस्थेचे अंतर्गत लाभ असतात. एखाद्या उदयोगसंस्थेला बाह्य लाभ झाल्यामुळे तिची वाढ होऊन तिला अंतर्गत लाभ मिळू लागतात तर अंतर्गत लाभामुळे एखादी उद्योगसंस्था वाढत जाऊन तिच्या अनेक शाखा निघून तिचा विस्तार झाल्यास तिचे रूपांतर उद्योगधंद्यात होते व तिला बाह्य लाभ मिळू लागतात उदा. 'असीसी' (ACC) ही टाटाची सिमेंट उत्पादन करणारी एक उत्पादन संस्था आहे, परंतु देशातील सर्व राज्यात असीसी चे अनेक कारखाने/उद्योगसंस्था कार्य करीत आहेत, त्यामुळे तिचे रूपांतर

सिमेंट उद्योगात होऊन तिला अंतर्गत लाभाबरोबरच बाह्य लाभदेखील मिळतात, त्यामुळे अंतर्गत लाभ व बाह्य लाभ एकमेकांवर अवलंबून असतात.

## ❀ मोठ्या उत्पादनाचे तोटे किंवा बेबचती (Diseconomics of Large Scale Production) :-

मोठ्या उत्पादनाचे जसे फायदे आहेत, तसेच त्याचे काही तोटेदेखील उद्‌भवतात. जेव्हा उत्पादन एका विशिष्ठ मर्यादेपेक्षा जास्त (More than Optimum Level) होते अथवा पर्याप्त पातळीपेक्षा जास्त होते तेव्हा त्याचे काही तोटे निर्माण होतात, त्यांनाच 'उत्पादनाचे तोटे' (Diseconomies) असे म्हणतात. हे तोटेदेखील दोन प्रकारचे असतात.

अ) अंतर्गत तोटे (Internal Diseconomies) ब) बाह्य तोटे (External Diseconomies).

### अ) अंतर्गत तोटे/बेबचती (Internal Diseconomies) :-

मोठ्या प्रमाणातील उत्पादनामुळे उद्योगसंस्थेला जे अंतर्गत तोटे किंवा नुकसान होते त्यास 'अंतर्गत बेबचती किंवा तोटे' असे म्हणतात, हे तोटे पुढील प्रकारचे असतात.

१. **व्यवस्थापकीय बेबचती** (Managerial Diseconomices) :-

उत्पादनाचे प्रमाण पर्याप्त मर्यादेपेक्षा जास्त वाढल्यास उद्योगसंस्थेचे व्यवस्थापन सुव्यवस्थित होत नाही. योग्य व्यवस्थापनाऐवजी उद्योग संस्थेला तोटे उद्‌भवतात. मोठ्या प्रमाणातील उत्पादनामुळे अकार्यक्षम व्यवस्थापन, कामगारांच्या कार्यक्षमतेत घट होणे, अचूक निर्णयाचा अभाव, कामगार व व्यवस्थापनात समन्वय नसणे यासारख्या समस्या उद्‌भवतात व त्यामधून उत्पादन खर्च वाढून उद्योगसंस्थेच्या वस्तूच्या मागणी व नफ्यावर प्रतिकूल परिणाम घडून येतो.

२. **तांत्रिक बेबचती** (Technical Diseconomies) :-

उद्योगसंस्था उत्पादनात वापरत असलेल्या यंत्राची एक विशिष्ट उत्पादन करण्याची क्षमता असते, त्यापेक्षा जास्त उत्पादन त्या यंत्राकडून करून घेतल्यास उत्पादन खर्च वाढत जातो. कारण यंत्रात बिघाड निर्माण होतो व उद्योगसंस्थेला तोटे उद्‌भवतात. उदा. एखाद्या यंत्राची जास्तीत जास्त उत्पादन क्षमता दररोज १००० वस्तू तयार करण्याची असेल तर उत्पादक त्या यंत्राकडून दररोज १००० वस्तूंचे उत्पादन केल्यास उत्पादन खर्च कमीतकमी येतो. परंतु ही तांत्रिक उत्पादन क्षमता दररोज १००० वस्तूपेक्षा जास्त वाढविल्यास उत्पादन खर्च कमी होण्याऐवजी वाढत जातो व उद्योग संस्थेला तोटे होण्यास सुरूवात होते. यालाच तांत्रिक बेबचती असे म्हणतात.

३. **कार्य विलंब** (Delay) :-

उत्पादनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे उत्पादन वेगवेगळ्या विभागात विभागले जाते.

या वेगवेगळ्या विभागात योग्य समन्वय व सुसूत्रीकरणाअभावी उत्पादनकार्यात विलंब होतो. वेगवेगळी कामे वेळेत पूर्ण होत नाहीत. त्याबरोबर दप्तर दिरंगाई, कामगारांची अकार्यक्षमता यामुळे उत्पादनाचा वेग मंदावतो.

४. **कमी दर्जाच्या अधिकाऱ्याकडून निर्णय** (Decisions from Lower Officials) :-

संयोजक अथवा उच्च दर्जाचे निर्णय अधिकारी व प्रत्यक्षात उत्पादन संस्थेचे उत्पादनाचे ठिकाण यामध्ये फार मोठे अंतर असते, त्यामुळे उत्पादनाबाबत घेतले जाणारे निर्णय प्रत्यक्ष माहितीवर आधारित न घेतले जाता कनिष्ठ अधिकाऱ्यांनी पुरविलेल्या दुय्यम माहितीवर आधारित घेतले जातात किंवा निर्णयातील विलंब टाळण्यासाठी निर्णय घेण्याचे अधिकार दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांना दिले जातात, त्यामुळे अपुरे ज्ञान, समन्वयाचा अभाव व धोरणात एकवाक्यता नसणे यासारख्या समस्या उद्‌भवतात.

५. **कामगारातील उत्पादन प्रेरणेचा अभाव :–**

मोठ्या उत्पादनामुळे कामगारांची संख्या फार मोठी वाढत जाते. त्यांच्यामध्ये उत्पादनाची प्रेरणा कमी होत जाते, कारण त्यांना उद्योगसंस्थेबद्दल फारशी आत्मियता वाटत नाही, तसेच मोठ्या कामगार संख्येमुळे उद्योगसंस्थेचे व्यवस्थापन व कामगार यांच्यातील संबंध जवळकीचे न राहता ते दुरावत जातात. त्यामधून औद्योगिक कलह निर्माण होतात.

**ब) बाह्य तोटे/बेबचती (External Diseconomies) :-**

उत्पादनाचे प्रमाण मोठे झाल्यामुळे उदयोगसंस्थेला बाह्य तोट्यांनादेखील तोंड द्यावे लागते. मुख्य उद्योगसंस्थेला पूरक अशा अनेक उद्योगसंस्था मुख्य उद्योगसंस्थेच्या परिसरात स्थापन झाल्यामुळे हे बहिर्गत तोटे उद्‌भवतात ते पुढील प्रमाणे असतात.

१. **वित्तीय तोटे** (Financial Diseconomies) :-

जेव्हा उत्पादन फार मोठ्या प्रमाणात वाढते, तेव्हा उद्योगसंस्थेला मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता निर्माण होते. त्यासाठी मोठ्या वित्तपुरवठ्याची गरज असते. परंतु असा मोठ्या प्रमाणातील वित्तपुरवठा सहजासहजी उपलब्ध होत नाही. जर तो वेळेत व पुरेसा उपलब्ध झाला नाही तर उत्पादकाला मोठ्या प्रमाणात उत्पादन करणे शक्य होत नाही. उत्पादनात अडथळे येतात व उत्पादन खर्च वाढून वित्तीय बेबचती निर्माण होतात.

२. **वाहतूक समस्या** (Transportation Difficulties) :-

उत्पादनाच्या मोठ्या प्रमाणामुळे एकाच ठिकाणी अनेक उद्योगसंस्था केंद्रीत होतात. त्यामुळे वाहतुकीवर ताण पडतो. परिणामी कच्चा माल वेळेत उपलब्ध होत नाही. तसेच पक्कामाल कारखान्यातून ताबडतोब बाजारात पाठविता येत नाही, त्यामुळे उद्योगसंस्थेचे नुकसान होते.

### ३. **खंड व उत्पादन खर्चात वाढ** (High Rent and Costs) :-

उद्योगधंद्याच्या केंद्रीकरणामुळे एकाच ठिकाणी अनेक उद्योगसंस्था केंद्रीत होतात. त्यामुळे जमीनीची टंचाई निर्माण होते. जमीनीच्या किंमती वाढून खंडात वाढ होते व उत्पादन खर्च वाढतो.

### ४. **वेतनदर वाढ** (High Cost of Labour) :-

उत्पादनाच्या मोठ्या प्रमाणामुळे उत्पादनासाठी आवश्यक आदानांची मागणी वाढते. त्यामुळे कच्चा माल, वीज या घटकांच्या किंमती वाढतात व उत्पादन खर्च वाढतो. परिणामी उत्पादनामध्ये घटत्या सीमांत उत्पादन फलाचा सिध्दांत प्रत्ययाला येतो.

## ❀ सार्वजनिक वस्तूची समस्या (Problems of Public Goods) :-

बहिर्गतता ह्या सार्वजनिक वस्तूशी संबंधित असतात. बहिर्गतता हे एक सार्वजनिक वस्तूचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बहिर्गतता ही संकल्पना म्हणजे असे आर्थिक परिणाम होत की, जे उत्पादनामुळे व उपभोगामुळे इतर व्यक्तींना किंवा आर्थिक घटकांना सोसावे लागतात. असे म्हटले जाते की, सार्वजनिक वस्तू आणि बहिर्गतता या मोठ्या प्रमाणात एकसंघीय व्यक्तीय परिणाम करतात की, ज्या परिस्थितीत या बहिर्गतता त्या लोकांना चांगल्या किंवा वाईट ठरू शकतात. म्हणजेच दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, बहिर्गतता म्हणजे आर्थिक क्षेत्रात चांगले किंवा वाईट परिणाम सहन करावे लागतात. उदा. शिक्षणामुळे व्यक्तीच्या स्वत:च्या कौशल्यात व ज्ञानात वाढ होते तसेच त्याचा चांगलाही परिणाम समाजावरती होतो. समाजाचे सर्वसामान्य कल्याण वाढते याचा अर्थ बहिर्गत चांगले परिणाम होतात. तसेच वाहनाच्यामुळे आणि कारखान्यामुळे बहिर्गत तोटे ही होतात उदा. वाहने आणि कारखान्यामुळे निघणाऱ्या धुरामुळे वायू प्रदूषण होते. हे वायू प्रदूषण सार्वजनिक दु:खकारक असते. तसेच कोळशावर चालणाऱ्या रेल्वे इंजिनामधून निघणाऱ्या धुरामुळे वायूप्रदूषण होऊन समाजाला त्रास होतो. अशावेळी समाजाचा खर्च वाढतो, त्यामुळे सार्वजनिक खर्चाचा आणि खाजगी खर्चाचा स्पर्धात्मक प्रश्न निर्माण होतो. म्हणजेच सार्वजनिक वस्तूचे बहिर्गत वाईट परिणामही असे म्हणतात.

## ⁎ स्वयं-अध्ययन प्रश्न - १

## ❀ रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. शुध्द खाजगी वस्तूंच्या बाबतीत .............. नसते.

*(अ) बाजार यंत्रणा* *(ब) सार्वजनिक वस्तू*

*(क) दोन्ही* *(ड) यापैकी नाही.*

२. उद्योगसंस्थेचा विस्तार झाल्यामुळे किंवा त्याची संख्या वाढल्यामुळे जे फायदे होतात त्यास ............... असे म्हणतात.

*(अ) बाह्य बचती* *(ब) अंतर्गत बचती* *(क) दोन्ही* *(ड) वरीलपैकी नाही.*

३. मुंबई व सोलापूर येथे ............. उद्योगाचे केंद्रीकरण व स्थानिकीकरण घडून आले आहे.

*(अ) कापड* *(ब) कार* *(क) लोखंड* *(ड) वरीलपैकी नाही.*

### ४.२.२ पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र (Pigovian Welfare Economics) :-

प्रा. ऑर्थर सेसील पिगू (Arthur Cecil Pigou) हे ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ असून त्यांनी केंब्रिज विद्यापीठात स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची बांधणी केली. ते केंब्रिज अर्थतज्ञांच्या विचाराने प्रशिक्षित व प्रभावित झाले होते. त्यांचा जन्म १८ नोव्हेंबर १८७७ रोजी ऱ्हाडे, यु. के. येथे झाला तर मृत्यू ७ मार्च १९५९ रोजी केंब्रिज यु.के. येथे झाला. हे नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञ असून त्यांचे नावे बहिर्गतता, पिगू परिणाम, पिगूवीन कर इत्यादी संकल्पना आहेत. व्यापार चक्र सिध्दांत, बेरोजगारी, सार्वजनिक आयव्यय, किंमत निर्देशांक व राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन इत्यादीचाही पिगूंच्या लिखानात समावेश आहे.

प्रा. ऑर्थर सेसील पिगूने "The Economics of Welfare" हा ग्रंथ १९३२ मध्ये लिहिला. या ग्रंथात त्याने प्रथमच कल्याणकारी अर्थशास्त्राची पध्दतशीर मांडणी केली. त्यामुळे प्रा. पिगूला कल्याणकारी अर्थशास्त्राचा जनक मानले जाते. पिगू हा नवसनातनवादी संप्रदायातील विचारवंत होता. म्हणून पिगूच्या कल्याणकारी अर्थशास्त्राला नवसनातनवादी कल्याण विषयक दृष्टीकोन म्हटले जाते. तसेच त्याला कल्याणकारी अर्थशास्त्राचा जुना दृष्टिकोन म्हटले जाते. ते नवसनातनवाद्यांच्या अंकदर्शी उपयोगिता विश्लेषणावर आधारलेले आहे. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या जुन्या दृष्टीकोनात प्रा. पिगू, प्रा. रेडर, डॉ. ग्राफ यांचा समावेश होतो. या दृष्टीकोनात उपयोगिता, समाधानाला महत्त्वाचे स्थान आहे. प्रा. पिगूच्या पूर्वी आर्थिक विश्लेषणात 'महत्तम उपयोगिता', 'महत्तम समाधान' असा उल्लेख केला जात असे. प्रा. पिगूने त्याऐवजी 'महत्तम कल्याण' हा शब्दप्रयोग केला. तेव्हापासून कल्याणकारी अर्थशास्त्रास सुरूवात झाली.

प्रा. पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्राबाबतचे विचार तीन प्रकारात विभागले जातात.

१) प्रा. पिगूची कल्याणाची व्याख्या.

२) महत्तम कल्याणाच्या अटी.

३) कल्याणात वाढ करण्यासाठी धोरणात्मक शिफारशी.

### ❀ प्रा. पिगूची कल्याणाची व्याख्या (Meaning or Definition of Welfare) :-

प्रा. पिगूने कल्याणाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी पुढील व्याख्या दिली.

''आर्थिक कल्याण हा सामाजिक (सर्वसाधारण) कल्याणाचा असा भाग की जो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे पैसा या मापदंडाशी संबंधित असतो. (Pigou defines economic welfare as "that part of social (general) welfare that can be brought directly or indeirectly into relation with the measuring rod of money.") याचा अर्थ पिगूच्या मते, ज्या वस्तू व सेवांची देवाण-घेवाण पैशाच्या साहाय्याने होते, अशा वस्तू व सेवांच्या उपभोगापासून एखाद्या व्यक्तीला मिळणारे समाधान अथवा उपयोगिता म्हणजे

आर्थिक कल्याण होय. पिगूने आर्थिक कल्याणाची स्पष्ट अशी व्याख्या दिली. व्यक्तीगत कल्याण म्हणजे वस्तू व सेवांच्या उपभोगापासून व्यक्तीला मिळणाऱ्या समाधानाची बेरीज होय. तर सामाजिक कल्याण म्हणजे व्यक्तीगत कल्याणाची बेरीज होय. पिगू म्हणतो, कल्याण ही व्याप्त संकल्पना आहे. म्हणून कल्याणाची कल्पना पैशाशी जोडून तिची मर्यादा ठरवून दिली. म्हणजे पैशाच्या सहाय्याने विनिमय होणाऱ्या वस्तू व सेवांनाच त्याने समाधान म्हटले. म्हणजे पिगूने वस्तुनिष्ठरित्या कल्याणाची कल्पना राष्ट्रीय उत्पन्नाशी जोडली. राष्ट्रीय उत्पन्नाच्या विभाजनात कोणताही बदल न होता राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास कल्याणातदेखील वाढ होते. याउलट राष्ट्रीय उत्पन्न कमी झाल्यास आर्थिक कल्याणदेखील कमी होते. अशारितीने सामाजिक कल्याणाचे संख्यात्मक मोजमाप राष्ट्रीय उत्पन्नाच्या साहाय्याने करता येते असे पिगू यांनी मांडले. याचा अर्थ जास्त राष्ट्रीय उत्पन्न जास्त कल्याण, कमी राष्ट्रीय उत्पन्न कमी कल्याण होय.

## ❀ प्रा. पिगूच्या कल्याणकारी अर्थशास्त्राची गृहीते (Assumptions of Pigovian Welfare Economics) :-

यानाच नवसनातनवाद्यांची (Neo-Classical) कल्याणकारी अर्थशास्त्राची गृहीते असे म्हणतात. ही गृहीते पुढीलप्रमाणे होत.

**१. उपभोक्ता सूज्ञ असतो :** प्रत्येक उपभोक्ता जास्तीत जास्त (महत्तम) समाधान मिळविण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक उपभोक्ता सूज्ञ असतो, तो विविध वस्तूंवर आपला खर्च अशारितीने करतो की, वस्तूंच्या खरेदीपासून त्याला जास्तीत जास्त समाधान मिळते.

**२. उपयोगितेचे क्रमदर्शी मापन :** व्यक्तीला वस्तूंपासून मिळणाऱ्या उपयोगितेची तुलना करता येते तसेच दोन व्यक्तींना मिळणाऱ्या उपयोगितांची देखील तुलना येते. त्यामुळे आर्थिक कल्याणाचे संख्यात्मक मापन करून आर्थिक कल्याण वाढले की घटले हे सांगता येते, म्हणजेच उपयोगितेचे क्रमदर्शी मापन करता येते. याबाबत पिगू म्हणतो, उपयोगितेचे मापन आकड्यात करता येत नाही परंतु त्यांची तुलना करता येते.

**३. सारखे समाधान मिळविण्याचे क्षमता गृहीतक :** समाजातील वेगवेगळे लोक सारख्याच परिस्थितीत वास्तव उत्पन्नापासून सारखेच समाधान मिळवितात. हे पिगूच्या कल्याणकारी अर्थशास्त्राचे महत्वाचे गृहीत आहे. गरीब व श्रीमंत व्यक्तीची समाधान मिळविण्याची क्षमता सारखीच असते.

**४. पैशाची सीमांत उपयोगिता घटत जाते :** व्यक्तीकडील पैशांच्या साठ्यात वाढ झाल्यास पैशाची सीमांत उपयोगिता घटत जाते. त्यामुळे पैशाची सीमांत उपयोगिता गरीबाला जास्त तर श्रीमंताला कमी असते.

## ❀ प्रा. पिगूची दुहेरी पर्याप्तता (Pigou's Second Optima) :-

प्रा. पिगूची सामाजिक पर्याप्ततेची कल्पना म्हणजे समाजाचे जास्तीत जास्त कल्याण साधने होय किंवा सामाजिक पर्याप्तता म्हणजे सामाजिक कल्याणाचे महत्तमीकरण होय. सामाजिक कल्याणाचे

महत्तमीकरण ही अशी अवस्था असते की, त्या अवस्थेला सामाजिक कल्याण जास्तीत जास्त (महत्तम) असते. ही सामाजिक कल्याणाची आदर्श व्यवस्था होय.

### ❀ वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे महत्तमन :-

प्रा. पिगूने सामाजिक कल्याणाची कल्पना राष्ट्रीय उत्पन्नाशी जोडली. म्हणजे पिगूने राष्ट्रीय उत्पन्नाच्या साहाय्याने सामाजिक मोजमाप करता येते असे म्हटले, त्याने राष्ट्रीय उत्पन्न हा सामाजिक कल्याणाचा संख्यात्मक निर्देशक मानला. पिगू म्हणतो इतर परिस्थिती कायम राहून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास समाजाच्या आर्थिक कल्याणात देखील वाढ होते. याउलट राष्ट्रीय उत्पन्न कमी झाल्यास आर्थिक कल्याण देखील कमी होते. राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट असलेल्या वस्तू व सेवांना पैशातील मूल्य असते. जेव्हा देशातील वस्तू व सेवांचे उत्पादन वाढते, तेव्हा लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होते, त्यामुळे लोकांना आता पूर्वीपेक्षा जास्त समाधान मिळते. सामाजिक कल्याणात जास्तीत जास्त वाढ करण्यासाठी (महत्तम) वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात जास्तीत जास्त वाढ (महत्तम) घडवून आणली पाहिजे. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात जास्तीत जास्त वाढ घडवून आणण्यासाठी देशातील साधन सामग्रीचे पर्याप्त वाटप घडून आले पाहिजे. साधन सामग्रीच्या पर्याप्त वाटपासाठी कमी उत्पादक व्यवसायाकडून जास्त उत्पादक व्यवसायाकडे साधनसामग्री वळविली पाहिजे. त्यामुळे वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे महत्तमन होते. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात जास्तीत जास्त वाढ घडनू येणे (महत्तम) वाढीची पहिली अट आहे. परंतु ही अट पुरेशी नाही. म्हणून प्रा. पिगू म्हणतो, सामाजिक कल्याणात जास्तीत जास्त वाढ घडून येण्यासाठी वाढलेल्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे समाजात योग्य व समान वाटप झाले पाहिजे.

### ❀ राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप :-

वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे समाजातील गरीब व श्रीमंतामध्ये समान वाटप झाले पाहिजे ही सामाजिक कल्याणाच्या महत्तमाची दुसरी अट पूर्ण झाली पाहिजे असे पिगू म्हणतो. त्यासाठी समाजाच्या पैशातील उत्पन्नाचे समान वाटप झाले पाहिजे. पिगूच्या मते, समाजातील श्रीमंत लोकांकडे गरीबांपेक्षा जास्त उत्पन्न असते त्यामुळे श्रीमंत लोकांना गरीबांपेक्षा पैशाची सीमांत उपयोगिता कमी असते. गरीबांची उत्पन्नापासून समाधान मिळविण्याची क्षमता श्रीमंत लोकांएवढीच असते (पिगूचे समाधान मिळविण्याची समान क्षमता गृहीत) त्यामुळे वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे श्रीमंताकडून गरीबांकडे हस्तांतरण झाल्यास सामाजिक कल्याणात वाढ होते. जेव्हा समाजातील पैशातील उत्पन्नाचे हस्तांतरण श्रीमंत लोकांच्याकडून गरीबांकडे होते, तेव्हा गरीब लोक आपल्या कमी-तीव्र गरजांऐवजी जास्त तीव्र गरजांची पूर्तता करतात, त्यामुळे सामाजिक कल्याणात जास्तीत जास्त वाढ होते. अशारितीने पिगूच्या मते समाजाच्या पैशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप सामाजिक कल्याणात जास्तीत जास्त वाढ घडवून आणते.

यालाच सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्याचा प्रा. पिगूचा 'दुहेरी निकष' (Double Criterion) असे म्हणतात, १) पिगूने सामाजिक आर्थिक कल्याणाचे मोजमाप पैशातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या

साहाय्याने करून राष्ट्रीय उत्पन्न वाढले की सामाजिक कल्याण वाढते असे स्पष्ट केले व २) पैशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप घडवून आणल्यास सामाजिक कल्याणात जास्तीत जास्त (महत्तम) वाढ होते असे पिगूने म्हटले.

वरील दोन्ही अटींची पूर्तता झाल्यास सामाजिक कल्याणात जास्तीत जास्त वाढ होते.

## ❀ पिगूचे बाह्य परिणाम विश्लेषण (The Pigovian Analysis of External Effects)

प्रा. पिगूच्या मते, जास्तीत जास्त आर्थिक कल्याण साध्य करण्यासाठी सामाजिक निव्वळ उत्पादन (Social Net Product) व खाजगी निव्वळ उत्पादन (Private Net Product) दोन्ही समान असले पाहिजेत. या दोहोंत बाह्य परिणामांमुळे (External Effects) फरक पडत असतो. सरकारने आपल्या आर्थिक धोरणानुसार या दोन घटकांमधील तफावत दूर केल्यास सामाजिक कल्याणात वाढ होते. हे बाह्य परिणाम म्हणजे बाजारातील अपूर्णता होय. बाजारातील या अपूर्णतेमुळे विशिष्ठ सेवांसाठी किंमत आकारली जात नाही. या बाह्य परिणामांमुळे साधन सामग्रीचे चुकीचे वाटप घडून येऊन उत्पादन अथवा उपभोगामध्ये पर्याप्तता प्राप्त होत नाही. ते पर्याप्त उत्पादन पातळीपेक्षा कमी राहते. परिणामी, सामाजिक कल्याण महत्तम पातळी गाठत नाही. म्हणजे सामाजिक कल्याणात जास्तीत जास्त वाढ घडून येत नाही.

खाजगी निव्वळ उत्पादन (Private Net Product) म्हणजेच खाजगी उद्योजकांना त्यांच्या मालकीच्या उद्योगापासून मिळणारे उत्पन्न होय. तर सामाजिक निव्वळ उत्पादन (Social Net Product) म्हणजे खाजगी उद्योजकांची राष्ट्रीय उत्पन्नातील वाटपाची बेरीज होय. सामान्यत: सामाजिक निव्वळ उत्पादन व खाजगी निव्वळ उत्पादन या दोहोंत तफावत आढळून येते. काही वेळा याच्या उलट अवस्था आढळून येते. पुढील उदाहरणाच्या सहाय्याने खाजगी निव्वळ उत्पादन हे सामाजिक निव्वळ उत्पादनाबरोबर नाही हे स्पष्ट होते. उदा. कारखान्याच्या धुराड्यातून धूर निघून वातावरणात प्रदूषण निर्माण होते. त्यामुळे लोकांचे कपडे खराब होतात, तसेच लोकांच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होऊन लोकांना कपड्याच्या धुलाईवर व औषधावर खर्च करावा लागतो. साखर कारखानदार लोकांना जी हानी पोहचवितो, त्याबद्दल त्याच्याकडून रक्कम वसूल केली जात नाही. साखर कारखानदाराला साखरेच्या विक्रीपासून उत्पन्न मिळते परंतु त्या उत्पादनापासून समाजाला हानी पोहोचते. त्यामुळे या उदाहरणात खाजगी निव्वळ उत्पादन हे सामाजिक निव्वळ उत्पादनापेक्षा जास्त असते.

दुसरे उदाहरण पाहू, ज्यामध्ये सामाजिक निव्वळ उत्पादन खाजगी निव्वळ उत्पादनापेक्षा जास्त आहे. समजा एखाद्या भागाचे वनीकरण केले तर वनीकरणामुळे त्या भागातील लोकांना लाकूड मिळते. त्याबरोबर वातावरणात सुधारणा होते, त्याचा फायदा त्या भागात राहणाऱ्या लोकांना कोणतीही किंमत अथवा रक्कम न देता होतो. या परिस्थितीत सीमांत सामाजिक उत्पादन हे सीमांत खाजगी उत्पादनापेक्षा अधिक राहते. सामाजिक निव्वळ उत्पादनात तफावत आढळून येते.

पिगू म्हणतो, खाजगी निव्वळ उत्पादन व सामाजिक निव्वळ उत्पादनातील तफावत दूर करून दोहोंत

समानता प्रस्थापित केल्यास सामाजिक कल्याणात वाढ घडून येते. म्हणून सरकारने हस्तक्षेप करून ही तफावत दूर करावी. त्यासाठी सरकारने ज्या उद्योगात खाजगी निव्वळ उत्पादनापेक्षा जास्त आहे. त्या उद्योगावर कर बसवावेत व दोन्ही निव्वळ उत्पादनात समानता प्रस्थापित करावी. याउलट काही उद्योगात सरकारने अनुदान द्यावे व दोन्होंत समानता प्रस्थापित करावी.

सरकारने असे धोरण स्विकारल्यास समाजाच्या आर्थिक कल्याणात वाढ घडून येते. प्रा. पिगूने सामाजिक सीमांत उत्पादनाची कल्पना मांडली. तो म्हणतो समाजातील उत्पादन हे आदर्श असते. सर्व उद्योगातील सीमांत सामाजिक उत्पादन समान असते. दुसऱ्या भाषेत जेव्हा सर्व उद्योगातील सीमांत सामाजिक उत्पादन समान असते. तेव्हा अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न सर्वोच्च असते.

### ❀ प्रा. पिगूच्या कल्याणकारी अर्थशास्त्रावरील टीका :–

प्रा. पिगूच्या अर्थशास्त्रावर प्रामुख्याने लिओनेल रॉबीन्सने टीका केल्या.

**१. आदर्शवादी अर्थशास्त्र :** पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र फक्त आदर्शवादी आहे. ते शास्त्रशुध्द पायावर आधारलेले नाही. त्यामुळे ते खरे नाही, अशी टीका केली जाते. या अर्थशास्त्राची गृहीते प्रत्यक्ष व्यवहारात खरी ठरणारी नाहीत. उदा. सर्व मनुष्यात समाधान मिळविण्याची क्षमता सारखी असते, हे गृहीत खरे नाही, ते चुकीचे आहे. हे गृहीत शास्त्रीय नाही तर फक्त आदर्शवादी आहे, असे रॉबीन्स म्हणतो.

**२. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप :** प्रा. पिगूने महत्तम आर्थिक कल्याण साध्य करण्यासाठी वास्तव उत्पन्नाचे गरीब व श्रीमंतामध्ये समान वाटप घडवून आणावे असे म्हटले, याबाबत टीकाकार म्हणतात, वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप घडवून आणल्यास त्याचा देशातील भांडवल संचयनावर प्रतिकूल परिणाम घडून येतो याचा विचार पिगूने केला नाही. गरीबांचे उत्पन्न वाढल्यास ते उपभोगावर जास्त खर्च करतात, त्यमुळे बचत कमी राहून भांडवल संचयनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो.

**३. राष्ट्रीय उत्पन्न व आर्थिक कल्याणातील संबंध :** प्रा. पिगूने आर्थिक कल्याण राष्ट्रीय उत्पन्नाशी जोडले व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास कल्याणात देखील वाढ होते. परंतु टीकाकार म्हणतात, भाववाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून आली असेल तर त्यामुळे आर्थिक कल्याणात वाढ होईल काय? त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढल्यास नेहमीच कल्याणात वाढ होते, चुकीचे प्रतिपादन आहे.

**४. आर्थिक कल्याणाचे अंकदर्शी उपयोगिता मापन चुकीचे आहे :** प्रा. पिगूने आर्थिक कल्याणाचे मोजमाप उपयोगितेच्या सहाय्याने अंकामध्ये करता येते असे म्हटले हे चूक आहे. कारण उपयोगिता ही मानसिक कल्पना आहे. व्यक्तीपरत्वे ती भिन्न असते. त्यामुळे तिचे अंकामध्ये मापन करता येत नाही म्हणून व्यक्तीगत उपयोगितेची बेरीज करून सामाजिक कल्याण मोजता येते हे पिगूचे म्हणणे खरे नाही.

**५. सामाजिक कल्याण वाढले की घटले हे सांगू शकत नाही :** सरकारी धोरणाचे समाजातील काही लोकांना लाभ तर काही लोकांना तोटे होतात. त्यावरून सामाजिक कल्याण वाढले अथवा घटले हे

सांगता येत नाही. कारण जोपर्यंत सामाजिक कल्याण मोजण्याचे एखादे साधन किंवा व्यक्ती-व्यक्तींमधील उपयोगितेची तुलना करण्याचे साधन सापडत नाही, तोपर्यंत सामाजिक कल्याणाचे मोजमाप करता येत नाही.

**६. खाजगी निव्वळ उत्पादन व सामाजिक निव्वळ उत्पादनातील तफावत दूर केल्यास आर्थिक कल्याण वाढते, चुकीचे प्रतिपादन :** प्रा. पिगूने आर्थिक कल्याणात वाढ घडवून आणण्यासाठी खाजगी निव्वळ उत्पादन व सामाजिक निव्वळ उत्पादनातील फरक सरकारने दूर करावा असे म्हटले, परंतु प्रत्यक्ष वास्तवतेत असे फरक अनेक असतात व त्याची संख्या देखील जास्त असते. त्यामुळे ते दूर करणे कार्यक्षम सरकारला देखील शक्य नाही, म्हणजे पिगूचे हे प्रतिपादन अवास्तव आहे.

**७. कल्याणाचे आर्थिक व अनार्थिक गटात विभाजन करणे योग्य नाही :** टिकाकारांच्या मते, नवसनातनवाद्यांनी आर्थिक कल्याण व अनार्थिक कल्याण असे जे कल्याणाचे वर्गीकरण केले आहे, ते अयोग्य आहे. पिगूने कल्याणाची कल्पना राष्ट्रीय उत्पन्नाशी जोडून वरील वर्गीकरण केले, परंतु प्रत्यक्षात मानवी प्रयत्नांचे उद्देश फक्त वस्तू व सेवांचे उत्पादन करणे हेच नसते तर त्यापेक्षा इतर काही असते. त्यामुळे अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक कल्याणाच्या इतर बाजूंचा देखील विचार केला पाहिजे, असे 'तपस मुजूमदार' (Tapas Mujumdar) असे म्हणतात.

## * स्वयं-अध्ययन प्रश्न - २

१. प्रा. पिगूच्या कल्याणकारी अर्थशास्त्राची ............ गृहीते.

*(अ) उपभोक्ता सूज्ञ असतो* *(ब) उपयोगितेचे क्रमदर्शी मापन*

*(क) दोन्ही* *(ड) यापैकी नाही.*

२. प्रा. पिगूने सामाजिक कल्याणाची कल्पना ............ जोडली.

*(अ) राष्ट्रीय उत्पन्नाशी* *(ब) सामाजिक उत्पन्नाशी*

*(क) दोन्ही* *(ड) वरीलपैकी सर्व.*

३. सर्व मनुष्यात समाधान मिळविण्याची क्षमता सारखी असते हे गृहीत शास्त्रीय नाही तर फक्त आदर्शवादी आहे असे ............. म्हणतो.

*(अ) रॉबीन्स* *(ब) पिगू* *(क) दोन्ही* *(ड) वरीलपैकी नाही.*

## ४.२.३ खर्च लाभ विश्लेषण (Cost-Benefit Analysis) :-

गुंतवणूक प्रकल्पांच्या मूल्यमापनासाठी प्रामुख्याने वापरली जाणारी पध्दती म्हणजे सामाजिक खर्च-लाभ पध्दती होय. या पध्दतीमुळे नियोजनकर्त्यांना अगदी बरोबर व तंतोतंत खरे गुंतवणूक निर्णय घेता येतात. प्रकल्पापासून मिळणाऱ्या लाभ व खर्चातील फरकाचे महत्तमीकरण करून साधन सामग्रीचे सुयोग्य वाटप घडवून आणले जाते. या पध्दतीत प्रकल्पाच्या खर्च-लाभाचे मापन, तुलना व मूल्यमापन केले जाते. म्हणजे प्रकल्पापासून मिळणारे लाभ व खर्च यांच्या भारांची (Weightage) तुलना केली जाते.

अशा रितीने सामाजिक खर्च-लाभ विश्लेषण सामाजिक लाभ व तोटे यांचे वर्णन करून त्यांचे मोजमाप करते. सामाजिक खर्च-लाभ विश्लेषणाचे मुख्य उद्दिष्ट 'निव्वळ सामाजिक लाभ' (Net Social Benefit) प्रस्थापित करणे हा असतो.

निव्वळ सामाजिक लाभ = सामाजिक लाभ - सामाजिक खर्च.

येथे सामाजिक लाभ-खर्चाचे मोजमाप बाजारातील प्रत्यक्ष किंमतीनुसार केले जात नाही तर सामाजिक किंमतीच्या सहाय्याने (Shadow Prices OR Social Prices) केले जाते. सार्वजनिक गुंतवणुकीपासून सरकारला प्रत्यक्ष जो लाभ होतो व खर्च होतो त्याला प्रत्यक्ष लाभ व प्रत्यक्ष खर्च असे म्हणतात, परंतु सरकारी गुंतवणूकीपासून समाजातील इतर घटकांना जे लाभ होतात व तोटे सहन करावे लागतात त्यास अप्रत्यक्ष लाभ व अप्रत्यक्ष तोटे असे म्हणतात अथवा बहिर्गत फायदे-तोटे असे म्हणतात. उदा. सरकारी गुंतवणुकीमुळे सरकारच्या उत्पन्नात जी वाढ होते त्यास प्रत्यक्ष लाभ असे म्हणतात तर गुंतवणुकीवर झालेला प्रत्यक्ष खर्च हा सरकारचा प्रत्यक्ष खर्च असतो. याउलट प्रकल्प लाभ क्षेत्रातील लोकांचे उत्पन्न, रोजगार, आर्थिक परिस्थिती वगैरे घटकांत ज्या सुधारणा झालेल्या असतात त्याला अप्रत्यक्ष लाभ असे म्हणतात तर एखाद्या प्रकल्पापासून होणारे प्रदूषण, शहरीकरण त्यामुळे लोकांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम हे सार्वजनिक गुंतवणूकीचे अप्रत्यक्ष तोटे अथवा खर्च होत.

भारताच्या नियोजन मंडळाने १९७५ मध्ये म्हटले आहे की, सार्वजनिक गुंतवणूकीचे चार प्रकारचे परिणाम विश्लेषकाने शोधून काढले पाहिजेत. ते पुढीलप्रमाणे होत. वित्तीय, आर्थिक, सामाजिक व पर्यावरण विषयक परिणाम.

सामाजिक खर्च व लाभाचे विश्लेषण करताना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. सामाजिक लाभ व खर्चाचे मोजमाप कसे करायचे? याबाबत सामाजिक लाभ-खर्चाचे तीन प्रकार सांगितले जातात.

१) पहिल्या प्रकारात, पैशात रूपांतरीत करता येणारे व पैशाच्या साहाय्याने मोजता येऊ शकणारे सामाजिक लाभ व खर्च समाविष्ट असतात.

२) दुसऱ्या प्रकारातील लाभ-खर्च पैशात मोजता येतात परंतु त्याचे पैशात रूपांतर करता येत नाहीत.

३) तिसऱ्या प्रकारातील सामाजिक लाभ व खर्च पैशाच्या सहाय्याने मोजता येत नाहीत अथवा पैशात रूपांतरित करता येत नाहीत, ते अस्पष्ट अथवा न दिसणारे (Intangible) असतात.

जे सामाजिक लाभ व खर्च पैशाच्या सहाय्याने मोजता येतात त्यांचे मूल्यमापन करण्यासाठी निव्वळ वर्तमान मूल्य (NPV), लाभ-खर्च गुणोत्तर (B/C Ratio) किंवा अंतर्गत परतावा दर (IRR) या पध्दती वापरता येतात. परंतु ज्या सामाजिक लाभ खर्चाचे मापन पैशाच्या सहाय्याने करता येत नाही. त्यासाठी सामाजिक खर्च लाभ विश्लेषणाचा वापर केला जातो.

सामाजिक खर्च लाभ विश्लेषणातील प्रत्यक्ष लाभ व प्रत्यक्ष खर्चाबरोबर अप्रत्यक्ष लाभ व अप्रत्यक्ष

खर्च हे मुख्य घटक होत. सामाजिक लाभामध्ये सरकारच्या महसूलातील वाढीबरोबरच रोजगारात झालेली वाढ, आयात पर्यायीकरणामुळे परकीय चलनातील बचत व निर्यात वाढल्यामुळे परकीय चलन साठ्यात झालेली वाढ इत्यादी. तसेच सामाजिक खर्चात सरकारी गुंतवणुकीमुळे समाजाला सहन करावा लागणारा प्रत्यक्ष खर्च. म्हणजेच औद्योगिकरणामुळे होणारे प्रदूषण, शहरीकरणाच्या समस्या, कायदा व सुव्यवस्थेवर होणारा खर्च, आरोग्यावर होणारे प्रतिकूल परिणाम वगैरेचा समावेश होतो.

सामाजिक खर्च लाभ विश्लेषणातील दुसरा घटक म्हणजे सामाजिक खर्च लाभ मोजण्यासाठी किंमती अथवा काल्पनिक किंमतीचा वापर होय. (Use of Social or Shadow Prices) सामाजिक खर्च-लाभाचे मोजमाप करण्यासाठी बाजारातील किंमती (Market Prices) उपयुक्त नसतात म्हणून सामाजिक किंमती अथवा काल्पनिक किंमतीचा वापर केला जातो. बाजारातील अपूर्णत: व बाह्य परिणामांमुळे (बहिर्गत फायदे-तोटे) या किंमतीत बदल करून त्या जुळवून घ्याव्या लागतात. बाजारातील किंमती सीमांत खर्चावरून ठरत असल्यामुळे त्या खरे लाभ किंवा खर्च दर्शवित नाहीत कारण त्या सीमांत खर्चापेक्षा जास्त असतात. बाह्य परिणाम म्हणजे एखाद्या प्रकल्प सुरू झाल्यामुळे त्याचे दुसऱ्या उत्पादकांवर होणारे अनुकूल प्रतिकूल परिणाम होत. कोणताही प्रकल्प आदाने व प्रदाने यामधील संबंध दर्शवितो किंमतीच्या सहाय्याने आदाने खर्चात तर प्रदाने लाभात रूपांतरित केली जातात. सामाजिक खर्च लाभ विश्लेषणात ज्या किंमती वापरल्या जातात त्यांना काल्पनिक किंमती अथवा सामाजिक किंमती असे म्हणतात.

वस्तूची काल्पनिक किंमत ठरविताना बाजार किंमतीतील कराची रक्कम वजा केली पाहिजे. तसेच वस्तूवरील अनुदानाची रक्कम किंमतीत समाविष्ट केली पाहिजे. या काल्पनिक किंमती (सामाजिक किंमती) प्रकल्प विश्लेषकाला ठरवू न देता त्या विशिष्ट सक्षम पातळीवर ठरविल्या गेल्या पाहिजेत.

सामाजिक खर्च लाभ विश्लेषणात समाजाचे भविष्यकालीन लाभांऐवजी वर्तमानकालीन लाभ दर्शविण्यासाठी वटाव घटकाचा वापर केला जातो. कोणत्याही गुंतवणूक प्रकल्पातील गुंतवणूक ही भविष्यातील लाभासाठी वर्तमानकालीन लाभांचा केलेला त्याग असते. वर्तमान काळातील लाभापेक्षा भविष्यकाळातील लाभ मोठे असतात म्हणून वर्तमान काळातील लाभाचा त्याग केला जातो.

सामाजिक लाभ खर्च विश्लेषणात बाजारातील व्याजदरात सामाजिक वटावदर काढण्यासाठी बदल केला पाहिजे. कारण एखाद्या प्रकल्पाबाबत व्यक्ती काळजीपूर्वक पसंती दर्शवित नाहीत किंवा त्यांच्या पसंतीमध्ये फरक आढळून येतो. जेंव्हा ते सामाजिक लाभ-खर्चाचे व्यक्तिगत दृष्टिकोनातून व सामाजिक दृष्टिकोनातून मूल्यमापन करतात तेव्हा त्यामध्ये फरक आढळून येतो. त्यामुळे सामाजिक लाभ-खर्चाचा सामाजिक वटाव दर हा बाजारातील वटाव दरापेक्षा कमी असतो. तसेच गुंतवणूक प्रकल्पातील धोक्यांमुळे म्हणजे अपेक्षित लाभ न मिळणे वगैरेमुळे सामाजिक वटाव दर खाजगी क्षेत्रातील वटाव दरापेक्षा कमी असतो. अशारितीने सामाजिक खर्च व लाभविषयक घटकात वरीलप्रमाणे बदल घडवून आणून सामाजिक लाभ-खर्चाचा निर्देशक तयार केला जातो. त्यावरून सामाजिक लाभ-खर्चाचे गुणोत्तर काढले जाते. या गुणोत्तराची किंमत १ पेक्षा जास्त असेल तर प्रकल्प स्विकारला जातो अन्यथा नाकारला जातो.

### ❀ खर्च-लाभ निकष :-

अमेरिकेतील लाभ-खर्च उपसमितीने लाभ-खर्च मोजण्यासाठी पुढील चार निकष सांगितले आहेत.

१) सामाजिक लाभ-सामाजिक खर्च.

$$B - C$$

२) $\dfrac{\text{सामाजिक लाभ-सामाजिक खर्च}}{\text{प्रत्यक्ष गुंतवणूक}}$ $\qquad \dfrac{B - C}{I}$

३) $\dfrac{\text{सीमांत सामाजिक लाभ}}{\text{सीमांत सामाजिक खर्च}}$ $\qquad \dfrac{\Delta B}{\Delta C}$

सर्वसाधारणपणे सामाजिक लाभ व खर्च मोजण्यासाठी चौथा निकष म्हणजे सामाजिक लाभ खर्च गुणोत्तर वापरला जातो. प्रकल्पाच्या मूल्यमापनासाठी लाभ व खर्च गुणोत्तर वापरले जाते. त्यासाठी पुढील सूत्र वापरले जाते.

$\dfrac{B}{C}$ $\qquad$ B = सीमांत सामाजिक लाभ

C = सीमांत सामाजिक खर्च

त्यासाठी प्रथम मिळणारे सामाजिक लाभ मोजले जातात. त्यानंतर त्या प्रकल्पाचा सामाजिक खर्च मोजला जातो त्या खर्चामध्ये प्रकल्पाचा चालू खर्च व देखरेख खर्च समाविष्ट असतो. सामाजिक लाभ व सामाजिक खर्चाचे वर्तमान मूल्य काढले जाते. सामाजिक लाभाचे वर्तमान मूल्य व सामाजिक खर्चाच्या वर्तमान मूल्याच्या गुणोत्तरावरून प्रकल्प स्विकारला किंवा नाकारला जातो. हे गुणोत्तर १, १ पेक्षा जास्त व १ पेक्षा कमी असल्यास प्रकल्प नाकारला जातो.

सामाजिक खर्च - लाभाचे वर्तमान मूल्य पुढील सूत्राने काढले जाते.

$$B = \frac{b_1}{(1+r)} \qquad \frac{b_2}{(1+r)^2} \qquad \frac{b_n}{(1+r)^n}$$

$$C = \frac{C}{(1+r)} + \frac{C}{(1+r)^2} + \frac{C}{(1+r)^n}$$

B = सामाजिक लाभाचे वर्तमान मूल्य.

$b_1, b_2,$ ......... $b_n$ ........ पहिल्या, दुसऱ्या .......... ते n वर्षातील अपेक्षित लाभ.

C = सामाजिक खर्चाचे वर्तमान मूल्य.

$C_1, C_2,$ ......... $C_n$ ........ पहिल्या, दुसऱ्या .......... ते n वर्षातील अपेक्षित खर्च.

r = सामाजिक लाभ व खर्चाचा वटाव दर.

n = प्रकल्पाचे एकूण आयुष्य.

जर,

$$\frac{b_1}{(1+r)} + \frac{b_2}{(1+r)^2} + \frac{b_n}{(1+r)} > \frac{C_1}{(1+r)} + \frac{C_2}{(1+r)^2} + \frac{C_n}{(1+r)^n}$$

प्रकल्प स्विकारला जातो, किंवा

1) $\frac{b}{c}$

$$\frac{\frac{b_1}{(1+r)} + \frac{b_2}{(1+r)^2} + \frac{b_n}{(1+r)^n}}{\frac{C}{(1+r)} + \frac{C_2}{(1+r)^2} + \frac{C_n}{(1+r)^n}} > 1$$

म्हणजे $\frac{b}{c} = > 1$ म्हणजेच लाभ सामाजिक खर्चापेक्षा जास्त असल्यामुळे प्रकल्प स्विकारला जातो.

2) $\frac{B}{C} =$

$$\frac{\frac{b_1}{(1+r)} + \frac{b_2}{(1+r)^2} + \frac{b_n}{(1+r)^n}}{\frac{C}{(1+r)} + \frac{C_2}{(1+r)^2} + \frac{C_n}{(1+r)^n}} = 1$$

म्हणजेच $\frac{b}{C} = 1$ असेल तर सामाजिक लाभ व खर्च समान असल्यामुळे प्रकल्प नाकारला जातो.

3) $\frac{b}{C} = 1$

$$\frac{\frac{b_1}{(1+r)} + \frac{b_2}{(1+r)^2} + \frac{b_n}{(1+r)^n}}{\frac{C}{(1+r)} + \frac{C}{(1+r)^2} + \frac{C_n}{(1+r)^n}} < 1$$

म्हणजेच $\frac{b}{C} < 1$ असेल तर सामाजिक लाभ खर्चापेक्षा कमी असल्यामुळे प्रकल्प नाकारला जातो.

**सामाजिक लाभ-खर्च विश्लेषणातील घटक (Factors in Cost-benefit Analysis)**

जेव्हा एखाद्या गुंतवणूक प्रकल्पाचे सामाजिक लाभ खर्चानुसार मूल्यमापन केले जाते, तेव्हा लाभाच्या बाजूने पडणारे घटक व खर्चाच्या बाजूने पडणाऱ्या घटकांचे मूल्य मापन केले जाते.

**अ) सामाजिक लाभांशी संबंधित असणारे घटक (Factors related to Social Benefit) :-**

एखाद्या गुंतवणूक प्रकल्पापासून होणारे लाभ हे त्या प्रकल्पापासून राष्ट्रीय उत्पादनात जी वाढ होते, तिच्यावरून मोजले जातात. गुंतवणूक प्रकल्पामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. उत्पन्नातील ही वाढ उत्पादन व उपभोगातील वाढीवरून मोजली जाते. हे लाभ वास्तव अथवा खरे किंवा अगदीच अल्प म्हणजे नावापुरतेच असतात किंवा ते प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ असतात.

**१. खरे (वास्तव) लाभ :** एखाद्या धरणामुळे अथवा सिंचन प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या सिंचन सोयीत वाढ होते, परंतु त्याचवेळी सरकार शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कर बसविते अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सिंचन प्रकल्पातून मिळणारे लाभ अल्प असतात, कारण शेतकऱ्यांना मिळणारे लाभ सरकार कर रूपाने काढून घेते. परंतु सिंचन प्रकल्पामुळे सिंचन सोयीत वाढ होऊन शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांच्या वास्तव उत्पन्नात वाढ घडून आल्यास त्यांना वास्तव लाभ असे म्हणतात.

**२. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ :** गुंतवणूक प्रकल्पापासून त्वरित व प्रत्यक्ष मिळणारे लाभ म्हणजे प्रत्यक्ष लाभ होत. ते प्रकल्पापासून मिळणाऱ्या वस्तू व सेवांची मूल्ये असतात. ज्यांच्यासाठी प्रत्यक्ष खर्च झालेला असतो. उदा. नदीवरील धरणामुळे पूर नियंत्रण, सिंचनातील वाढ, जलवाहतूक सोय, विद्युत निर्मिती, मच्छिमारी प्रकल्प निर्मिती यासारखे प्रत्यक्ष व ताबडतोब होणारे लाभ विचारात घेतले जातात. तसेच सिंचन प्रकल्पामुळे त्या भागातील लोकांच्या रोजगारात झालेली वाढ घडून आल्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. याबाबत प्रा. बूटन म्हणतो, 'गुंतवणूक प्रकल्पामुळे गुंतवणूकीत झालेली वाढ, लोकसंख्या वाढीच्या दरातील बदल, कुशलता व व्यवस्थापकीय ज्ञानात झालेली वाढ हे सर्व अप्रत्यक्ष लाभ होत. हे सर्व अप्रत्यक्ष लाभ विचारात घेतले पाहिजेत.'

**३. पैशात मोजता येणारे व न मोजता येणारे लाभ** (Tangible & Intangible benefits) **:** गुंतवणूक प्रकल्पात मिळणारे जे लाभ पैशाच्या सहाय्याने मोजता येतात. उदा. उत्पन्नातील वाढ, गुंतवणूकीत झालेली वाढ, उत्पादनात झालेली वाढ वगैरे. यासारखे लाभ विचारात घेतले जातात. याउलट काही लाभ असे असतात की, ते पैशाच्या सहाय्याने मोजता येत नाहीत. उदा. लोकांच्यात झालेले गुणात्मक बदल, शिक्षणाच्या सोयी वाढल्यामुळे लोकांची गुणवत्ता वाढते व उच्च प्रतीची लोकसंख्या निर्माण होते. ती विकासाला अधिक पोषक असते. या प्रकारचे लाभ देखील विचारात घेतले जातात.

### ब) सामाजिक खर्चाशी संबंधित घटक (Factors related to Social Costs) :-

सामाजिक खर्चाचे अनेक प्रकार आहेत, ते पुढीलप्रमाणे होत.

**१. प्रकल्प खर्च :** यामध्ये प्रकल्प उभारणीसाठी आलेला सर्व प्रकारचा खर्च समाविष्ट असतो. हा खर्च कामगार, भांडवल, नैसर्गिक साधन संपत्ती, परकीय चलन वगैरेवरील खर्च असतो.

**२. सहखर्च :** ताबडतोब वस्तू व सेवांचे उत्पादन करण्यासाठी प्रकल्प खर्चाशिवाय जो खर्च केला जातो त्यास सह खर्च असे म्हणतात. उदा. सिंचनावर पीकघेण्यासाठी दिलेल्या पाणी पट्टी व्यतिरिक्त इतर फी, कर दिले जात असतील तर सहखर्चात समाविष्ट केले जातात, ते देखील विचारात घेतले जातात.

**३. वास्तव व नामधारी खर्च :** सामाजिक खर्च हा वास्तव खर्च व नामधारी खर्च म्हणून ओळखला जातो. समजा, एखाद्या भागातील लोकांच्या विभागीय कमिटीने कालवा खोदण्यासाठी लोकांच्याकडून पैसे कर्जाऊ घेतले असतील तर असा खर्च नामधारी खर्च असतो. कारण यामध्ये लोकांनी त्याग केलेला नसतो, फक्त लोकांच्याकडील पैसा कर्जरूपाने विभागीय कमिटीकडे जातो. परंतु लोकांनी स्वत:च्या पैशाने कर्ज न उभारता कालवा खोदला तर तो वास्तव खर्च असतो हे दोन्ही खर्च विचारात घेतले जातात.

**४. प्रत्यक्ष खर्च :** हा खर्च प्रकल्पाची उभारणी, देखरेख व अंमलबजावणीसाठी आलेला खर्च असतो, त्याला प्राथमिक खर्च असेही म्हणतात.

**५. अप्रत्यक्ष खर्च :** याला दुय्यम खर्च असे म्हणतात, हा खर्च प्रकल्पावर काम करणाऱ्या कामगारांसाठी घरे बांधणे, शाळा, दवाखाने वगैरेवर झालेला असतो हे सर्व खर्च सामाजिक लाभ-खर्च विश्लेषणात विचारात घेतले जातात. या माहितीवरून लाभ व खर्चाचा विचार करून सार्वजनिक प्रकल्पाचे लाभ खर्चापेक्षा जास्त असतील तर प्रकल्प स्विकारला जातो.

### ❀ सामाजिक खर्च-लाभ विश्लेषणावरील मर्यादा (Limitations of Cost Benefit Analysis)

**१. सामाजिक खर्च मोजण्यातील अडचणी :** सामाजिक खर्चाचे मापन उत्पादन पध्दती, उद्योगाचे स्थान व उत्पादन घटकांच्या किंमतीवरून केले जाते. परंतु अविकसित देशामध्ये दारिद्र्याच्या दृष्टचक्रामुळे सर्वच क्षेत्रात असमतोल आढळून येतात. ते बाजारी दराबरोबर नसतात वेतनदर कमी तर व्याजदर जास्त असतात, त्यामुळे खर्चाचे मोजमाप करणे कठिण असते. यावर उपाय म्हणून अर्थशास्त्रज्ञ उत्पादन घटकांच्या किंमती मोजण्यासाटी काल्पनिक किंमतीचा वापर करतात.

**२. सामाजिक लाभ मोजण्यातील अडचणी :** सामाजिक खर्चापेक्षा सामाजिक लाभांचे मोजमाप करणे अवघड काम आहे. कारण नवीन प्रकल्पामध्ये अनिश्चितता हा घटक जास्त आढळून येतो. या प्रकल्पातील वस्तूंची किंमत, मागणी, पुरवठा याबाबत अनिश्चितता असते, त्यामुळे लाभांचे मोजमाप करणे शक्य नाही. अनेकदा बहिर्गत तोट्यामुळे वस्तू कमी किंमतीला विकावी लागते. त्यामुळे उद्योगाला तोटा होतो. परिणामी लाभाचे मोजमाप करणे कठिण होते.

**३. अस्पष्ट वटाव दर :** कोणत्याही प्रकल्पाचा सामाजिक वटाव दर हा अस्पष्ट असतो. जर मोठा सामाजिक वटाव दर लाभाचे निव्वळ वर्तमान मूल्य काढण्यासाठी वापरले तर त्या प्रकल्पाचे दीर्घकालीन निष्कर्ष काढणे कठिण काम आहे. तसेच त्या प्रकारच्या परताव्याचा अंतर्गत दर सुध्दा काढता येत नाही.

**४. संयुक्त लाभ-खर्च विचारात घेत नाही :** हे विश्लेषण गुंतवणूक प्रकल्पापासून मिळणारे एकत्रित लाभ व खर्च विचारात घेत नाही. गुंतवणूक प्रकल्पापासून अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ मिळतात. ते संयुक्त अथवा एकत्रित असतात, त्यांना वेगळे करणे कठिण काम आहे. तसेच त्यांचे वेगळे मापन करणे देखील शक्य होत नाही.

**५. हे विश्लेषण संधी खर्चाचा विचार करीत नाही :** गुंतवणूक प्रकल्पातील सामाजिक खर्चाचा विचार करताना हे विश्लेषण संधी खर्च विचारात घेत नाही.

**६. बाह्य परिणामांचे मोजमाप करणे शक्य होत नाही :** गुंतवणूक प्रकल्पांद्वारे जे विविध आर्थिक व तांत्रिक क्षेत्रात बाह्य परिणाम घडून येतात त्याचे मापन करणे कठिण काम आहे. उदा. धरणामुळे जे पूर नियंत्रण होते. उत्पादक जमिनीवरील पाणी साठा याचे होणारे परिणाम मोजणे शक्य नाही.

*** स्वयं-अध्ययन प्रश्न - ३**

१. गुंतवणूक प्रकल्पाच्या मूल्यमापनासाठी ............ पध्दती वापरली जाते.

*(अ) उत्पादन* *(ब) गुंतवणूक* *(क) निर्यात* *(ड) सामाजिक खर्च लाभ.*

२. सामाजिक खर्च लाभ पध्दतीत प्रकल्पाच्या खर्च लाभाचे ............ केले जाते.

*(अ) मापन* *(ब) तुलना* *(क) मूल्यमापन* *(ड) वरील सर्व.*

३. सामाजिक लाभ-खर्चाचे मोजमाप .............. किंमतीने केले जाते.

*(अ) बाजार* *(ब) सामाजिक* *(क) चालू* *(ड) स्थिर.*

४. सरकारी गुंतवणूकीमुळे समाजाला तोटे होतात, त्यास ............. म्हणतात.

*(अ) प्रत्यक्ष तोटे* *(ब) अप्रत्यक्ष तोटे* *(क) प्रत्यक्ष लाभ* *(ड) अप्रत्यक्ष लाभ.*

५. सरकारी गुंतवणूकीचे अप्रत्यक्ष लाभ म्हणजे .............. होय.

*(अ) उत्पन्न वाढ* *(क) राहणीमान सुधारणा*

*(ब) रोजगार वाढ* *(ड) वरील सर्व.*

## ४.२.४ मालमत्ता हक्क आणि विकास धोरणे (Property Rights and Developmental Policies)

मालमत्ता हक्क आणि आर्थिक विकास यामध्ये जवळचा संबंध आहे. अर्थशास्त्रज्ञ व धोरणकर्ते

यांच्या दृष्टीने पारिभाषित व अत्यंत सुरक्षित मालमत्ता हक्काचे महत्त्व मान्य होत आहे. खाजगी मालमत्ता वापरण्याचा अधिकार व्यक्तिगत पातळीवर प्राप्त होतो. त्यामुळे भरभराटीसाठी मालमत्तेचा उपयोग करता येतो. पर्याप्त वापरापासून वैयक्तिकरित्या लाभ मिळवता येतो. खर्च व प्राप्तीचा किंवा लाभाचा विचार करून कार्यक्षम परतावा मिळविता येतो. यामुळे सर्वांचे उच्च प्रतीचे राहणीमान निर्माण होते. मागील कही दशकांपासून अर्थशास्त्रज्ञांना मालमत्ता हक्काचे महत्त्व पटले आहे. आधुनिक अर्थशास्त्राच्या इतिहासात याला फार कमी महत्त्व प्राप्त झाले आहे. बाजार अर्थव्यवस्थेचे निष्ठूर समर्थकही यास चमकदार विषय मानतात. वाईट विकास नितीचा परिणाम म्हणून हा विषय दुर्लक्षित राहिला आहे, याचे आश्चर्य नाही. विकसित देशातील आणि आंतरराष्ट्रीय संस्थातील धोरणकर्त्यांनी जर खाजगी मालमत्तेची आर्थिक विकासातील टीकात्मक भूमिका मांडली तर ते विकसनशील देशांना याबाबतीत मदतच करतील. धोरणकर्त्यांनी खाजगी मालमत्ता ढासळून टाकतील अशी धोरणांची शिफारस करणे टाळले पाहिजे.

विकासाच्या अपयशाची कारणे मोठी आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभाव, शिक्षण, संस्कृती, धर्म व इतिहास इत्यादीसाठी अपुरा निधी आणि अलिकडे भौगोलिक स्थान हेही विकासाच्या अपयशाचे महत्त्वपूर्ण कारण ठरत आहे. नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ फ्रेडरिक हायेक यांनी आम्हाला दुसऱ्या संदर्भात शिकवलं, आम्ही अयशस्वी होण्याद्वारे यश समजावून सांगू शकत नाही. ‘लोक चुकीचे का करतात हे समजून सांगण्याआधी आपण त्यांना नेहमी योग्य का असावे हे समजावून सांगणे आवश्यक आहे.’

आपल्याला विचार करण्याची गरज आहे की, राष्ट्रांनी समृध्द का व्हावे? आम्ही तर्क करतो की, समृध्दी आणि दारिद्र्य यांच्यातील फरक मालमत्ता आहे, जेव्हा खाजगी मालमत्ता अधिकार चांगल्या प्रकारे परिभाषित व अंमलात आणले जातात, तेव्हा राष्ट्रे विकसित होतात.

एका पाहणीनुसार विविध देशांमध्ये वास्तव उत्पन्न १०० पेक्षा अधिक घटकामुळे बदलत असल्याचे दिसून आले. सन २००० साली लक्समबर्ग देशातील वास्तव दरडोई जी.डी.पी. ५०,०६१ डॉलर होते तर सिएरालिओन मधील वास्तव दरडोई जी.डी.पी. फक्त ४९० डॉलर होते. हे आकडे खरेदीशक्ती समतेनुसार मोजले जातात. अमेरिकेतील वास्तव दरडोई जी.डी.पी. मेक्सिकोच्या ४ ते ८ पट आहे. या फरकाचा सामाजिक, आर्थिक परिणाम प्रचंड व सर्वज्ञात आहे. दक्षिण कोरियन लोकांचे दरडोई उत्पन्न उत्तर कोरियन लोकांच्या १७ पट आहे. या तफावतीमुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

देशातील नैसर्गिक स्रोतांची उपलब्धता किंवा अभाव यामुळे वास्तव, ऐतिहासिक, आर्थिक विकासाची व्याख्या करता येत नाही. उदा. नायजेरिया हा तेल उत्पादक देश अधिक कर्जबाजारी देशाच्या वर्गीकरणात आहे, गरीब देश आहे तर अर्जेंटिना देश तेलासह नैसर्गिक संसाधनामध्ये समृध्द आहे. अलिकडेच खराब व चुकीच्या धोरणांमुळे व दोषपूर्ण संस्थामुळे दीर्घकाळ मंदी अनुभवत आहे. आर्थिक विकासाचा व प्राथमिक विकासाचा मूळ निर्धारक म्हणून मालमत्ता हक्क विचारात घेणे आवश्यक आहे. अर्थशास्त्रातील लिखाणामध्ये मालमत्ता हक्काकडे दुर्लक्ष झाले आहे.

## ❀ वाजवीपणा सिध्दांत आणि विभाजनासंबंधीचा न्याय (Fairness Theory and Distributive Justice)

सन १९८५ मध्ये जॉन रॉल्स यांनी प्रथम 'Justice as Fairness' संकल्पना मांडली. त्यांनी न्यायाच्या संकल्पनेचे वर्णन केले आहे. यात स्वातंत्र्य आणि समानतेच्या दोन मुख्य तत्त्वांचा समावेश आहे. दुसरे हे संधीची वाजवी समता आणि भेदाचे तत्व यामध्ये विभागले आहे. रॉल्स हे शब्दश: क्रमवारी देतात, यामध्ये स्वातंत्र्याचा सिध्दांत, वाजवी संधीची समानता व फरक/भिन्नता तत्वज्ञानाच्या क्रमाने प्राधान्यक्रम देतात. हा क्रम व्यवहारात यामध्ये संघर्ष होवू लागल्यास हा प्राधान्यक्रम निर्धारीत करतो. तत्त्वे म्हणजे न्यायाची एक सर्वसमावेशक संकल्पना 'न्याय म्हणून वाजवीपणा' (Justice as Fairness). वैयक्तिकरित्या हे तत्त्व कार्य करीत नाही. हा सिध्दांत नेहमीच कमीतकमी फायदे, लाभ आणि तोटे किंवा नुकसान झाले नाही यांची खात्री करण्यासाठी लागू केला जातो.

## ❀ पहिले तत्त्व : स्वातंत्र्याचे तत्व (The Liberty Principle) :-

पहिले आणि सर्वात महत्त्वाचे तत्त्व असे आहे की, प्रत्येकास मूलभूत स्वातंत्र्यासाठी समान अधिकार आहेत. रॉल्सच्या मते, विशिष्ठ अधिकार व स्वातंत्र्य अधिकार महत्त्वाचे आहेत, किंवा इतर अधिकारांपेक्षा मूलभूत आहेत. उदा. वैयक्तिक मालमत्ता-वस्तू, घर हे मूलभूत स्वातंत्र्य असते, परंतु अमर्याद खाजगी मालमत्तेचा पूर्ण अधिकार नाही. मूलभूत स्वातंत्र्याप्रमाणे हे अधिकार अमर्याद (Inalienable) आहेत. शासन लोकांच्या या अधिकारात सुधारणा करू शकत नाही किंवा त्या अधिकाराचे उल्लंघन करू शकत नाही. रॉल्स च्या मते, समाजाच्या तत्वांनुसार प्रतिनिधींची नागरिकांनी वाजवी (Fair) परिस्थितीत निवड केली आहे.

रॉल्स 'Theory of Justice' मध्ये स्वातंत्र्याच्या तत्वाला व्यापक मूलभूत स्वातंत्र्य म्हणून व्यक्त करतात. त्यांनी पुढे राजकीय उदारमतवादामध्ये 'प्रत्येक व्यक्तीस समान मूलभूत अधिकार आणि सर्व योजनांसाठी समान हक्कांचे स्वातंत्र्य असल्याचा दावा केला आहे.'

## ❀ दुसरे तत्त्व : समानता तत्व (The Equality Principle) :-

समानता तत्त्व हे न्यायनिर्मितीचा महत्त्वाचा घटक असून निष्पक्षता म्हणून न्याय वितरणाची स्थापना करते. हे तत्त्व सर्वांना त्याच्या विशिष्ठ समाज, लिंग, धर्म, याशिवाय कार्यालयामध्ये व पदावर समान संधी देते. सर्वांना संधीचा फायदा मिळणार नाही, परंतु सर्वांना संधीची समानता असते.

## ❀ फरक तत्त्व (Difference Principle) :-

फरक/भिन्नता तत्त्व असमानतेचे नियमन करते. ते केवळ असमानतांना परवानगी देते. जे सर्वात वाईटातून चांगले काम करण्याचा प्रयत्न करते.

## ❀ सार्वजनिक निवडीचा सिध्दांत आणि धोरण उपयोजन (Theory of Public Choice and Policy Implication) :-

सार्वजनिक निवड सिध्दांत किंवा सार्वजनिक निवड म्हणजे राज्यशास्त्राच्या पारंपारिक समस्या हाताळण्यासाठी आर्थिक साधनांचा वापर करणे होय. यामध्ये समग्र राजकीय वर्तनाचा अभ्यास समाविष्ठ आहे. राज्यशास्त्रात हा सकारात्मक राजकीय सिध्दांताचा एक भाग म्हणून त्यामध्ये स्वत:शी स्वारस्य असलेल्या एजंट (मतदाता, राजकारणी, नोकरशाही) आणि त्यांच्यातील परस्पर संवादाचा अभ्यास केला जातो, ज्याचे अनेक मार्गाने प्रतिनिधीत्व केले जावू शकते. (उदा. खेळ सिध्दांत (Game Theory), निर्णय सिध्दांत.)

सार्वजनिक निवड हा स्थूल अर्थशास्त्राचा एक भाग आहे. सार्वजनिक निवड विश्लेषण हे सकारात्मक स्वरूपाचे लिखाण आहे. परंतु समस्या ओळखण्यासाठी किंवा संवैधानिक नियमांमध्ये (संवैधानिक अर्थशास्त्र) सुधारणा सुचविण्यासाठी सामान्य हेतूने वापरले जाते. सार्वजनिक निवड सिध्दांत हा सामाजिक निवड सिध्दांत, वैयक्तिक स्वारस्ये, कल्याण किंवा मते (Votes) एकत्रित करण्यासाठी गणितीय दृष्टिकोनातून सहसंबंधित आहे. दोन्ही क्षेत्रात अर्थशास्त्र व खेळ सिध्दांताच्या साधनांचा वापर करतात. मतदारांच्या वर्तनामुळे सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या वर्तनावर प्रभाव पडतो, म्हणून सार्वजनिक निवड सिध्दांत नेहमी सामाजिक निवड सिध्दांतावरील परिणाम वापरतो. सार्वजनिक निवडीच्या सामान्य वागणूकीस सार्वजनिक अर्थशास्त्रानुसार देखील वर्गीकृत केले जावू शकते.

## ❀ पार्श्वभूमी व विकास :–

आधुनिक सार्वजनिक पसंती सिध्दांताचा अग्रक्रम म्हणजे नट विकसेल (१८९६) यांचे कार्य होय. ज्याने शासनाला राजकीय एक्सचेंज म्हणून संबोधित केले, कर व खर्च संबंधित फायद्याचे सिध्दांत तयार करण्याच्या बाबतीत सरकारची भूमिका घेतली. त्यानंतरच्या काही आर्थिक विश्लेषणाचे वर्णन सरकारसाठी काही प्रकारचे कल्याणकारी कार्य वाढवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. व्यवसायाच्या रूपात आर्थिक एजंटस्चे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणून सरकारकडे उपाय म्हणून पाहिले जाते.

सार्वजनिक निवड सिध्दांत हा जेम्स बुकानन आणि गार्डन तुलाक यांनी विकसित केलेला सिध्दांत असून याद्वारे सार्वजनिक निर्णय कसे घेतले जातात ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये मतदार, राजकारणी, नोकरदार आणि राजकीय कार्य समित्या यांच्यातील संवाद साधला जातो. या सिध्दांतात अनेक विभाग आहेत.

कल्याणकारी अर्थशास्त्राच्या प्रारंभी युध्दानंतरच्या कालावधीत केन्सीयन क्रांती आणि विकासाचे अर्थशास्त्र या नविन क्षेत्राने आर्थिक धोरणाच्या समार्थ्यासाठी प्रचंड अपेक्षा केल्या. अर्थशास्त्राच्या योगदानाबद्दल धोरण व त्याची सामाजिक प्रणाली नियंत्रित करण्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्यासाठी व त्याविषयी विचार मांडण्यासाठी अनेक अर्थतज्ञांनी लोकप्रिय रचना आणि आर्थिक धोरणाचा सिध्दांत यावर

विश्वास ठेवला. सन १९७० च्या दशकात अत्यंतिक आशावादाचे रूपांतर अपयशात झाले आणि खाजगी प्रोत्साहनाच्या भूमिकेची स्पष्ट ओळख करून देणारी आर्थिक प्रणाली व वैयक्तिक बाजाराचे अस्तित्व दिसू लागले. तिसऱ्या जगाच्या विकासासाठी व्यूहरचना आखणाऱ्या घटकांनी आशा सोडली. अर्थशास्त्रात संक्रमण खर्च गंभीरपणे कार्यक्षम सामाजिक अभियांत्रिकी व गुंतागुंतीच्या आर्थिक संघटनावर मर्यादा घालतो हे माहितीच्या दुर्मिळतेवर नव्याने भर देवून सांगितले आहे. पारंपारिक दृष्टीकोनातून वाढत्या निराशाजनकपणामुळे विकासाच्या सार्वजनिक धोरणाचे पध्दतशीर पुनर्मूल्यांकन झाले नाही आणि योग्य संधीवर नवीन सर्वसमावेशकता निर्माण झाली नाही. अर्थशास्त्रज्ञ अविकसित राष्ट्रातील आर्थिक यश आणि अपयशांच्या विरोधाभासाचे स्पष्टीकरण देतात. सन १९८९ ला पश्चिमात्य युरोपियन क्रांतीने सामाजिक विज्ञानाच्या जाणिवा निर्माण केल्या, ज्यामुळे प्रचंड बदल होणाऱ्या बाजारावर मार्गदर्शन झाले. अर्थशास्त्राचा मुख्य प्रवाह हा आर्थिक पध्दती व रचनात्मक बदलाच्या सामान्य सिध्दांतात मागे पडला आहे.

## ❀ कल्याणकारी अर्थशास्त्रातील अमर्त्य सेनचे योगदान (Amertya Sen's contribution to Welfare Economics) :-

भारतीय अर्थशास्त्रज्ञ व तत्वज्ञ अमर्त्यकुमार सेन यांचा जन्म नोव्हेंबर ३, १९३३ रोजी पश्चिम बंगाल मधील शांतीनिकेतन या शहरात (माणिकगंज जिल्ह्यात) झाला. सध्या हा जिल्हा बांगलादेशामध्ये आहे. रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांना अमर्त्य सेन हे नाव दिले. त्यांचे वडील अशुतोस सेन हे ढाका विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. सन १९४५ मध्ये त्यांचे कुटुंब पश्चिम बंगालमध्ये स्थलांतरित झाले व विविध शासकीय संस्थावर त्यांनी काम केले. त्यांचे वडील पश्चिम बंगाल लोकसेवा आयोग (चेअरमन) व केंद्रिय लोकसेवा आयोगावर कार्यरत होते. अमर्त्यसेन यांची आई अमिता सेन ही दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू क्षिती मोहन सेन यांची कन्या होत.

सेन यांचे शालेय शिक्षण १९४० साली ढाक्यातील 'St. Gregory's highschool' मध्ये सुरू झाले. नंतर लगेच १९४१ साली सेन यांनी शांतीनिकेतन, पाठा भवन येथे प्रवेश घेतला. सन १९५१ मध्ये प्रेसिडेन्सी कॉलेज, कोलकत्ता येथे प्रवेश घेवून ते बी.ए. अर्थशास्त्रामध्ये प्रथम वर्गात पास झाले. सन १९५३ साली ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिज येथे दुसऱ्यांदा अर्थशास्त्रातील बी.ए.साठी प्रवेश घेतला व ते १९५५ साली फर्स्ट क्लासने उत्तीर्ण झाले. त्यांना त्यांची पीएच.डी. पदवी (१९५५-५६) करीत असताना कोलकत्तामध्ये नव्याने निर्माण झालेल्या जादवपूर विद्यापीठात अर्थशास्त्र विभागाचे पहिले प्राध्यापक व पहिले प्रमुख म्हणून संधी मिळाली.

अमर्त्य सेन यांनी १९५६-५८ अर्थशास्त्र विभागप्रमुख म्हणून जादवपूर विद्यापीठ येथे काम केले. 'ट्रिनिटी कॉलेज फेलो' (१९५७-१९६३), अमेरिकेतील मास्साचूसेट्स् इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये व्हिजीटिंग प्रोफेसर (१९६०-६१), व्हिजीटिंग प्रोफेसर म्हणून सेन यांनी बर्कले येथील कॅलिफोरनिया विद्यापीठ (१९६४-६५), कॉरनेल (१९७८-८४), दिल्ली विद्यापीठ (१९६९-७१) येथे अर्थशास्त्राचे

प्राध्यापक म्हणून कार्य केले. १९८७ साली सेन हार्वर्ड विदयापीठात रुजू झाले. १९९८ ला ट्रिनिटी कॉलेजचे मास्टर म्हणून नियुक्ती.

अमर्त्य सेन यांचा विवाह तीन वेळा झाला. त्यांची पहिली पत्नी नाबनिता देवसेन लेखिका होती, त्यांना दोन मुली होत्या. अंतरा ही पत्रकार आहे, तर नंदना ही बॉलिवूड अभिनेत्री आहे. १९७१ मध्ये लंडन येथे गेल्यावर घटस्फोट झाला. सन १९७८ मध्ये अमर्त्यसेन यांनी इटालियन अर्थशास्त्रज्ञ इव्हा कोलोर्णी हिच्याशी विवाह केला. यांना दोन अपत्ये होती, मुलगी इंद्राणी न्यूयॉर्कमध्ये पत्रकार आहे, मुलगा कबीर हा हीप-हॉप आर्टिस्ट असून शाडे हिल स्कूलमध्ये म्युझिक टिचर आहे. कॅन्सरमुळे इव्हाचे १९८५ ला निधन झाले. १९९१ मध्ये सेन यांनी हार्वर्ड विद्यापीठातील इतिहासातील प्राध्यापिका इमा जोर्जीना रोथसचिल्ड यांच्याशी विवाह केला. अमर्त्यसेन यांचे घर केंब्रिजमध्ये असले तरी नेहमी ते हिवाळ्यातील सुट्टी पश्चिम बंगालमधील शांतीनिकेतनमध्ये घालवितात.

अमर्त्य सेन यांना जगातील विविध विद्यापीठातून ९० पेक्षा जास्त पदव्याने सन्मानित केले आहे. यामध्ये १९९८ साली अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक, १९९९ ला भारतरत्न, २००० साली लिऑनटिफ पारितोषिक इत्यादी महत्त्वपूर्ण सन्नमानाने सेन यांची कारकिर्द उज्ज्वल झाली.

### ❀ अमर्त्य सेन यांची महत्त्वपूर्ण पुस्तके :-

Choice of Techniques (1960), On Economic Inequality (1973), Poverty and Famines (1982), Choice, Welfare and Measurement (1983), Collective Choice and Social Welfare (1970), Resources, Values and Development (1997), On Ethics and Economics (1987), Hunger and Public Action (1989), Inequality Reexamined (1992), The Quality of Life (1993), On Economic Inquality (1997), Development as Freedom (1999), Freedom, Rationality and Social Choice (2000), The Argumentative Indian (2005), Peace and Democratic Society (2011), The Country of First Boys (2015)

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांमध्ये अमर्त्य सेन यांचे स्थान आगळेवेगळे आहे. सामाजिक निवड व कल्याणकारी अर्थशास्त्राबाबत उत्कृष्ठ आर्थिक सिध्दांतकार म्हणून जगभर मान्यता पावले आहेत. विकासाच्या अर्थशास्त्रामधील गरीब देशांतील परिणामकारक गुंतवणूकीबाबतचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. युनो, आंतरराष्ट्रीय श्रम संघटना, जागतिक बँक या संस्थांवर सेन यांचे प्रभुत्व आहे. सेन यांचे संशोधन 'कल्याणकारी अर्थशास्त्रा'वर भर देणारे आहे. त्यांनी शासकीय धोरणाचा समाजातील सर्वात शेवटच्या घटकावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला. धोरणे समाजावर किती प्रमाणात प्रकट होतात यावर आधारित त्यांनी अनेक विधायक पध्दती सुचविल्या, त्यामुळे मूलभूत कल्याण होईल. त्यामध्ये अन्न, आरोग्य व शिक्षणाचा समावेश आहे. हे सर्व लोकांपर्यंत पोहचले पाहिजे.

अमर्त्य सेन यांना १९९८ मध्ये कल्याणकारी अर्थशास्त्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल नोबेल पारितोषिकाने

सन्मानीत करण्यात आले. सेन यांचे प्रस्ताव व कल्पनांचे उपयोजन प्रत्यक्ष व्यवहारात करण्यात आले. उदा. त्यांचे दारिद्रय व आर्थिक जीवनमान मोजण्याची मार्गदर्शक तत्त्वे विकसनशील देशांनी मोठ्या प्रमाणात वापरली. त्यांची उपासमार व दुष्काळावरील उपाययोजना अनेक तिसऱ्या जगातील देशांनी वापरलेल्या आहेत. विशेषत: भारतासारख्या वारंवार दुष्काळ पडणाऱ्या देशात अमर्त्य सेन यांचे उपाय हे कल्याणकारी अर्थशास्त्रीय विचार आहेत.

## ❀ सामाजिक निवड सिध्दांत :-

अमर्त्य सेन यांनी दारिद्र्य, सार्वजनिक कृती, दुष्काळ, उपासमार याचबरोबर सामाजिक निवड व आर्थिक कल्याणाबाबत विचार मांडलेले आहेत. सन १९७१ मध्ये 'Collective Choice and Social Welfare' या ग्रंथामध्ये सामाजिक निवड व सामाजिक कल्याणाबाबत विचार मांडले. या विचारास जगभर प्रसिध्दी मिळाली. अमर्त्य सेन यांनी मांडलेले सामाजिक निवडीबाबतचे विचार हे प्रा. केनेथ ॲरो यांच्या अशक्यता प्रमेयामधील दोष दूर करून मांडले आहेत. नोबेल पारितोषिक विजेते प्रा. केनेथ ॲरो यांनी 'Social Choice Theory' मांडून जेव्हा सामाजिक निवडीचे निर्णय घेताना लोकशाही मार्गाचा अवलंब केला असता व्यक्तिस्वातंत्र्य, बहुमत, पक्षपातीपणा यासारख्या कारणांनी घेतलेला निर्णय योग्य किंवा पर्याप्त असत नाही, अशावेळी सरकारने हुकूमशाही मार्गाचा अवलंब करावा व त्याआधारे सामाजिक निर्णय घ्यावेत असे मांडले. परंतु ॲरो यांच्या विधानात सुधारणा करून अमर्त्य सेन यांनी लोकशाही मार्गाच्या सहाय्याने सामाजिक निवड, निर्णय सहज शक्य आहे, असे विवेचन मांडले.

(i) **लोकशाही व्यवस्थेत सामाजिक निवड शक्य :** प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते, देशातील नागरिकांनी ज्यांच्याकडे निर्णय घेण्याचा अधिकार दिलेला आहे, त्यांनी या स्वरूपाचे निर्णय घ्यावेत. त्यामधून लोकशाही अबाधित ठेवून निर्णय घेता येईल.

(ii) **सर्वांच्या हिताचे निर्णय :** समाजाचे प्रतिनिधी म्हणून ज्यांच्यावर निर्णय घेण्याची जबाबदारी आहे, त्या सर्वांनी निर्णयाचा स्विकार केल्यास त्यास विरोध होणार नाही.

(iii) **निर्णयास सर्व समाजाची सहमती :** समाजाचे जे लोक प्रतिनिधीत्व करतात, त्यांनी सर्व समाज सहमत होईल अशा स्वरूपाचे निर्णय घ्यावेत. त्यामुळे लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये योग्य सामाजिक निवड साध्य होवू शकते.

(iv) **व्यक्तिस्वातंत्र्य व बहुमताने निवड :** अमर्त्य सेन यांनी वरील मार्गाचा अवलंब करून व्यक्तीस्वातंत्र्य व बहुमत यांच्या आधारे लोकशाही मार्गानेच योग्य निवड, पर्याप्त सामाजिक निवड सहज शक्य होते असे म्हटले आहे.

अशाप्रकारे सामाजिक निवडीबाबत ॲरोच्या विचारांमधील दोष कमी करून सामाजिक निवड व सामाजिक कल्याणाबाबत विचाराचे सुधारित स्वरूप पुढे दिलेले आहे.

## ❀ सामाजिक कल्याण (Social Welfare) :-

अमर्त्य सेन यांनी १९७१ साली 'Collective Choice and Social Welfare' ग्रंथामध्ये सामाजिक कल्याणाबाबत विचार मांडले. त्यांनी पॅरेटोच्या कल्याणाबाबतच्या विचारांमधील समस्या सोडवून आपले कल्याणाबाबतचे विचार स्पष्ट केले.

पॅरेटोच्या मते, सामाजिक कल्याणात वाढ होण्यास केवळ साधनाचे वाटप चांगले असून चालत नाही, किंबहुना केवळ चांगल्या पध्दतीने वाटप झाले म्हणजे कल्याणात वाढ झाली असे म्हणता येत नाही, तर वाटपामुळे कोणत्याही एका घटकाच्या उपयोगितेत घट न होता दुसऱ्या एखाद्याच्या उपयोगितेत वाढ झाली पाहिजे, तेव्हा कल्याणात वाढ झाली असे म्हणता येते.

पॅरेटोच्या इष्टतमतेच्या विचारांमधील दोष स्पष्ट करताना सेन यांनी असे मत व्यक्त केले की, व्यक्ती स्वहित साधण्याच्या उद्दिष्टांबरोबर अन्य काही उद्दिष्टांवर भर देत असते. स्वत:चे हित साध्य करण्याकरिता व्यक्ती इतरांचे सहकार्य घेवू शकते. तसेच महत्तम सामाजिक कल्याणासाठी दरडोई उत्पन्नामध्ये वाढ या एकाच घटकाचा आधार घेवून चालणार नाही, तर आरोग्यविषयक सुविधा, सरासरी आयुर्मान, राहणीमानाचा दर्जा, यामध्ये सुधारणा घडवून येणे आवश्यक आहे. जर हे साध्य होत असेल तरच सामाजिक कल्याण साध्य झाले असे मानावे, कारण या घटकांमध्ये जर सुधारणा घडून येत असेल तरच मानवी भांडवलाचा विकास घडून येईल व त्याचा फायदा सर्व समाजाला प्राप्त होवून सामाजिक कल्याणामध्ये सुधारणा घडून येईल. लोकशाहीच्या चौकटीत शासनास प्रयत्न करून सामाजिक कल्याणात सुधारणा घडवून आणता येणे शक्य आहे.

अमर्त्य सेन यांनी सामाजिक कल्याणाच्या वृध्दीसाठी पुढील विचार मांडले. व्यक्ती व समाजहिताचा विचार करून सामान्यांची कुवत किंवा क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. आरोग्य व प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण करावे, सार्वजनिक खर्च व उत्पन्नाची फेररचना करावी. महत्तम कल्याणासाठी भांडवलप्रधान उत्पादन तंत्र स्वीकारावे, अर्थव्यवस्था व नीतीशास्त्र यातील दरी कमी करावी. यामुळे सामाजिक कल्याणात वाढ होईल. तसेच स्त्री-पुरुषांमध्ये सामाजिक-आर्थिक बाबतीत समानता प्रस्थापित करणे, लोकसंख्या वाढ नियंत्रण करून रोजगार वृध्दीसाठी श्रमप्रदान उत्पादन तंत्राचा वापर अधिक करावा. जागतिकीकरण स्वीकारताना सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून गरीबांना किमान आर्थिक संरक्षण द्यावे, तसेच त्यांना सरकारने किमान आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास सामाजिक कल्याणात वृध्दी घडून येईल. थोडक्यात सेन यांच्यामते, 'कल्याण वृध्दीसाठी लोकशाही मार्गांनी प्रयत्नांची गरज आहे.'

## ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न - ४

१. उत्पादक उत्पादनाच्या प्रक्रियेत पैशाच्या रूपाने जो खर्च करतो त्यास ......... असे म्हणतात.

*(अ) व्यावहारिक उपयुक्तता* *(ब) खाजगी खर्च*

*(क) सार्वजनिक उपयुक्तता* *(ड) वरीलपैकी सर्व.*

२. शुध्द खाजगी वस्तूंच्या बाबतीत ............ नसते.

*(अ) बाजार यंत्रणा (ब) खाजगी वस्तू (क) पूरक (ड) वरीलपैकी सर्व.*

३. मोठ्या प्रमाणातील उत्पादनामुळे उद्योग संस्थेला जे अंतर्गत तोटे किंवा नुकसान होते त्यास ........... असे म्हणतात.

*(अ) अंतर्गत तोटे (ब) बाह्य तोटे*

*(क) व्यवस्थापकीय तोटे (ड) वरीलपैकी सर्व.*

४. प्रा. पिगूने "The Economics of Welfare" हा ग्रंथ .............. मध्ये लिहिला.

*(अ) १९३५ (ब) १९३० (क) १९३२ (ड) वरीलपैकी नाही.*

५. गुंतवणूक प्रकल्पांच्या मूल्यमापनासाठी प्रामुख्याने वापरली जाणारी पध्दती म्हणजे .............

*(अ) सामाजिक खर्च-लाभ पध्दती (ब) खाजगी खर्च-लाभ पध्दती*

*(क) व्यवस्थापकीय खर्च-लाभ पध्दती (ड) वरीलपैकी तिन्ही नाही.*

## ४.३ सारांश

'वस्तू उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर उद्योग संस्थेने पैशाच्या रूपात केलेला खर्च म्हणजे खाजगी खर्च होय. उदा. उद्योग संस्थेला वस्तूचे उत्पादन करण्यासाठी कामगाराचे वेतन, पगार, कच्चा माल, वीज खर्च, विमा खर्च, वाहतुकीवरील केलेला खर्च, जाहिरातबाजी, व्याज, घसारा, कर वगैरे बाबींवर खाजगी खर्च करावा लागतो. एखादी वस्तू उत्पादित करण्यासाठी वैयक्तिक उत्पादकाला जो खर्च येतो त्यास खाजगी खर्च असे म्हणतात. तसेच एखादी वस्तू उत्पादित करण्यासाठी समाजात जो खर्च समाजातील साधन सामग्रीच्या रूपाने येत असतो, त्यास सामाजिक खर्च असे म्हणतात. उत्पादनासाठी सामाजिक मालकीची दुर्मिळ साधन सामग्री नष्ट होत असते.

ज्या सार्वजनिक वस्तूंचे बाजार परिणाम असतात, अशा सार्वजनिक वस्तू व्यापारी क्षेत्रामध्ये उत्पादन व वितरणासाठी दिल्या तरी चालतात. कारण त्या वस्तू बाजार यंत्रणेद्वारे त्या वस्तूंची किंमत ठरवू शकतात. तसेच सरकार अशा वस्तू स्वत:कडे ही उत्पादन व वितरणासाठी ठेवू शकतात. परंतु ज्या शुध्द खाजगी वस्तूंच्या बाबतीत बाजार यंत्रणा नसते. अशा वस्तूंच्या बाबतीत त्याच्या पुरवठ्यामध्ये खर्च व सामाजिक सीमांत चर्चा यामध्ये फरक करता येत नाही. जरी अशा वस्तू खाजगी क्षेत्राकडे उत्पादनासाठी व वितरणासाठी दिली तरी त्या वस्तूची बाजार यंत्रणा किंमत हीच त्या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी बिगर बाजार यंत्रणा निर्माण होते.

एखाद्या विशिष्ट ठिकाणी उद्योगधंद्याचे स्थानिकीकरण झाले तर त्या ठिकाणी अनेक उद्योगसंस्था वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी निर्माण होतात. विशिष्ट ठिकाणी उद्योगधंद्याची वाढ झाल्यामुळे

वीज, पाणी, रस्ते, वाहतूक, टेलिफोन, संशोधन संस्था यासारख्या सोयी व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होतात, त्याचे फायदे सामुदायिकरित्या सर्व उद्योगसंस्थांना मिळतात, त्यांना बहिर्गत बचती किंवा बाह्य लाभ असे म्हणतात. हे लाभ उद्योगसंस्थेच्या आकारमानामुळे मिळत नसतात तर एकाच ठिकाणी अनेक उद्योगसंस्था केंद्रीत झाल्यामुळे होत असतात.

प्रा. पिगूने आर्थिक कल्याणाची स्पष्ट अशी व्याख्या दिली. व्यक्तिगत कल्याण म्हणजे वस्तू व सेवांच्या उपभोगापासून व्यक्तीला मिळणाऱ्या समाधानाची बेरीज होय. तर सामाजिक कल्याण म्हणजे व्यक्तिगत कल्याणाची बेरीज होय. पिगू म्हणतो, कल्याण ही व्यापक संकल्पना आहे. म्हणून कल्याणाची कल्पना पैशाशी जोडून तिची मर्यादा ठरवून दिली. म्हणजे पैशाच्या साहाय्याने विनिमय होणाऱ्या वस्तू व सेवांनाच त्याने समाधान म्हटले. प्रा. पिगूने वस्तूनिष्ठरित्या कल्याणाची कल्पना राष्ट्रीय उत्पन्नाची जोडली. राष्ट्रीय उत्पन्नाच्या विभाजनात कोणताही बदल न होता राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास कल्याणातदेखील वाढ होते. याउलट राष्ट्रीय उत्पन्न कमी झाल्यास आर्थिक कल्याण देखील कमी होते. अशारितीने सामाजिक कल्याणाचे संख्यात्मक मोजमाप राष्ट्रीय उत्पन्नाच्या साहाय्याने करता येते, असे पिगू म्हणतो याचा अर्थ जास्त राष्ट्रीय उत्पन्न, जास्त कल्याण, कमी राष्ट्रीय उत्पन्न कमी कल्याण होय.

सार्वजनिक गुंतवणूकीपासून सरकारला प्रत्यक्ष जो लाभ होतो व खर्च येतो त्याला प्रत्यक्ष लाभ व प्रत्यक्ष खर्च असे म्हणतात. परंतु सरकारी गुंतवणूकीपासून समाजातील इतर घटकांना जे लाभ होतात व तोटे सहन करावे लागतात त्यास अप्रत्यक्ष लाभ व अप्रत्यक्ष तोटे असे म्हणतात अथवा बहिर्गत फायदे-तोटे असे म्हणतात. उदा. सरकारी गुंतवणूकीमुळे सरकारच्या उत्पन्नात किंवा महसूल जी वाढ होते त्यास प्रत्यक्ष लाभ असे म्हणतात तर गुंतवणूकीवर झालेला प्रत्यक्ष खर्च हा सरकारचा प्रत्यक्ष खर्च असतो. याउलट प्रकल्प लाभ क्षेत्रातील लोकांचे उत्पन्न, रोजगार, आर्थिक परिस्थिती वगैरे घटकांत ज्या सुधारणा झालेल्या असतात त्याला अप्रत्यक्ष लाभ असे म्हणतात तर एखाद्या प्रकल्पापासून होणारे प्रदूषण, त्यामुळे लोकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम, यास अप्रत्यक्ष तोटे असे म्हणतात.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा :** भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्रास अनन्यसाधारण महत्त्व आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस सन १९५०-५१ मध्ये राष्ट्राच्या एकूण उत्पन्नात शेती क्षेत्राचा हिस्सा हा ५६.५% इतका होता. सद्या तो घटला आहे.

२. **रोजगार निर्मिती :** विसाव्या शतकाचा विचार केल्यास भारतात शेती व शेतीपूरक व्यवसायात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ७० ते ८०% च्या दरम्यान होते. तर सध्या हे प्रमाण ६०% च्या आसपास आहे. लोकांना काम उपलब्ध होणे म्हणजे रोजगार निर्मिती होय.

३. **गुंतवणूकीला पोषक वातावरण तयार करणे :** सर्वसाधारण किंमत पातळी वाढू लागल्यास मुद्रेचे मूल्य कमी होऊ लागते. अशावेळी बचतीवर प्रतिकूल परिणाम होत असतो. याउलट

सर्वसाधारण किंमतपातळी स्थिर असेल तर बचतीला उत्तेजन मिळते. बचत वाढून भांडवल संचयाचा दर वाढतो व गुंतवणूकीला उत्तेजन मिळते. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे गुंतवणूकीस पोषक वातावरण तयार होते.

४. **शेतमाल पुरवठा :** अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी शेती शब्दश: विकासाच्या प्रक्रियेचे पोषण करते, ती अन्नधान्याची गरज भागविते. उत्पन्नात वाढ करते. वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरविते. अन्नधान्यातील स्वयंपूर्णत: ही इतर कोणत्याही वस्तूपेक्षा देशाला फार मोठा आत्मविश्वास व स्वातंत्र्य देते.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❀ स्वयं-अध्ययन प्रश्न - १ ची उत्तरे

१. *अ) बाजार यंत्रणा.*

२. *अ) बाह्य बचती.*

३. *अ) कापड.*

### ❀ स्वयं-अध्ययन प्रश्न - २ ची उत्तरे

१. *क) दोन्ही.*

२. *अ) राष्ट्रीय उत्पन्नाशी.*

३. *अ) रॉबिन्स.*

### ❀ स्वयं-अध्ययन प्रश्न - ३ ची उत्तरे

१. *ड) सामाजिक खर्च लाभ.*

२. *ड) वरील सर्व.*

३. *ब) सामाजिक.*

४. *ब) अप्रत्यक्ष तोटे.*

५. *ड) वरील सर्व.*

### ❀ स्वयं-अध्ययन प्रश्न - ४ ची उत्तरे

१. *ब) खाजगी खर्च.*

२. *अ) बाजार यंत्रणा.*

३. *अ) अंतर्गत तोटे.*

४. *क) १९३२.*

५. *अ) सामाजिक खर्च-लाभ पध्दती.*

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

### ४.७.१ दीर्घोत्तरी प्रश्न.

१. प्रा. पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र सविस्तर स्पष्ट करा.

२. प्रा. पिगूच्या कल्याणकारी अर्थशास्त्रावरील टीका स्पष्ट करा.

३. खर्च-लाभ विश्लेषण सविस्तर स्पष्ट करा.

४. सामाजिक खर्च-लाभ विश्लेषणावरील मर्यादा स्पष्ट करा.

५. मोठ्या उत्पादनाचे बाह्य लाभ स्पष्ट करा.

६. कल्याणकारी अर्थशास्त्रातील अमर्त्य सेनचे योगदान स्पष्ट करा.

### ४.७.२ टीपा लिहा.

१. सामाजिक व खाजगी असमानतेची कल्पना.

२. सार्वजनिक वस्तूची समस्या.

३. दुहेरी निकष.

४. खर्च-लाभ पध्दती.

५. सामाजिक खर्चाशी संबंधीत घटक.

६. मालमत्ता हक्क आणि विकास धोरणे.

७. वाजवीपणा सिध्दांत आणि विभाजनासंबंधीचा न्याय.

८. सार्वजनिक निवडीचा सिध्दांत आणि धोरण उपयोजन.

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **Arrow, K. J.** (1951) : *"Social Choice and Individual Values",* Yale University Press, New Haven.

२. **Baumol, W. J.** (1965) : *"Welfare Economics and the Theory of the State"*, 2nd Edition, Longmans, London.

३. **Baumol, W. J. (Ed.)** (2001) : *"Welfare Economics"*, Edward Elgar Publishing Ltd., U.K.

४. **Broadway, R. W.** and **N. Bruce** (1984) : *"Welfare Economics",* Basil Blackwell, Oxford.

५. **Duisenberg, J. S.** (1949) : *"Income, Saving and the Theory of Consumer Behaviour"*, Haward University Press, Cambridge, Mass.

६. **Feldman, A. M.** (1980) : *"Welfare Economics and Social Choice Theory"*, Martinus Nijhoff, Boston.

७. **Graaff J. de.** (1957) : *"Theoretical Welfare Economics",* Cambridge University Press, Cambridge.

८. **Little, I. M. D.** (1939) : *"A Critique of Welfare Economics"*, 2nd Edition, Oxford University Press, Oxford.

९. **Marshall, A.** (1946) : *"Principles of Economics"*, MacMillan, London.

१०. **Myint, H.** (1948) : *"Welfare Economics",* MacMillan, London.

११. **Nicholas, B. (Ed.)** (2001) : *"Economics Theory and the Welfare State"*, Edward Elgar Publishing Ltd., U.K.

१२. **Pigou, A. C.** (1962) : *"The Economics of Welfare"*, 4th Edition, MacMillan, London.

१३. **Jones, Chris** (2005) : *"Applied Welfare Economics",* Oxford University Press, Oxford.

१४. **Sen, Amartya** (2017) : "Collective Choice and Social Welfare", Penguin Books Ltd., London.

१५. **Sen, Amartya** (1977) : *"Choice, Welfare and Measurement",* Harward University Press, London.

❀❀❀